# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २७ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## अन्याय वाढतो तेव्हा जनताच दुर्गेचे रूप घेते, हे ममता विसरल्या!

### हुगळी, बनगाव येथे सभा; कोलकात्यात रोड शो



**कोलकाता वृत्तसंस्था :** जेव्हा अन्यायाची परिसीमा गाठली जाते तेव्हा जनता स्वतःच देवी दुर्गेचा अवतार घेते आणि परिवर्तन घडवते. दहशत संपली, विश्वास सुरू, असे प्रतिपादन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पश्चिम बंगालमध्ये सत्तांतराची हाक दिली. राज्यातील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बनगाव आणि हुगली जिल्ह्यातील हरिपाल येथे मोदींच्या सभा झाल्या, तर कोलकात्यात त्यांनी भव्य रोड शोही केला.

मोदी म्हणाले, १५ वर्षांपूर्वी तृणमूल पक्ष 'माँ, माटी, मानुष'चा नारा देऊन सत्तेत आला. मात्र आज त्या घोषणेमागील मूल्येच हरवली आहेत. माँ, माटी, मानुषचा सन्मान तृणमूलने राखला नाही. तृणमूलच्या महाजंगलात असलेल्या राज्यात छोट्या नेत्यांपासून गुंडांपर्यंत सर्वजण स्वतःलाच सरकार समजू लागले आहेत. पहिल्या टप्प्यातच मतदानानंतर तृणमूलचा अहंकार गळून गेला आहे. दुसऱ्या टप्प्यात भाजपचा विजय निश्चित दिसत आहे. मोठ्या प्रमाणावर झालेल्या मतदानामुळे सत्ताधारी पक्ष चिंतेत आहेत.

ते म्हणाले, एकेकाळी कारखान्यांनी गजबजलेला हुगळी परिसर आज ओस पडलेला आहे. इंग्रज काळापासून सुरू असलेले बनगाव ते बराकपूर या पट्ट्यातील अनेक कारखाने बंद पडले आहेत. आता येथे 'कट-मनी' आणि 'कमिशन'चीच व्यवस्था उरली आहे. तृणमूल सरकार अत्याचार करणाऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. ४ मे नंतर भाजप सत्तेत आल्यावर अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा दिली जाईल. येथील युवकांमध्ये प्रचंड सर्जनशीलता आहे. योग्य संधी मिळाल्यास ते देशाला पुढे नेऊ ☞(पान २ वर)

# सूर्य कोपला, विदर्भात तापला! उष्णतेचा कहर

## अकोल्यात देशातील सर्वाधिक ४६.९ अंश सेल्सिअस तापमान

**अकोला /प्रतिनिधी : :** उष्णतेच्या लाटेत संपूर्ण विदर्भ होरपळून निघत आहे. रविवारी तर विदर्भात सूर्य कोपला की काय, असेच चित्र पाहायला मिळाले. विदर्भातील सर्वच प्रमुख शहरांचे तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले गेले. देशातील सर्वाधिक तापमान अकोला शहरात ४६.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले असून, हे यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान आहे. अकोल्यापाठोपाठ सर्वाधिक तापमान नोंदवलेल्या शहरांमध्ये अमरावतीचा दुसरा क्रमांक आहे.

राज्यात सर्वत्र उष्णतेची लाट सुरूच असून रविवारी अकोला आणि अमरावतीत पारा ४६.९ अंश सेल्सिअसवर गेला होता. दरम्यान, काही भागांत सायंकाळच्या वेळेस हलका पाऊस पडेल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

राज्याच्या कमाल तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून विदर्भात उष्णतेने कहर केला आहे. अकोला, अमरावतीत हंगामातील सर्वोच्च तापमानाची नोंद झाली आहे. अजून मे महिना पूर्ण बाकी असल्याने तापमानाचा पारा ४७ ते ४८ अंशांवर जाईल, असा अंदाज काही शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, परभणीत एकाचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, यास अधिकृत दुजोरा मिळाला नाही.



विदर्भात गेल्या आठवडाभरापासून उष्णतेची लाट सुरू आहे. सातत्याने देशातील सर्वाधिक तापमान अकोला आणि विदर्भातील काही प्रमुख शहरांमध्ये नोंदवले जात आहे. रविवारी तर या उन्हाळ्यातील तापमानाचा उच्चांक गाठला गेला. गेल्या दशकभरातील सर्वाधिक तापमानाच्या उंबरठ्यावर यावर्षीचे तापमान येऊन पोहोचले असून, अशीच परिस्थिती काही काळ कायम राहिल्यास या दशकातील तापमानाचा उच्चांक मोडण्याची शक्यता आहे.

### विदर्भातील रविवारचे तापमान (अंश सेल्सिअसमध्ये) :

| | |
|---|---|
| अकोला : ४६.९ | **अमरावती : ४६.८** |
| वर्धा : ४६.४ | यवतमाळ : ४६.० |
| नागपूर : ४५.४ | चंद्रपूर : ४५.० |
| वाशिम : ४४.६ | गडचिरोली : ४४.६ |
| गोंदिया : ४४.४ | ब्रह्मपुरी : ४४.२ |
| भंडारा : ४४.० | बुलढाणा : ४३.५ |

## कोट्यवधींचा लँड जिहाद उघड

# बळकावलेल्या मालमत्ता परत मिळवून देण्यात वकिलांना यश

**नागपूर/प्रतिनिधी : :** भुसावळ येथे 'लँड जिहाद' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या प्रकरणाचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, शेकडो कोटी रुपयांच्या मौल्यवान मालमत्तेवर सुनियोजितरीत्या कब्जा केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात एक महत्त्वाचा कायदेशीर विजय मिळवून बेकायदेशीररित्या ताबा घेतलेल्या व्यक्तींना बेदखल करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाने अशा फसव्या जमीन व्यवहारांबाबत अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या मोठ्या घोटाळ्याचा उलगडा Central Cine Circuit Association (CCCA) या संस्थेच्या दीर्घ कायदेशीर लढ्यामुळे झाला. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानातील ८०० हून अधिक चित्रपट वितरकांचा समावेश असलेल्या या संस्थेने आपल्या सदस्यांसाठी मुख्यालय व विश्रांतीगृह म्हणून भुसावळ येथील प्रमुख भागात ५,००० चौ. फूटांचा बंगला १९९३ साली मुंबईतील एका पारशी व्यक्तीकडून खरेदी केला होता. मात्र, मालकी बदलाची नोंद स्थानिक सिटी सर्व्हे कार्यालयात पोहोचली नाही किंवा दुर्लक्षित राहिली. ही प्रशासनातील त्रुटी २०२४ पर्यंत कायम राहिली. याच दरम्यान अफजल कालू गावली यांच्या कुटुंबाने बेकायदेशीरपणे त्या मालमत्तेवर कब्जा केला.

### शारीरिक बळाचा अभाव-

बेकायदेशीर अतिक्रमण हटवण्यासाठी शारीरिक ताकद नसल्याने CCCA ला दोन वर्षांचा कठीण कायदेशीर संघर्ष करावा लागला. ॲड. संजीव देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली हा लढा लढला गेला. उपविभागीय अधिकारी (SDM), भुसावळ सत्र न्यायालय, महसूल न्यायाधिकरण, उच्च न्यायालय आणि मंत्रालय अशा विविध स्तरांवर पाठपुरावा करण्यात आला.जुने दस्तऐवज शोधणे, बनावट कागदपत्रे उघड करणे आणि अधिकाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पटवणे अशा अनेक टप्प्यांनंतर अखेर ९ एप्रिल २०२६ रोजी एउश यांनी CCCA च्या बाजूने निर्णय दिला. तरीही अतिक्रमणकर्त्यांनी जागा सोडण्यास नकार दिल्याने पोलिसांच्या मदतीने १६ एप्रिल रोजी जागा मोकळी करून CCCA ला पुन्हा ताबा मिळाला, अशी माहिती अध्यक्ष संजय सुराणा यांनी दिली.

**लढा अद्याप सुरू-**

ॲड.संजीव देशपांडे यांच्या मते हा लढा अजून संपलेला नाही. कागदपत्रांच्या तपासात त्यांना भुसावळ परिसरात मोठ्या प्रमाणावर जमीन बळकावण्याचा सुनियोजित प्रकार सुरू असल्याचे आढळले.

या टोळीने मूळ पारशी मालकांच्या वारसांकडून पावर ऑफ अटर्नी घेतली आणि बनावट खरेदी कागदपत्रे तयार केली. आश्चर्य म्हणजे, सुमारे ५ कोटी रुपयांची किंमत असलेली मालमत्ता केवळ ६ लाख रुपयांना रोजंदारी कामगारांनी विकत घेतल्याचे दाखवण्यात ☞(पान २ वर)

## वनरक्षकावर वाघिणीचा हल्ला

# तासाभरात वाघिणीचा गूढ मृत्यू

### रत्नापूर शिवारात थरारक घटना; तीन बछड्यांचे भवितव्य अधांतरी, मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट



**चंद्रपूर/वृत्तसंस्था-** सिन्देवाही वनपरिक्षेत्रातील नवरगाव -रत्नापूर शिवारात रविवारी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरला. एका वाघिणीने प्रथम बैलाची शिकार केली, त्यानंतर कर्तव्यावर असलेल्या वनरक्षकावर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. मात्र, या घटनेनंतर अवघ्या तासाभरातच तीच वाघीण मृतावस्थेत आढळून आली. त?यामुळे मोठे गूढ निर्माण झाले आहे. या विषयी अधिक माहिती अशी की, आज रविवारी सकाळी सुमारे ११:३० वाजण्याच्या सुमारास रत्नापूर शेतशिवारात शेतकरी मंगेश तोडफोडे आपल्या मक्याच्या शेतात गेले असता, त्यांना त्यांचा बैल मृतावस्थेत आढळला. संशय आल्याने त्यांनी परिसराची पाहणी केली असता, तेथे एक पट्टेदार वाघिण आणि तिचे तीन बछडे दिसून आले. ही माहिती वाऱ्यासारखी पसरताच गावकऱ्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. त्यामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच वनविभागाची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. वाघिणीचा मागोवा घेत असताना ती गोसीखुर्द कालवा पार करून रत्नापूर रस्त्यालगत दामोदर लोधे यांच्या ☞(पान २ वर)

## 'आपली बस, आपली सेवा'

## १ मे पासून ST चे अभियान

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी ::** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'आपली बस, आपली सेवा' या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेत सुधारणा करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे.



एसटी बसेसची संख्या वाढत असली तरी प्रवासी संख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याने प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी सेवेत सुधारणा करण्यात येणार आहे. १ मे २०२६ पासून या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे. बस सुटण्यापूर्वी चालकाने ☞(पान २ वर)

## फार्म हाऊसवरील भोंदू खरातचा काळा खेळ उघड!

### व्हिडीओत महिलांबरोबर आक्षेपार्ह कृत्य; स्वयंपाक्याने केले चित्रीकरण

नाशिक : भोंदू अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असून, आता त्याच्या फार्महाऊसवरील कथित काळे कारनामे उघडकीस आले आहेत. खरातच्या फार्म हाऊसवर काम करणाऱ्या स्वयंपाकी कर्मचाऱ्याने घरातील काही संशयास्पद हालचालींचे व्हिडीओ चित्रीकरण केल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. या व्हिडीओमध्ये खरात महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

विशेष म्हणजे, या स्वयंपाकी कर्मचाऱ्याला खरातच्या जवळच्या एका व्यक्तीने मुद्दाम त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी फार्महाऊसवर



कामावर ठेवले होते, हेही तपासात निष्पन्न झाले आहे. त्याचबरोबर खरातच्या ऑफिसबॉयनेही अनेक महत्त्वाची माहिती उघड करत फार्महाऊसवरील संशयास्पद हालचालींचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणातील सीसीटीव्ही फुटेज विशेष तपास पथकाच्या हाती लागले असून, त्यातून आणखी गंभीर आणि धक्कादायक पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिस कोठडीत असताना अशोक खरात तपासात सहकार्य करत नसल्याचे समोर आले आहे. सुरुवातीला चौकशीदरम्यान उत्तर देण्यास टाळाटाळ करणारा खरात आता 'काही आठवत नाही', अशी भूमिका घेत असल्याने त्याची गजनी ट्रिक चर्चेचा विषय ठरली आहे. यापूर्वीही प्रकृती अस्वस्थ असल्याचे कारण देत तपास चुकवण्याचा प्रयत्न त्याने केला होता.

**अटकेच्या दिवशीच जमीन व्यवहार-** भोंदू अशोक खरात प्रकरणात आता आणखी एक धक्कादायक वळण समोर आले आहे. पोलिसांनी अशोक खरातला अटक केलेल्या दिवशीच त्याची पत्नी कल्पना खरात हिच्या नावे नवी मुंबईजवळील उरण येथे मोठा जमीन व्यवहार पूर्ण झाल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. उरण परिसरात तब्बल २० गुंठे जमीन ५८ लाख ५० हजार रुपयांना खरेदी करण्यात आली. विशेष म्हणजे, ज्या दिवशी अशोक खरातला अटक झाली, त्याच दिवशी हा व्यवहार अधिकृतरीत्या कागदोपत्री पूर्ण करण्यात आला. एकीकडे पत्नी कल्पना ☞(पान २ वर)









# जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र महापौर परिषदेच्या माध्यमातून संघटितपणे प्रयत्न करणार- महापौर रितू तावडे

### महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्षपदी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांची निवड, अमरावतीचे महापौर तेजवानी सहभागी

**मुंबई/प्रतिनिधी** : मोठ्या कालावधीनंतर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका संपन्न होऊन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनसेवा सुरू झाली आहे. अशा स्थितीत जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी सर्व महापौरांवर अधिक जबाबदारी आहे. ही बाब लक्षात घेता, महाराष्ट्र महापौर परिषदेच्या माध्यमातून शासनाशी समन्वय साधण्यासाठी आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही महाराष्ट्र महापौर परिषदेच्या पदसिद्ध अध्यक्ष तथा मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी दिली.

महाराष्ट्र महापौर परिषदेची २३ वी बैठक मुंबईत अंधेरी (पश्चिम) येथे महाराष्ट्र महापौर परिषदेच्या पदसिद्ध अध्यक्ष तथा मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६ एप्रिल २०२६ संपन्न झाली. त्यावेळी संबोधित करताना त्या बोलत होत्या.

या परिषदेचे आयोजन अंधेरी (पश्चिम) येथे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थानिकराज भवन या वास्तूमधील सभागृहात करण्यात आले.



या बैठकीला मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्यासह नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर, मीरा-भाईंदरच्या महापौर डिंपल मेहता, वसई-विरारचे महापौर अजीव पाटील, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, कल्याण-डोंबिवलीच्या महापौर हर्षाली चौधरी - थवील, भिवंडी-निजामपूरचे महापौर नारायण चौधरी, धुळे शहराच्या महापौर मायादेवी परदेशी, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, इचलकरंजीचे महापौर उदय धातुंडे, कोल्हापूरच्या महापौर रुपाराणी निकम, जालना शहराच्या महापौर वंदना मगरे, परभणीचे महापौर सय्यद इकबाल, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे आदी महापौर उपस्थित होते. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र महापौर परिषदेचे कार्याध्यक्ष रणजित चव्हाण, संयोजक लक्ष्मणराव लटके, कार्यालयीन सचिव निधी लोके हे देखील यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी, परिषदेचे कार्याध्यक्ष रणजित चव्हाण यांनी उपस्थित सर्व महापौरांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# परतवाडा प्रकरणः आणखी एक पीडिता समोर एसआयटीचा तपास झपाट्याने पुढे

**अमरावती/प्रतिनिधीः** परतवाडा येथे अल्पवयीन मुलींचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याच्या प्रकरणात आता आणखी एक गंभीर वळण आले आहे. या प्रकरणात तिसरी पीडिता पुढे येत तिने रविवारी आपला जबाब नोंदवला. १६ वर्षीय पीडितेने महिला अधिकाऱ्यांसमोर दिलेल्या जबाबात मुख्य आरोपी अयान अहमद याच्यावर जबरदस्तीने स्पर्श केल्याचा आरोप केला आहे. या नव्या खुलाशानंतर पोलिसांनी गुन्ह्यात संबंधित कलमांची भर घालत तपास अधिक तीव्र केला आहे.

या प्रकरणात आतापर्यंत मुख्य आरोपी अयान अहमदसह आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्यासाठी परतवाडा येथे विशेष तपास पथक (एसआयटी) कार्यरत असून या पथकात १० पोलिस अधिकारी आणि ३६ जवानांचा समावेश आहे. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांवर विशेष भर दिला आहे. आतापर्यंत ११ मोबाईल फोन, एक लॅपटॉप, एक टॅब्लेट आणि एक हार्ड डिस्क जप्त करण्यात आली आहे.

जप्त केलेले सर्व मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडे पाठवण्यात आली आहेत. डिलीट केलेला डेटा तसेच इतर तांत्रिक माहिती शोधण्यासाठी या उपकरणांचे सखोल विश्लेषण करण्यात येत आहे. या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी अयान अहमदच्या मोबाईल फोनसह इतर आरोपींकडून जप्त केलेल्या मोबाईल, लॅपटॉप आणि हार्ड ड्राइव्हमधील तब्बल १.३० लाख फोटो तपासले आहेत. एसआयटी पथक या सर्व डिजिटल पुराव्यांचा सखोल तपास करत आहे.

### पाच आरोपी आज न्यायालयातः

दरम्यान, न्यायालयाने अयान अहमदसह पाच आरोपींची पोलीस कोठडी (पीसीआर) २७ एप्रिलपर्यंत वाढवली होती. अयान अहमद, उझैर खान, इक्बाल खान, मोहम्मद साद मोहम्मद साबिर, तबरेज खान, तस्लीम खान आणि अहफाज खान मन्सूर खान यांचा पीसीआर सोमवार, २७ एप्रिल रोजी संपत आहे.

त्यामुळे पोलिसांकडून सर्व पाच आरोपींना न्यायालयात हजर केले जाणार आहे. यापूर्वी परतवाडा न्यायालयाने एमसीआर अंतर्गत तीन आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवले होते. प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत सुरू असून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# बडनेऱ्यात राजकीय वादातून तणाव

## -इस्लामी चौकात दोन गट आमनेसामने, खंडणीच्या आरोपांनी प्रकरण चिघळले

**अमरावती/प्रतिनिधीः** बडनेरा परिसरात राजकीय वादाची ठिणगी पेटल्याने इस्लामी चौकात दोन गटांमध्ये जोरदार झटापट झाल्याची घटना शुक्रवारी रात्री उघडकीस आली. या घटनेनंतर परिस्थिती अधिक चिघळत पोलीस ठाण्याच्या आवारातही दोन्ही गट समोरासमोर आल्याने तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात नगरसेविका नूजहत परवीन शाकीर हुसेन यांनी गंभीर आरोप करत, निवडणुकीनंतर सातत्याने छळ सुरू असून ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा दावा केला आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, मुमताज खान व इतर संशयितांकडून वारंवार धमक्या दिल्या जात होत्या. २४ एप्रिलच्या सायंकाळी इस्लामी चौकात त्यांच्या पतीला अडवून पुन्हा खंडणीची मागणी करण्यात आली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावरून संबंधित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या बाजूनेही प्रतितक्रार दाखल करण्यात आली असून एहफाज खान तमीज खान यांनी शाकीर हुसेन व त्यांच्या समर्थकांवर मारहाण व धमकावल्याचा आरोप केला आहे. माहिती अधिकारातून मागितलेली तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

तसेच मुमताज खान यांच्यावर पाठलाग करून हल्ला केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या घटनेनंतर जमावाविरुद्ध दंगलीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एआयएमआयएमच्या शिष्टमंडळाने पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व श्याम घुगे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारींची चौकशी सुरू केली असून परिसरात सतर्कता वाढविण्यात आली आहे.

# पोलिस असल्याचे सांगत वृद्धाची लूट

## -२ लाख ८८ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

### मंगरूळ दस्तगीर पोलिसांत गुन्हा दाखल

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः** मंगरूळ दस्तगीर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिस अधिकारी असल्याचे भासवून दरोडेखोरांनी एका वृद्ध व्यक्तीची तब्बल २ लाख ८८ हजार रुपये किमतीच्या ३६ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पुरुषोत्तम नामदेवराव उगले (वय ६४, रा. झाडा) हे पुलगाव येथे एका लग्न समारंभाला जाऊन आपल्या नातवासह परत येत होते. ते विठ्ठल कोपरे यांच्या मोपेडवरून विठ्ठल-मंगरूळ मार्गाने गावाकडे येत असताना, गावापासून सुमारे १०० मीटर अंतरावर अज्ञात मोटारसायकलस्वारांनी त्यांना थांबवले. यावेळी संशयितांनी स्वतःला पोलिस अधिकारी असल्याचे सांगून उगले यांची चौकशी करण्याचा बहाणा केला. त्यानंतर त्यांनी चलाखीने उगले यांच्याकडील २२ ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी तसेच १४ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, असे एकूण ३६ ग्रॅम वजनाचे सुमारे २ लाख ८८ हजार रुपये किमतीचे दागिने घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी पुरुषोत्तम उगले यांनी दिलेल्या तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# अनियंत्रित ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी

## -सुदैवाने जीवितहानी नाही

**अमरावती/प्रतिनिधीः** वाठोडा शुक्लेश्वर - सोनारखेडा मार्गावर भरधाव ट्रॅक्टर ट्रॉली वाळू भरण्यासाठी जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर पलटी झाल्याची घटना २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली.

ट्रॅक्टर इतका भयानक अवस्थेत की ट्रॅक्टरचा मोठे नुकसान झाले असून ट्रॅक्टर चालक हा रस्त्याच्या कडेला फेकल्या गेल्याने सुदैवाने बचावला. सोनारखेडा ते वाठोडा शुक्लेश्वर मार्गावरील वळण मार्ग लहान असल्याने अपघाताच्या मालिकादेखील दिवसेंदिवस वाढत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

गेल्या महिनाभरापूर्वी याच ठिकाणी वाळू घेऊन जाणारा ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी झाल्याने तीन ते चार लोक गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र पोलिस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोपदेखील नागरिक करीत आहेत, भरधाव वेगात जाणाऱ्या अनियंत्रित वाहनावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन काय यावर भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.

# अंजलाबाई कांबळे यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधी-** सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी सुशील ज्ञानेश्वर कांबळे यांच्या मातोश्री अंजलाबाई ज्ञानेश्वर कांबळे (८५) यांचे आज दुपारी परतवाडा येथील खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा धामणगाव गढी येथे वास्तव्यास असलेले सुशील कांबळे यांच्या निवासस्थानावरून दि.२७ एप्रिल २६ रोजी स. ११.०० वाजता निघणार आहे. अंजलाबाई कांबळे यांच्या मागे मुलगा सुशील,तीन मुली मिना, तेजस्विनी, मंदाकिनी, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे.



# 'मन की बात' कार्यक्रमाचा १३३ वा भाग

## समता कॉलनीत सामूहिक श्रवणाने उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः** पंतप्रधान यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचा १३३ वा भाग आज अमरावती येथील समता कॉलनीमध्ये उत्साहात सामूहिक श्रवणाद्वारे संपन्न झाला. हा कार्यक्रम ज्योती यावलीकर यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता.या भागामध्ये पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रनिर्मितीशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन करत प्रेरणादायी यशोगाथा मांडल्या. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना समाजकार्य आणि राष्ट्रहितासाठी प्रेरणा मिळाली.या सामूहिक श्रवण कार्यक्रमास नगरसेविका कल्याणी तायडे, डॉ. वसुधा बोंडे, ज्योती यावलीकर, नंदकिशोर बोंडे, डॉ. राजीव रोडे, किरण ठाकरे, अशोकराव देशमुख, नरेश बर्वे, भैया काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १ व १० वरील उर्वरित

### अन्याय वाढतो तेव्हा

शकतात. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या बंगाली कंटेंटचाही त्यांनी उल्लेख केला.

मोदींनी भाषणांदरम्यान, स्थानिक नागरिक सध्या 'पलटानो दरकार' म्हणजे बदल गरजेचा आहे - हा एकच नारा देत असल्याचा दावा केला. दरम्यान, मोदींनी ठाकूरनगर येथील मतुआ ठाकूर मंदिरात दर्शन घेतले आणि स्थानिक समुदायाशी संवाद साधला. कोलकात्यात रोडशो पूर्वी मोदींनी १७०३ मध्ये स्थापन केलेल्या माँ सिद्धेश्वरी मंदिरातील थंथानिया कालीबाड़ी येथे काली मातेचे दर्शन घेतले. येथे मांसाहारी नैवेद्याची प्रथा रामकृष्ण परमहंस यांनी सुरू केली होती.

**महिलेला पराभूत करण्यासाठी सगळे एकत्र आले आहेत : केजरीवाल-** कोलकाता : आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी कोलकात्यात तृणमूल काँग्रेसच्या समर्थनार्थ आयोजित सभेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जींना उघड पाठिंबा दर्शवला. ते म्हणाले, 'ईडी, सीबीआय, केंद्रीय यंत्रणा आणि पंतप्रधान सगळेच ममता बॅनर्जी यांच्या मागे लागले आहेत. भाजपचे मुख्यमंत्री घराघरांत जाऊन प्रचार करत आहेत. एका महिलेला हरवण्यासाठी सर्वजण एकत्र आले आहेत. इतक्या दबावानंतरही ममता बॅनर्जी विजयी होतील, कारण त्यांच्यावर कालीमातेचा आशीर्वाद आहे.'

### कोट्यवधींचा 'लँड जिहाद' उघड

आले होते. याच पद्धतीने त्यांनी पारशी अंजुमन फंडाची सहा एकर स्मशानभूमी (अरामगाह) तसेच 'मेसोनिक लॉज' या आंतरराष्ट्रीय धार्मिक संस्थेची जमीन बळकावली. या सर्व मालमत्तेची एकूण किंमत ३०० कोटी रुपयांहून अधिक असल्याचा अंदाज आहे. मेसोनिक लॉजची मालमत्ता न्यायालयीन लढ्यानंतर परत मिळाली असली, तरी अरामगाह प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. या संपूर्ण प्रकरणातून प्रशासनातील गंभीर त्रुटी उघड झाल्या आहेत.

उपनिबंधक कार्यालयाने प्राथमिक तपासणी केली असती किंवा व्यवहारातील आर्थिक विसंगती तपासली असती, तर हा फसवणुकीचा प्रकार लवकर उघड झाला असता, असे ॲड. संजीव देशपांडे यांनी नमूद केले.

### वनरक्षकावर वाघिणीचा हल्ला

शेताकडे गेली. यावेळी नाचनभट्टी येथील वनरक्षक सज्जन पारेकर घटनास्थळी पोहोचले असता वाघिणीने अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. या भीषण हल्ल्यात पारेकर गंभीर जखमी झाले असून त्यांच्या मांडीला गंभीर दुखापत झाली आहे, तसेच उजव्या हाताला फ्रॅक्चर झाले आहे.

त्यांना तातडीने उपचारासाठी चंद्रपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि नागरिकांमध्ये एकच धावपळ उडाली.दरम्यान, या सर्व घटनेनंतर अवघ्या तासाभरातच रत्नापूर शिवारातील एका धान पिकाच्या शेतात तीच वाघिण मृतावस्थेत आढळून आली. एका बाजूला वाघिणीचा हल्ला आणि दुसरीकडे तिचा अचानक मृत्यू यामुळे संपूर्ण प्रकरण अधिकच गूढ बनले आहे.

सदर वाघिण अंदाजे ९ ते १० वर्षांची असल्याचे सांगितले जात आहे. तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, तिला अंतर्गत दुखापत झाली होती की अन्य कोणते कारण आहे, याचा तपास वनविभागाकडून सुरू करण्यात आला आहे. शवविच्छेदनासाठी नमुने पाठविण्यात आले असून अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होणार आहे.

या घटनेमुळे आणखी एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे तो म्हणजे वाघिणीच्या तीन बछड्यांचे भवितव्य. आईविना झालेल्या या बछड्यांचा शोध घेणे आणि त्यांचे संरक्षण करणे हे वनविभागासमोर मोठे आव्हान ठरणार आहे.

### 'आपली बस, आपली सेवा' १ मे

स्वतःची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणे हा केवळ औपचारिक भाग नसून प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल. एसटी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी परिपत्रक जारी केले आहे.स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वतः घेणे, तसेच मोठे साहित्य योग्य ठिकाणी ठेवणे यामध्ये प्रवाशांचा सहभाग अपेक्षित धरण्यात आला आहे. तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाईन आरक्षण सुविधा देण्यात आली आहे.

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. प्रवाशांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

### फार्म हाऊसवरील भोंदू खरातचा

खरात शिर्डीतील भूखंड बळकावण्याच्या प्रकरणात फरार असून राहाता न्यायालयाने तिचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे.

खरातला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई : बावनकुळे

भोंदू खरातला मदत करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यावर निश्चितच कारवाई होईल व त्यांना बडतर्फ करण्यात येईल. अंतिम अहवाल प्राप्त होताच कठोर पावले उचलली जातील. तसेच, या प्रकरणात इतर विभागातील अधिकारी सहभागी असतील तरी त्यांची माहिती एसआयटीकडे पाठवण्याचे आवाहन त्यांनी केले. 'कोणीही दोषी सुटणार नाही,' महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.भोंदू अशोक खरातने काळ्या कारनाम्यांनी उभारलेल्या साम्राज्यामागील धागेदोरे आता उलगडू लागले असून, त्याला मदत करणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांवरही कडक कारवाईचे संकेत मिळत आहेत.

खरातकडून हवेतून काजू कतली काढून कोट्यवधींची लूट!

अंधश्रद्धेच्या नावाखाली लोकांची मानसिक फसवणूक करत कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांचा संपूर्ण घटनाक्रम उघडकीस आला असून, समाजमनाला हादरवणारा हा प्रकार ठरत आहे. २०१७ मध्ये एका चार्टर्ड अकाऊंटंटशी संपर्क साधताना खरातने सुरुवातीला अत्यंत विश्वासार्ह वर्तन करत त्याचा विश्वास संपादन केला. त्यानंतर चमत्कार दाखवण्याच्या नावाखाली मोकळा हात दाखवत हवेतून काजू कतली काढल्याचा बनाव केला आणि 'हा प्रसाद', असे म्हणत संबंधित सीएला प्रभावित केले.

### जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी

देऊन सत्कार केला.

या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष मुंबईचे महापौर असतात. तर उपाध्यक्षांची निवड केली जाते. त्यानुसार पदसिद्ध अध्यक्ष तथा मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीत नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांची महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्ष पद निवड ही एक वर्ष कालावधीसाठी असते.

उपाध्यक्ष निवडीनंतर मार्गदर्शन करताना, अध्यक्षीय भाषणात रितू तावडे म्हणाल्या की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शतकी महोत्सवी वर्षात मला महाराष्ट्र महापौर परिषदेच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला आणि सर्व महापौरांना सदस्य पदाचा मान मिळाला.

हा एक प्रकारचा आपला गौरव आहे. सुमारे चार वर्षांनंतर महाराष्ट्र महापौर परिषदेच्या रूपाने राज्यातील महापौरांना देखील आपले हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. सर्व महापौरांचे प्रश्न, मागणी इत्यादी परिषदेच्या माध्यमातून शासनाकडे मांडणार आहे. लवकरच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र महापौर परिषदेची बैठक मुंबईत आयोजित करण्यात येईल. जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी या परिषदेचा लाभ होईल, असे तावडे यांनी नमूद केले.

महाराष्ट्र महापौर परिषदेचे कार्याध्यक्ष रणजित चव्हाण यांनी प्रास्ताविकात सांगितले की, राज्यातील महापौरांना आपले हक्काचे व्यासपीठ मिळण्यासाठी २०१२ मध्ये महाराष्ट्र महापौर परिषदेची स्थापना झाली. शंभर वर्षांपूर्वी म्हणजे सन १९२६ मध्ये अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापना झाली. मुंबईत संस्थेचे मुख्यालय आहे तर देशात ५० ठिकाणी शाखा आहेत. महाराष्ट्र महापौर परिषदेच्या राज्यात २०१२ पासून २२ बैठका झाल्या आणि १०१ ठराव मंजूर झाले. शासनाकडे पाठवलेले काही ठराव मंजूर झाले, तर शासनाकडे प्रलंबित ठराव मंजूर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र महापौर परिषदेच्या माध्यमातून पार पाडण्यात येईल, असे ते म्हणाले.

संस्थेचे मानद संचालक तथा परिषदेचे संयोजक लक्ष्मणराव लटके यांनी महापौरांचे कोणते अधिकार आहेत, कोणते ठराव प्रलंबित आहेत, यासह विविध विषयांची सविस्तर माहिती दिली.

तर, महाराष्ट्र महापौर परिषदेच्या कार्यालयीन सचिव निधी लोके यांनी सर्व महापौरांशी आपसात समन्वय साधण्यासाठी संवाद यंत्रणा स्थापन करण्यात येईल. यापुढे अध्यक्षांच्या परवानगीने सातत्याने बैठक आयोजित केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषद

आली. एकूण ५ पथके आणि २५ कर्मचाऱ्यांनी निवडणूक कामकाज सांभाळले.

मतदारांना ओळख पटवण्यासाठी एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड किंवा पासपोर्ट यांसारखी ओळखपत्रे अनिवार्य करण्यात आली होती. तसेच प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या क्यूआर कोड सुविधेमुळे मतदारांना आपला अनुक्रमांक शोधणे सोपे झाले. शांततामय वातावरणात ही प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

### दर्यापूरमध्ये कॅफेच्या नावाखाली

, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दर्यापूरमध्ये वाढत्या अशा प्रकारांमुळे सामाजिक वातावरण बिघडण्याची भीती व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

### मडघे मंगल कार्यालयासमोर

मोर्शी येथे भरती करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जखमींवर औषधोपचार करून व परिस्थितीचे गांभीर्य पाहून त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.पलटी झालेला ट्रक क्रेनच्या साह्याने उभा करण्याची कार्यवाही उशिरापर्यंत सुरू होती.याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण चिंचोळे पुढील तपास करीत आहे.

### एएसआय अब्दुल कलाम

वर्षांपूर्वी एहसानोद्दीन कुटुंबीयांकडून मुलीच्या लग्नासाठी व्याजदराने पैसे घेतले होते. हे पैसे परतही केले. पैसे परत केल्यानंतरही ते तगादा लावत होते. त्यांनी आपल्या नातेवाईकांसह मिळून अब्दुल कलाम आणि त्यांच्या पत्नीला मारहाण केली होती. याची तक्रार गाडगे नगर पोलीसात स्थलांतर झाली होती. त्यांचे दोन्ही भाऊ पोलीस मध्ये कार्यरत होते. यामुळे आरोपी त्यांच्यावर चिडलेले होते. अशात त्यांनी मिळून २८ जून रोजी अब्दुल कलाम यांची हत्या केली. पोलिसांनी तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. यामधून आरोपी फाजील खान साबीर खान याने जामीन साठी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने त्यांना काही अटी घालून ५० हजार रुपयांच्या मुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. जामीन मिळाल्यावर आरोपीला न्यायालयात प्रत्येक सुनावणीला उपस्थित राहण्याचे म्हटले आहे.त्याला मोबाईल नंबर न बदलण्याचे आदेश दिले आहे.

### ट्रान्सपोर्ट नगरमध्ये दोन

अजहर चायना (वय ३०, रा. पठाण चौक) आणि अब्दुल नफिज अब्दुल हफिज (वय ३२, रा. रहमत नगर) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी आरोपी क्रमांक १ कडून एक पिस्टल मॅगझिनसह एक जिवंत काडतूस जप्त केले. तर आरोपी क्रमांक २ कडून एक लोखंडी कुकरी आणि एक फोल्डिंग प्रकारचा चायना चाकू जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत एकूण २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायद्याअंतर्गत नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

### २८ ला आ. संजय गायकवाड

गायकवाड यांचे वर दाखल करून, अटक करावी . पानसरे खून प्रकरणात गायकवाड यांची सखोल चौकशी करावी व खटल्यात सह आरोपी बनवावे .

सदर मोर्च्याचे आयोजन समस्त शिवप्रेमी , गोविंद पानसरे समर्थक व पुरोगामी संघटनांचे वतीने करण्यात आले असून, मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य, तुकाराम भस्मे, राज्य कार्यकारणी सदस्य ,अशोक सोनारकर ,जिल्हा सचिव सुनील मेटकर ,जिल्हा सहसचिव जे .एम. कोठारी, डॉ.ओमप्रकाश कुटे माटे ,सागर दुर्योधन ,शहर सचिव सुनील घटाळे संजय मंडवधरे, निळकंठ ढोके,"घ्एइ राज्य सचिव प्रतीक्षा ढोके', सतीश चौधरी, संतोष सुरजुसे, शिरीष शेडमाके, प्रकाश सोनोणे ,राहुल मंगळे, पंकज आवारे,धनंजय मस्के ,अनिकेत वाक्पांजर ,शुभम बाळापुरे यांनी केले आहे.

### वरुडच्या 'ताज फ्रुट'ला

गाड्यांना पाचारण करण्यात आले. मध्यरात्रीपासून पाण्याचे शेकडो बंब या आगीवर मारा करत आहेत. आग विझवण्यासाठी दोन राज्यांतील अग्निशमन दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत असून वृत्त लिहेपर्यंत आग धुमसतच होती.

शॉर्टसर्किटचा प्राथमिक अंदाज-

घटनेची माहिती मिळताच वरुड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी परिसरात तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे अधिकृत कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, प्राथमिक स्तरावर शॉर्टसर्किटमुळे ही दुर्घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### स्पीड ब्रेकर्सवर अपघात

दूरध्वनीवरून प्राप्त झाली. लगेच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण चिंचोले व त्यांची अधिनस्त पोलीस चमू यांनी घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमी अवस्थेत पडून असलेल्या विघ्नेश्वरला तात्काळ उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जखमींवर प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले.विघ्नेश्वर याच्या डोक्याला गंभीर मार बसल्यामुळे प्रचंड रक्तस्राव झाल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलल्या जात असून तो जीवन मरणाशी संघर्ष करीत आहे.याप्रकरणी पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

### उन्हाच्या काहिलीने विद्यार्थी

आली. तर एका केंद्रावर विद्यार्थ्यांनी पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नसल्याची तक्रार केली. 'भर उन्हात परीक्षा देताना पाणीही मिळाले नाही,' अशी खंत विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

काही परीक्षा केंद्रे टीनपत्र्यांच्या शाळांमध्ये असल्याने उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत होती. परीक्षा संपवून बाहेर पडणारे विद्यार्थी जणू भट्टीतून बाहेर आल्यासारखे दिसत होते.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर शाळांच्या वेळा सकाळी ७ ते १० या कालावधीत ठेवण्याचे आदेश दिले असताना, परीक्षा मात्र दुपारच्या सत्रात घेण्यात आल्याने पालकांनी संताप व्यक्त केला. यावेळी बाहेर गावाहुन परीक्षेस आलेल्या विद्यार्थ्यांच्या पाल्यांना शाळा बाहेरील परीसरात झाडा, झुडपांचा ईमारतींच्या सावलीचा आधार घेत वेळ काढावा लागला 'एसीमध्ये बसून आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्यांना उन्हाची झळ कशी कळणार?' असा सवालही पालकांनी उपस्थित केला. या सर्व बाबतीत जिल्हा प्रशासन संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करते याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

याबाबत गटशिक्षणाधिकारी शीला आठवले यांनी सांगितले की, 'प्रत्येक परीक्षा केंद्रावर थंड पाण्याच्या कॅनची व्यवस्था करण्यात आली होती. ज्या ठिकाणी सुविधा उपलब्ध झाल्या नसतील, त्या केंद्रांची चौकशी केली जाईल.'

### डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय

वक्ता डॉ राजू डांगे यांचा डॉ योगेश गोडे सीईओ तसेच डॉ. जैन मॅडम (डीन), डॉ हातकर संचालक व डॉ नीरज मुर्के यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला.

याप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. आशिष ढवळे नेत्रतज्ञ व डॉ. कोटावाला मॅडम नेत्र विभागप्रमुख, तसेच अहिल्या महिला परिषदेचे संस्थापक डॉ सुधाकरराव काळमेघ, राजेंद्र मस्के, डॉ राजू डांगे, अहिल्या महिला परिषदेच्या अध्यक्ष नीता टेकाळे , सचिव वर्षा लांभाडे ,पूर्वाध्यक्ष साधना मस्के,प्रेमा लव्हाळे,शारदा ढवळे , पद्मा फुटाणे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच नेत्र विभागाचे वैद्यकीय अधिकारी कर्मचारी वृंद मोठ्या संख्येत उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### दिल्ली विमानतळावर विमानाच्या इंजिनाला आग ६ प्रवासी जखमी

**दिल्ली**-आयजीआय विमानतळावर स्विस एअरच्या एलएक्स



१४७ या विमानाच्या टेकऑफदरम्यान विमानाच्या इंजिनमध्ये अचानक बिघाड होऊन आग लागल्याची घटना घडली. या घटनेत किमान ६ प्रवासी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, वैमानिक आणि ग्राउंड स्टाफच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली.सूत्रांच्या माहितीनुसार, स्विस एअरचे हे विमान दिल्लीहून आपल्या गंतव्यस्थानी रवाना होण्याच्या तयारीत होते. विमान धावपट्टीवर वेग घेत असतानाच त्याच्या एका इंजिनमधून असामान्य आवाज येऊ लागला आणि क्षणार्धात त्यातून आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. स्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने तात्काळ टेकऑफ थांबवला आणि एअर ट्रॅफिक कंट्रोलला माहिती दिली. त्यानंतर विमानतळावरील अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा त्वरित सक्रिय झाल्या. काही मिनिटांतच आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आणि विमान सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. या दरम्यान विमानातील प्रवाशांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. अपघातात ६ प्रवासी किरकोळ जखमी झाल्याचे सांगितले जात असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत.विमानतळ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, विमानातील सर्व प्रवासी आणि क्रू सदस्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. सुरक्षेचे सर्व निकष पाळून संपूर्ण बचावकार्य पार पाडण्यात आले.



### आता शाळेत विद्यार्थ्यांना १० मिनिटे वृत्तपत्र वाचन बंधनकारक

**कर्नाटक**-राज्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. आता सर्व शाळांमध्ये दररोज सकाळच्या प्रार्थनेनंतर विद्यार्थ्यांना किमान १० मिनिटे वर्तमानपत्र वाचन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा आदेश शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून जारी करण्यात आला आहे.या उपक्रमाचा प्रस्ताव डिसेंबर महिन्यात कर्नाटक राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने शिक्षण विभागाकडे पाठवला होता. त्यानंतर विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी या प्रस्तावाचा अभ्यास करून अंमलबजावणीचे निर्देश दिले.विद्यार्थ्यांनी दररोज १० ते १५ मिनिटे वर्तमानपत्र वाचण्याची सवय लावल्यास भविष्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास मदत तर होईलच. तसेच चालू घडामोडींचे ज्ञान, शब्दसंपदा, भाषाशैली आणि लेखन कौशल्य सुधारण्यास मदत होईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर प्राथमिक शिक्षण संचालकांनी सर्व शाळांना सकाळच्या प्रार्थनेनंतर दररोज १० मिनिटे कन्नड वर्तमानपत्र वाचन अनिवार्य करण्याचे आदेश दिले आहेत. हा नियम राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांसह निवासी शाळा, वसतिगृहे आणि विविध शासकीय विभागांतर्गत चालणाऱ्या बालसंवर्धन संस्थांनाही लागू असेल.

### नक्षलवादी महिला कमांडरची शरणागती

**गडचिरोली**-पाच लाखांचे बक्षीस असलेली नक्षलवादी महिला



कमांडर उर्मिला ऊर्फ टेटकी अखेर पोलिसांसमोर शरण आली. उर्मिलाच्या या निर्णयाने नक्षली चळवळीला मोठा धक्का बसला आहे. रावघाट परिसरातील कमिटीमध्ये ती कमांडर पदावर सक्रिय होती. तसेच तिच्यावर सरकारने पाच लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. शरणागतीनंतर चौकशीत उर्मिलाने पोलिसांना महत्त्वाची माहिती दिली आहे.



### तीन दिवसांत ९० हजार भाविकांचे केदारनाथ दर्शन

**केदारनाथ**-केदारनाथ धामचे कपाट उघडल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत ९० हजारांहून अधिक भाविकांनी बाबा केदारनाथचे दर्शन घेतले आहे. भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून 'हर हर महादेव', 'बम बम भोले' असा जयघोष भाविकांकडून केला जात आहे. पहिल्या दिवशी ३८ हजार, दुसऱ्या दिवशी २५ हजार तर तिसऱ्या दिवशी ३० हजारांहून अधिक भाविकांनी बाबा केदारनाथचे दर्शन घेतले आहे.

# राज्यातील २३ अध्ययन अक्षमता केंद्रांचे कामकाज ठप्प

## अपंगत्व प्रमाणपत्र मिळणे कठीण



**नागपूर**-अपंग मुलांसाठी महत्त्वाची असलेली अध्ययन अक्षमता केंद्रे बंद पडली आहे. ३८ पैकी २३ केंद्रांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. त्यामुळे शेकडो मुलांना अपंगत्व प्रमाणपत्र मिळणे कठीण झाले आहे. परिणामी, त्यांच्या शिक्षण व भविष्यातील नोकरीच्या संधींवर गंभीर परिणाम होत आहे.

अध्ययन अक्षमता तपासणी व प्रमाणपत्र ही प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक आहे. याच आधारावर शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती आणि आरक्षणाचा लाभ मिळतो. मात्र, २३ केंद्रे बंद असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा सवलती आणि पुढील शिक्षण धोक्यात आले आहे. ही केंद्रे २०१८ मध्ये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व जिल्हा रुग्णालयांमध्ये उच्च न्यायालयाने दिलेले आदेश व तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या पुढाकारातून सुरू झाली होती. त्यावेळी त्यांनी दोन सदस्यांची समिती गठीत केली होती. त्यात अशासकीय सदस्य म्हणून सोहम फाउंडेशनचे संजय अवचट यांना घेतले होते. समितीने राजभरातील अभ्यास करून प्रमाणपत्र सुरू केले. केंद्रांचा उद्देश अपंग मुलांना त्यांच्या जिल्ह्यातच तपासणी व प्रमाणपत्र मिळावे, हा होता. त्यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला होता.

मानसशास्त्रज्ञ, विशेष शिक्षक आणि ऑडिओलॉजिस्ट या तज्ज्ञांची कमतरता असल्याने अनेक केंद्रे बंद पडली आहे. या केंद्रातील पदे २०१८ पासून कंत्राटी पद्धतीने किंवा इतर विभागांतून तात्पुरत्या स्वरूपात भरली जात होती. मात्र, मानधनात वाढ न झाल्याने अनेक तज्ज्ञांनी नोकरी सोडली. परिणामी, २३ केंद्रांमध्ये प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबली आहे. अपंगत्व प्रमाणपत्राशिवाय शैक्षणिक सवलती, विशेष परीक्षा सुविधा आणि शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षणाचा लाभ मिळत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अनिश्चित झाले आहे. या विषयावर वैद्यकीय शिक्षण खात्याचे आयुक्त अनिल भंडारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

पूर्वी अध्ययन अक्षमता प्रमाणपत्रासाठी मुंबईला जावे लागत होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आणि तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये राज्यभर ३८ केंद्रांमधून ही सेवा सुरू झाली. त्यामुळे जिल्हास्तरावरच प्रमाणपत्र मिळू लागले. मात्र, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाने सध्या राज्यात सर्वत्र केंद्रांवर तज्ज्ञांच्या अभावामुळे २३ केंद्रांचे कामकाज ठप्प झाले आहे. या मुलांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाने तातडीने ही केंद्रे सुरू करावीत असे संजय अवचट, यांनी सांगितले.

# शिवाजी महाराजांचा अपमान करणे हे भाजपचे धोरण

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

**मुंबई**-भोंदूबाबा धीरेंद्र शास्त्रीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेले विधान अत्यंत आक्षेपार्ह असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत हा अशास्त्री बरळला तरीही त्यावर या नेत्यांनी साधा निषेधही नोंदवला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणे हे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय धोरण असून महाराजांचे विचार तसेच कर्तृत्व त्यांना मान्य नाही, अशी घणाघाती टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी नागपूरमध्ये बोलताना शिवाजी महाराजांच्याविषयी वादग्रस्त विधान केले. यानिमित्ताने सकपाळ यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना भाजप, आरएसएस आणि धीरेंद्र शास्त्रीचा समाचार घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान महाराष्ट्र कदापि सहन करणार नाही. महाराजांचा अपमान केल्याबद्दल धीरेंद्र शास्त्री, देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि मोहन भागवत यांनी महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी, अशी मागणीही त्यांनी केली.



छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या विचारांनी देशाला आणि महाराष्ट्राला दिशा दिली आहे. हिंदवी स्वराज्याचे विचारच संविधानातही आहेत. हाच विचार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व भाजप, संघाला मान्य नसल्याने छत्रपती शिवाजी महाराजांची सातत्याने बदनामी करणे, त्यांचा अपमान करणे आणि महाराजांच्या इतिहासाची विकृत मांडणी करणे हे भाजप, संघाचे राष्ट्रीय धोरण आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.

काळी टोपीवाले भगतसिंह कोश्यारी, मंत्री मंगल प्रभात लोढा, भाजप प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी, राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर, छिंदम या भाजपच्या मंडळींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल गरळ ओकली. पण त्यांच्यावर कारवाई झाली नाही. तर जय भगवान गोयल या भाजपा नेत्याने 'आज के शिवाजी: नरेंद्र मोदी', नावाचे पुस्तक लिहून महाराज आणि मोदींची तुलना केलेली आहे, याचा संताप जनतेमध्ये आहे, असेही त्यांनी म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे भूषण आहेत. त्यांच्याबद्दल भोंदूबाबा धीरेंद्र शास्त्री अपमानकारक बोलत असताना फडणवीस, गडकरी आणि मोहन भागवत यांनी त्याला थांबवले पाहिजे होते. शिवाजी महाराजांबद्दल अशी अवमानकारक वक्तव्ये करणाऱ्या लोकांवर सरकार कारवाई करत नसल्याने चुकीचा संदेश जात आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# मराठी विरोधी गटावर मुख्यमंत्र्यांनी कारवाई करावी

## संजय राऊत यांची मागणी

मुंबई-परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सीचालकांना यापुढे प्रवाशांसोबत मराठी भाषेतून बोलावे लागणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या महाराष्ट्र दिनापासून (१ मेपासून) केली जाणार असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. मात्र या निर्णयाला विरोध करण्यासाठी सरकारमध्येच दोन गट पडल्याचे दिसून आले. यावरून शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे मराठी विरोधी गटावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. रविवारी माध्यमांशी बोलताना राऊत म्हणाले की, सरकारमध्ये मराठीच्या मुद्द्यावरती दोन गट पडता कामा नयेत. हे मराठी राज्य आहे, काही दिवसात १ मे महाराष्ट्र दिन येतो आहे.



१०६ हुतात्मे मराठी आहेत ज्यांनी या महाराष्ट्रासाठी रक्त सांडलय. अशा वेळेला मराठीच्या मुद्द्यावर जर दोन गट पडत असतील तर मराठी विरोधी जो गट आहे त्यांच्यावरती मुख्यमंत्र्यांनी कारवाई केली पाहिजे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली. दुसरीकडे मुंबईतील केईएम रुग्णालयाच्या नामकरणावरून वाद निर्माण झाला आहे. रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार नाव न बदलता रुग्णालयाची दुरूस्ती करण्याची मागणी केली.

# 'आरोग्य उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालया'पर्यंत सर्व आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन!

**मुंबई**-राज्यातील आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या, रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, महिला आरोग्य समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती, या समित्यांची जबाबदारी महत्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगली व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी या सर्व समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकाना विविध योजनांच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिल्या जातात. या सर्व लोकहिताच्या योजनाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात व नागरिकाना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आरोग्य समित्यांची भूमिका महत्वाची असते.ग्रामीण भागासाठी 'ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती' व शहरी भागासाठी 'महिला आरोग्य समिती' कार्यरत आहे. या समित्या स्वच्छता, पोषण, पाणीपुरवठा, तसेच प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात महत्वाची भूमिका बजावत असतात. त्याचप्रमाणे जन आरोग्य समिती व रुग्ण कल्याण समिती या समित्या आरोग्य संस्थांमध्ये रुग्णकेंद्रित सेवा, सेवेची गुणवत्ता व निधीच्या पारदर्शक वापरासंबंधी लक्ष ठेवण्याची भूमिका बजावतात.

ग्रामीण भागासाठी कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य पाणीपुरवठा स्वच्छता समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य (प्राधान्याने महिला), बचत गट, तरुण मंडळ, वन सुरक्षा समिती,महिला मंडळ,सामाजिक संस्था, गरोदर माता, स्तनदा माता, तीनवर्षा पर्यंतचे मुल असलेली माता व शासकिय रुग्णालयात आरोग्य सेवा घेणारे किंवा बरे झालेले दिर्घकालीन आजाराचे रुग्ण यांचा सदस्य म्हणून समावेश असणे अपेक्षितआहे. शहरी भागासाठी कार्यरत असलेल्या महिला आरोग्य समितीमध्ये समाजकल्याण, सामाजिक बांधिलकी व नेतृत्व कौशल्य असलेल्या स्थानिक झोपडपट्टी भागातील जास्तीत जास्त वीस महिला सदस्यांचा समावेश अपेक्षित आहे. ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रा अंतर्गत जन आरोग्य समिती कार्यरत आहे.

# बेकायदेशीरपणे लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्यांकडून ११ कोटी वसूल

## अपात्र असूनही लाभ घेण्यात शासकीय कर्मचारी आघाडीवर

**मुंबई**-महाराष्ट्र शासनाच्या 'लाडकी बहिण' योजनेत गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर सरकारने मोठी कारवाई करत आतापर्यंत सुमारे ११ कोटी रुपये अपात्र लाभार्थ्यांकडून वसूल केले आहेत. विशेष म्हणजे, या वसुलीपैकी मोठी रक्कम शासकीय कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात आली आहे. अनेक शासकीय कर्मचारी हे पात्र नसतानाही त्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. इंडियन एक्सप्रेसने याबाबत वृत्त दिले आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कारवाई सुरू झाल्यानंतर काही लाभार्थ्यांनी स्वतःहून या योजनेची रक्कम परत केली, तर काहींनी स्वतःहून योजनेतून आपली नावे काढून घेतली. मात्र, ओळख पटूनही पैसे परत न करणाऱ्यांविरोधात वसुली प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. काही कर्मचाऱ्यांवर वेतन रोखणे, बढती थांबवणे आणि वार्षिक मूल्यांकनावर परिणाम करणे अशी शिस्तभंगात्मक कारवाईही करण्यात येत आहे. अनेक प्रकरणांमध्ये थेट पगारातून रक्कम वसूल करण्यात येत असल्याची बाब समोर आली आहे.

या प्रकरणात सुरुवातीला सुमारे २,४०० शासकीय कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचे समोर आले होते. मात्र, माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार किमान १२,९१५ शासकीय कर्मचाऱ्यांनी दरमहा १,५०० रुपयांचा लाभ घेतल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.महिला व बाल विकास विभागाने २९ जुलै २०२५ रोजी काढलेल्या पत्रानंतर या प्रकरणात कारवाईला वेग आला. पात्र नसतानाही लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर ग्रामीण विकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांना वसुली आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले.याआधीही या योजनेतील गैरप्रकार मोठ्या प्रमाणात असल्याचे समोर आले होते. ऑक्टोबर महिन्यात किमान १६४.५२ कोटी रुपये चुकीच्या पद्धतीने वितरित झाल्याचे उघड झाले होते. यात १२,४३१ पुरुष आणि ७७,९८० अपात्र महिलांचा समावेश होता.

तपासणी अधिक कडक केल्यानंतर सुमारे ५७ लाख लाभार्थ्याना योजनेतून वगळण्यात आले होते. त्यापूर्वी जवळपास २६ लाख लाभार्थी संभाव्य अपात्र असल्याचे आढळून आले होते आणि २६.३४ लाख खात्यांवरील पैसे पडताळणी पूर्ण होईपर्यंत थांबवण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी या या गैरप्रकारांना हा केवळ हिमनगाचा टोक असल्याचे म्हटले होते.जून २०२४ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जातात. सध्या या योजनेचे १.५७ कोटी लाभार्थी असून राज्याने यासाठी ३६,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.दरम्यान, पुरुष लाभार्थ्यांकडून वसुलीबाबत अद्याप नोटिसा जारी करण्यात आलेल्या नसल्याची माहिती समोर आली आहे. याच




पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी ई-केवायसी पडताळणीची अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आल्याची घोषणा केली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ मार्चपर्यंत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला असून, पात्र लाभार्थ्यांना नोंदी नियमित करण्याची ही अंतिम संधी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# लग्नपत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करावी

## बालविवाह रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची शिफारस



**मुंबई**-महाराष्ट्रात वाढत्या बालविवाहांच्या घटनांवर गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी राज्य सरकारला महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत. सोलापूरमध्ये ८६ अल्पवयीन मुलींच्या गर्भधारणेच्या प्रकरणांनंतर आयोगाने लग्नपत्रिकांवर वधू-वरांची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याची मागणी केली आहे. हिंदुस्थान टाईम्सने याबाबत वृत्त दिले आहे.

एका स्वयंसेवी संस्थेमार्फत समोर आलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ या कालावधीत सोलापूर महानगरपालिकेच्या शासकीय रुग्णालयांमध्ये ८६ अल्पवयीन मुलींची प्रसूती नोंदवण्यात आली. मात्र, बालविवाह आणि लैंगिक अत्याचारासंदर्भातील कायदे अस्तित्वात असूनही प्रशासनाने कोणतीही तक्रार नोंदवली नाही किंवा कारवाई केली नाही, अशी गंभीर बाब उघड झाली आहे. यानंतर सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश देत संबंधित मुलींचे वय पडताळण्यासह त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झाला आहे का, याची तपासणी करण्यास सांगितले. आतापर्यंतच्या तपासात ३५ मुली अल्पवयीन असून त्यांचे बालविवाह झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणावर वरळी येथील कार्यालयात सुनावणी घेतल्यानंतर आयोगाने दोषींवर गुन्हे दाखल करण्यासह भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली विशेष संयुक्त पथक स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे पथक सर्व ८६ प्रकरणांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करणार आणि कठोर कारवाई सुचवणार आहे. आयोगाचे सदस्य संजय लाखे-पाटील यांनी सांगितले की, 'या प्रकरणात लैंगिक अत्याचार, बालविवाह प्रतिबंधक कायदा, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा आणि किशोर न्याय कायदा यांचे उल्लंघन झाले आहे का, याचा सर्वंकष तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ४५ दिवसांत अहवाल सादर करावा लागणार असून आयोग लवकरच सोलापूर दौऱ्यावर जाणार आहे.'

दरम्यान, महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आयोगाच्या सूचना बंधनकारक नसल्या तरी त्यांना अधिकृत महत्त्व असून त्यावर कारवाई अपेक्षित असते. आयोगाला चौकशीचे आदेश देणे, व्यक्तींना समन्स पाठवणे आणि कागदपत्रांची मागणी करणे असे अधिकारही आहेत.

ही माहिती महात्मा फुले समाज सेवा मंडळ या बालविवाह व बालमजुरीविरोधात काम करणाऱ्या संस्थेला पाठवलेल्या पत्रातून समोर आली. संस्थेचे अध्यक्ष प्रमोद झिंजाडे यांनी सांगितले की, 'या प्रकरणात गावपातळीपासून ते रुग्णालयांपर्यंत अनेक ठिकाणी गंभीर निष्काळजीपणा दिसून आला आहे. कायद्यानुसार अशा प्रकरणांची नोंद करणे आवश्यक असतानाही ती करण्यात आली नाही.'दरम्यान, अक्षय तृतीया या विवाहासाठी शुभ मानल्या जाणाऱ्या दिवशी (१९ एप्रिल) राज्य सरकारने विशेष मोहिम राबवून राज्यभरात ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २७ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## सार्वजनिक शौचालये ठरली 'शोभेची वास्तू'



■ प्रतिनिधी/खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत दिग्रस बु. येथे शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेली सार्वजनिक शौचालये वापराअभावी निष्प्रभ ठरत असून, लाखोंचा खर्च अक्षरशः पाण्यात गेल्याचे चित्र समोर आले आहे. गावातील स्वच्छता राखण्यासाठी व उघड्यावर शौचास जाण्याची प्रथा बंद करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या या सुविधांकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत बांधण्यात आलेली ही शौचालये आजही बंद अवस्थेत पडून आहेत. पाणीपुरवठ्याचा अभाव, अस्वच्छ परिसर आणि नियमित देखभालीचा अभाव यामुळे नागरिकांनी या शौचालयांकडे पाठ फिरवली आहे. शौचालयांच्या परिसरात कचऱ्याचे ढिग साचलेले असून, स्वच्छतेसाठी कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याचे दिसून येते. विशेषतः महिलांना याचा मोठा फटका बसत असून, सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना पुन्हा उघड्यावर जाण्याची वेळ येत आहे. शासनाकडून 'हागणदारीमुक्त गाव' उपक्रमांतर्गत जनजागृती, दंडात्मक कारवाई तसेच 'गुड मॉर्निंग पथक' यांसारखे उपक्रम राबविण्यात आले असले, तरी दिग्रस बु. येथे त्याचा अपेक्षित परिणाम दिसत नाही.

दरम्यान, या प्रकाराकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन शौचालयांसाठी पाणीपुरवठा, स्वच्छता व देखभाल व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

'गावात सार्वजनिक शौचालये अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आली; मात्र ती केवळ शोभेची वस्तू ठरली आहेत. संबंधित ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास महिलांची गैरसोय टळेल.'

– **राजू शालीग्राम गवई,**
माजी ग्रामपंचायत सदस्य, दिग्रस बु.

# कचरा डेपोला आग; धूराने महामार्ग झाकला

■ प्रतिनिधी/मुर्तिजापूर ■

शहरातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या डम्पिंग ग्राउंडला लागलेल्या आगीमुळे मुर्तिजापूर परिसरात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. २४ च्या रात्री अचानक पेटलेल्या कचऱ्यामुळे दाट धुराचे लोट महामार्गावर पसरले. त्यामुळे काही काळ वाहनचालकांना रस्ता दिसेनासा झाल्याने वाहतूक धोक्यात आली.

स्थानिकांच्या मते, वाऱ्याच्या वेगामुळे जळणारा कचरा व कागदाचे तुकडे दूरवर उडत होते. त्यामुळे आग अधिक पसरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली. डम्पिंग ग्राउंडच्या आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांनी रात्रीभर अस्वस्थता अनुभवली.

आगीमुळे निर्माण झालेल्या धुरामुळे अनेकांना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ, घसा खवखवणे अशा तक्रारी जाणवत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा मोठा फटका बसत असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, ही आग नेमकी कशी लागली याबाबत स्पष्टता नसून, कचरा जाणीवपूर्वक जाळला गेला का, याबाबतही चर्चा रंगत आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या दिवशीही आग पूर्णपणे विझलेली नव्हती. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आग विझवण्यासाठी प्रशासनाकडून ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. पोलिसांनी मात्र घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.



### कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्यावर प्रक्रिया होत नसल्याचे चित्र असून, यासाठी उभारण्यात आलेली यंत्रसामग्री निष्क्रिय अवस्थेत असल्याचे दिसते. माहिती देण्याबाबत नगरपालिकेकडून टाळाटाळ होत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, शहरात विकासकामांवर मोठ्या प्रमाणात खर्च झाल्याचे सांगितले जात असले तरी कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा व सांडपाणी यांसारख्या मूलभूत सुविधा अद्याप अपुऱ्या असल्याचे स्पष्ट होते. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या इसमास रंगेहाथ पकडले

■ प्रतिनिधी/वाशिम ■

तालुक्यातील मनभा परिसरात कारंजा ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत एका इसमाला गांजा सेवन करताना रंगेहात पकडले. ही कारवाई २१ एप्रिल रोजी करण्यात आली असून आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेख गुलाम शेख हबीब (वय ५५, रा. मनभा) हा इसम गावाजवळील परिसरात गांजा सेवन करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारंजा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोउपनि स्वप्नील चव्हाण यांच्या पथकाने घटनास्थळी धाड टाकली. या कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातून काळ्या रंगाची पिशवी, त्यामध्ये पांढऱ्या कापडात गुंडाळलेला ओलसर हिरवट रंगाचा अर्धवट जळालेला मादक पदार्थ (गांजा) तसेच माचीसची पेटी असे साहित्य जप्त करण्यात आले. हा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करून सीलबंद करण्यात आला असून पुढील तपासासाठी रासायनिक विश्लेषणाकडे पाठविण्यात येणार आहे. आरोपी हा मादक पदार्थ सेवन केलेल्या अवस्थेत आढळून आल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेऊन उपजिल्हा रुग्णालय, कारंजा येथे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. यावेळी त्याचे रक्त व लघवीचे नमुने घेण्यात आले. या प्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि स्वप्नील चव्हाण करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रवीण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस हवालदार दीपक ढोबळे, छोटे पपुवाले आणि तुषार भोयर यांचा समावेश होता.

## दोन वर्षांपासून फुटलेली जलवाहिनी दुरुस्त होईना

■ प्रतिनिधी/वाशिम ■

तालुक्यातील धनज कारंजा या मुख्य मार्गावरील पाणीपुरवठा योजनेतील गंभीर त्रुटींमुळे भामदेवी परिसरात नागरिकांचे जीवन अक्षरशः धोयात आले आहे. सरकारी विहिरीतून सुरू झालेल्या या पाणीपुरवठा योजनेत अवघ्या आठ दिवसांतच मोठे लिकेज निर्माण झाले होते. मात्र, या समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाने तब्बल दोन ते अडीच वर्षे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या सततच्या लिकेजमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून खड्डे निर्माण झाले आहेत. परिणामी, त्या खड्ड्यात बस व ट्रकसारख्या जड वाहनांचे टायर अडकण्याच्या घटना घडत असून, दररोज दोन ते तीन दुचाकीस्वार अपघातग्रस्त होत आहेत. तरीही ग्रामपंचायत संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, रस्त्यावर साचलेले दूषित पाणी पुन्हा त्याच पाइपलाइनमधून विहिरीत मिसळून नागरिकांना पिण्यासाठी पुरवले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे संपूर्ण गावाच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला असून, संसर्गजन्य आजारांचा फैलाव होण्याची भीती व्यक्त होत आहे. शिवाय, दररोज लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत असल्याने शासनाच्या निधीचाही मोठ्या प्रमाणात अपहार होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांनी यासंदर्भात अनेक वेळा सरपंच, ग्रामसेवक आणि सचिव यांना निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, सत्ताधाऱ्यांचा कार्यकाळ संपत आला असतानाही या ज्वलंत प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांचा संताप आता टोकाला पोहोचला आहे. परिणामी सत्ता आहे, पण जबाबदारी नाही का? असा संतप्त सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करून लिकेजची समस्या कायमची सोडवावी, अशी मागणी केली आहे.तसेच, हा जीवघेणा प्रश्न आणखी किती दिवस सहन करायचा, असा थेट सवालही ग्रामस्थांनी दिला असून, लवकरात लवकर ठोस उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## 20 लाखांची इमारत, 40 लाखांची दुरुस्ती ! वाशिममध्ये निधी उधळपट्टीचा प्रकार उघड

■ प्रतिनिधी/वाशिम ■

वाशिमच्या कारंजा तालुक्यातील कामरगाव इथे शासकीय निधीच्या उधळपट्टीचा अजब प्रकार समोर आला आहे.

ग्रामपंचायत ने २० लाख रुपये खर्च करून नवी इमारत उभारली असताना, याच इमारतीवर किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली वाशिमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने तब्बल ४० लाख रुपये खर्च केल्याचा अजब प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नागरिकांनी संताप व्यक्त केला असून चौकशीची मागणी करण्यात आली आहे. वाशिमच्या कारंजा तालुक्यातील कामरगाव येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत जीर्ण झाली होती. त्यामुळे त्याची दखल घेत तात्पुरत्या स्वरूपात ग्रामपंचायतीने नव्यानेच उभारलेल्या महिला बचत गट माल विक्री केंद्रात स्थलांतरित करण्यात आली. रुग्णालयाने विविध विभागात पार्टिशन करण्यासाठी सार्वजनिक विभागाकडे मागणी करण्यात केली आणि या मागणीची पूर्तता देखील करण्यात आली.या मागणी नंतर, इमारतीत या विभागाने अल्युमिनियम आणि काचेचे साहित्य वापरून भिंती उभारल्या, तसेच दुसरी काही किरकोळ कामे करण्यात आली. या कामासाठी वाशिमच्या सार्वजनिक विभागाने तब्बल ४० लाख रुपये उधळले असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाला हा शासकीय निधी कमी खर्च झाला की काय? असं वाटतं असताना, अजून या इमारतीच्या बाहेरील काही कामे करण्यासाठी आणखीन ६० लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय पैशाच्या उधळपट्टीवर नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, या कामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## वाकलेला विद्युत खांबामुळे अपघाताची शक्यता....

■ प्रतिनिधी/वाशिम ■

तालुक्यातील गोंडेगाव येथील श्री गजानन महाराज मंदीरासमोरील विद्युत खांब पुर्णपणे वाकला असून, त्यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर खांब काढून त्याठिकाणी नविन खांब बसविण्याची मागणी गोवर्धन चौधरी यांनी वीज वितरण कंपनीकडे निवेदनातून केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, मी श्री संत गजानन महाराज मंदीरासमोर राहतो. माझ्या घरासमोरील विद्युत खांब हा पुर्णपणे वाकला असून तो निर्जीव झाला आहे. सुसाट्याचा वारा असल्यास तो खांब उन्मळून किंवा मोडून पडण्याची शक्यता आहे. सदर विद्युत खांबावरुन जीवंत विद्युत प्रवाह सुरू आहे. त्यामुळे मोठी



दुघटना होवून जिवीतहानी होऊ शकते. तो खांब बदलून त्याठिकाणी नविन खांब बसविण्याची मागणी गोवर्धन चव्हाण यांनी निवेदनातून केली आहे.

## बापच झाला वैरी : पैशांसाठी १५ वर्षीय मुलीला ढकलले नराधमाच्या दारी

■ प्रतिनिधी/वाशिम ■

ज्या बापाने लेकीचे रक्षण करायला हवे, त्याच बापाने पोटच्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला नराधम नातेवाईकाच्या हवाली करण्याचा धक्कादायक प्रकार रिसोड तालुक्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीवरून रिसोड पोलिसांनी नराधम पिता आणि विनयभंग करणाऱ्या नातेवाईकावर पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही मूळची परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील रहिवासी आहे. सद्यस्थितीत ती आपल्या वडिलांसह रिसोड तालुक्यातील एका गावात वास्तव्यास आहे.

२२ एप्रिल रोजी रात्री ९:३० वाजताच्या सुमारास तिच्या वडिलांनी तिला लज्जास्पद मागणी केली. 'तू माझ्या नातेवाईकासोबत जा, तो तुला जास्त पैसे देतो,' असे म्हणत स्वतःच्याच मुलीला पैशांच्या लोभापोटी दलदलीत ढकलण्याचा प्रयत्न केला. पीडितेने वडिलांच्या या म ागणीला स्पष्ट नकार दिला. मात्र, त्याच वेळी तेथे उपस्थित असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील नातेवाईकाने पीडितेचा उजवा हात धरून तिचा विनयभंग केला. या भयावह प्रसंगानंतर पीडित मुलीने न डगमगता २३ एप्रिल रोजी रिसोड पोलीस स्टेशन गाठले आणि आपबिती सांगितली. पीडितेच्या फिर्यादीवरून रिसोड पोलिसांनी तिचे वडील आणि सेनगाव येथील संबंधित नातेवाईक अशा दोघांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ७४ सह पोक्सो कायदा कलम ८ व १७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या संवेदनशील प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

## जिजाऊ हॉस्पिटलचे थाटात स्थलांतर व उद्‌घाटन

■ प्रतिनिधी/रिसोड ■

शहरात गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने रुग्णसेवा देत नावारूपास आलेल्या जिजाऊ हॉस्पिटल (प्रसूती व स्त्री रुग्णालय) चे नवीन इमारतीत स्थलांतर व भव्य उद्‌घाटन सोहळा २५ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. बसस्थानकासमोर, डॉ. साबू यांच्या हॉस्पिटलजवळ आयोजित या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार अनंतराव देशमुख होते. यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार शाम खोडे, माजी आमदार विजयराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, वाशीम नगरपालिकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, तहसीलदार प्रतीक्षा



तेजनकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच संतवर्गातील बालयोगी गोपालनाथ महाराज, शांतिपुरी महाराज, सुरेशजी महाराज, किसन स्वामी महाराज यांचीही उपस्थिती लाभली.

उद्‌घाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व गणेशपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर डॉ. अमोल नरवाडे, सौ. करुणा नरवाडे व नरवाडे परिवारातर्फे उपस्थित मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अमोल नरवाडे यांनी केले.

यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणांतून नरवाडे दाम्पत्याच्या निस्वार्थ सेवाभावाचे कौतुक केले. गेल्या दशकभरात त्यांनी दिलेल्या वैद्यकीय सेवेमुळे समाजात विश्वास निर्माण झाला असून, आज स्वतःच्या भव्य इमारतीत स्थलांतर हे त्यांच्या कष्ट, संस्कार आणि समर्पणाचे फलित असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.


कार्यक्रमाचे संचालन डॉ. जितेंद्र गवळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. करुणा नरवाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉक्टर असोसिएशनच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नरवाडे दाम्पत्याचे अभिनंदन केले.

# स्मार्टफोनच्या अतिरेकी वापरामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता मंदावली... !

### करमणूक म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्मार्टफोनमुळे त्रास

■ प्रतिनिधी/वाशिम ■

अलीकडे स्मार्टफोन मुलांना सहज उपलब्ध झाल्याने त्याचा वापर अभ्यासाऐवजी करमणुकीसाठी जास्त केला जात आहे. स्मार्टफोनच्या अतिरेकी वापरामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी होऊन त्याचा परिणाम अभ्यासावर होत असल्याचे समोर आले आहे. मुलांना ऑनलाईन अभ्यासाच्या नावाखाली पालक वर्ग स्मार्टफोन विकत घेऊन देतात. मात्र, मुले त्याचा वापर गेम खेळणे, रिल्स पाहणे, सोशल मीडियावर



चॅटिंग करणे यासाठी जास्त करतात. दिवसातील ६ ते ७ तास मुले स्मार्टफोनवर घालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांची अभ्यासातील गोडी कमी होऊन परीक्षेतील गुणांवरही परिणाम होत आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चिडचिडेपणा, झोपेच्या समस्या, डोळ्यांचे विकार आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. सतत स्क्रीनकडे पाहिल्याने मुलांची सृजनशीलताही कमी होत होत असल्याचे तज्जांचे मत आहे. शिक्षकांचे म्हणणे आहे की, वर्गातही मुले लक्ष देत नाहीत. सतत मोबाईलचे विचार मनात येत असल्याने शिक्षक शिकवतात ते मुलांच्या लक्षा राहत नाही. कोरोनाकाळा ऑनलाईन शिक्षणासाठी स्मार्टफो आवश्यक होता, मात्र आता त्याच्च अतिरेक होत असल्याने पालकांन याकडे गांभीयनि लक्ष देणे गरजेन आहे.

### पालकांनी मुलांसमोर मोबाइलचा वापर कमी करावा

तज्जांच्या मते पालकांनी मुलांसाठी स्मार्टफोन वापराची वेळ निश्चित करून द्यावी. अभ्यासाच्या वेळेत मोबाईल दूर ठेवावा. मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करावे. पालकांनी स्वतः ही मुलांसमोर मोबाईलचा कमीत कमी वापर करावा, तरच मुले ऐकतील. शाळांनीही याबाबत जनजागृती करण्याची गरज आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५० ■ सोमवार, २७ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## विदर्भात उष्णतेचा कहर

# ३० वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती; वर्ध्यात तापमान ४६.४°

### -हवामान विभागाचा इशारा; पुढील दिवसांत आणखी तापमान वाढ संभव

**वर्धा । जनमाध्यम :** विदर्भात उष्णतेने अक्षरशः कहर माजवला असून वर्धा जिल्ह्यात तब्बल ३० वर्षांनंतर तापमानाने ऐतिहासिक विक्रम गाठला आहे. रविवार, २६ एप्रिल रोजी वर्ध्यात कमाल तापमान ४६.४ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. यापूर्वी ३० एप्रिल १९९६ रोजी अशीच नोंद झाली होती. तीन दशकांनंतर पुन्हा तोच टप्पा गाठल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापासून तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र आहे. सुरुवातीला काही दिवस ढगाळ वातावरणामुळे उष्णतेची तीव्रता कमी होती; मात्र दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस आकाश निरभ्र होताच तापमानाने झपाट्याने उसळी घेतली. १२ एप्रिलला ४२ अंश सेल्सिअस असलेला पारा पुढील काही दिवसांत ४४ ते ४५ अंशांच्या घरात गेला. २५ एप्रिलला ४५.०५ अंशांवर पोहोचलेले तापमान २६ एप्रिलला थेट ४६.४ अंशांवर पोहोचले.



फोटो - राहुल तेलरांधे, वर्धा

विदर्भातील इतर शहरांमध्येही उष्णतेची तीव्रता वाढली आहे. अकोला येथे ४६.९ अंश, तर अमरावती येथे ४६.८ अंश तापमानाची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण विदर्भ पट्टा उष्णतेच्या लाटेखाली सापडला असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत.

तापमानातील या वाढीचा परिणाम आरोग्यावरही होताना दिसत आहे. उष्माघात, निर्जलीकरण आणि थकवा यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. रुग्णालयांमध्ये उष्णतेमुळे त्रस्त रुग्णांची संख्या वाढत असल्याचेही निदर्शनास येत आहे. विशेषतः शेतकरी, बांधकाम मजूर आणि उन्हात काम करणाऱ्या नागरिकांना या उष्णतेचा मोठा फटका बसत आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून पारा ५० अंशांच्या जवळ जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांतील तापमानाच्या नोंदी पाहता, २०१९ मध्ये ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पारा गेला होता. त्यानंतर काही वर्षे तापमान तुलनेने कमी राहिले; मात्र यंदा पुन्हा एकदा उष्णतेने विक्रमी पातळी गाठल्याने हवामानातील बदलांची तीव्रता अधोरेखित झाली आहे.

नागरिकांसाठी सूचना :


दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, डोक्यावर आच्छादन वापरावे आणि उष्णतेपासून बचाव करण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.विदर्भातील वाढते तापमान हे केवळ आकडेवारी नसून बदलत्या हवामानाचा गंभीर इशारा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आगामी काळात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अर्बन बँकेत १५ लाखांचा घोटाळा: व्यवस्थापक बोरकर फरार

### आरटीजीएसने स्वतःच्या खात्यात पैसे; गोल्ड लोनही बनावट

#### ऑडिटमध्ये भांडाफोड; पोलिस तपासाचा फास आवळला

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील कच्छी लाईन परिसरातील वर्धा अर्बन बँकेत तब्बल १५ लाख रुपयांच्या अपहाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून तत्कालीन व्यवस्थापक प्रवीण बोरकर याच्या कारभारामुळे बँकिंग व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. विश्वासाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या बँकेतच असा घोटाळा घडल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



उपलब्ध माहितीनुसार, डिसेंबर २०२५ मध्ये बोरकर याने सुमारे ३ लाख रुपये आरटीजीएसद्वारे थेट स्वतःच्या खात्यात वळवले. हा प्रकार अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने केल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत आहे. एवढ्यावरच न थांबता, बँकेत तीन गोल्ड लोन प्रकरणे बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर करण्यात आल्याचेही उघड झाले आहे. या प्रकरणात प्रत्यक्षात सोनेच नसताना कर्ज मंजूर करण्यात आले, अशी गंभीर बाब समोर आल्याने बँकेच्या अंतर्गत यंत्रणेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, बँकेच्या नियमित ऑडिटदरम्यान हे सर्व अनियमित व्यवहार उघडकीस आले आणि व्यवस्थापनाचे धाबे दणाणले. यानंतर बँक प्रशासनाने तातडीने पावले उचलत शहर पोलिस ठाण्यात प्रवीण बोरकरविरोधात गुन्हा दाखल केला. बँकेचे अध्यक्ष सुधाकरराव साठवणे यांनी स्पष्ट केले की, ऑडिटमध्ये गंभीर गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर आम्ही त्वरित पोलिसांत तक्रार दिली असून दोषींवर कोणतीही दया न दाखवता कठोर कारवाई केली जाईल. विशेष म्हणजे, यापूर्वीही बोरकरविरोधात अभिकर्ते आणि नागरिकांकडून फसवणुकीच्या तक्रारी समोर आल्या आहेत. नागरिकांनी बँकेत भरण्यासाठी दिलेली रक्कम त्याने जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे आरोप आहेत. तसेच, काही ओळखीच्या व्यक्तींच्या नावावर कर्ज उचलून त्यांना आर्थिक अडचणीत ढकलल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती १५ लाखांपुरती मर्यादित नसून आणखी मोठी असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या प्रवीण बोरकर हा बेपत्ता असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. शनिवारी पोलिसांचे पथक त्याच्या निवासस्थानी पोहोचले होते, मात्र तो हाती लागला नाही. या प्रकरणात आणखी तक्रारी दाखल होण्याची शक्यता असून तपासाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे आहेत.

बँकेतच विश्वासघात झाल्याने वर्ध्यातील नागरिकांमध्ये भीती आणि रोष वाढला आहे. दोषींवर कठोर कारवाई करून नागरिकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे हे आता प्रशासनासमोरचे मोठे आव्हान ठरले आहे.

## ४६ अंशात ज्ञानयुद्ध:उष्णतेला हरवत विद्यार्थ्यांची झुंज

### घामाच्या धारा, तरीही उत्तरपत्रिकेत दमदार लढत; ५३१ विद्यार्थ्यांची दांडी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यावर कोसळलेल्या प्रचंड उष्णतेच्या तडाख्यातही विद्यार्थ्यांनी जिद्दीचा झेंडा उंचावत शिष्यवृत्ती परीक्षेत हजेरी लावली. तापमानाने तब्बल ४६.४ अंश सेल्सिअसचा भडका उडवला, तरीही चौथी व सातवीचे हजारो विद्यार्थी परीक्षा केंद्रांवर हजर झाले. अंगातून घामाच्या धारा वाहत असतानाही ११,७०३ विद्यार्थ्यांनी पहिला पेपर सोडविला, मात्र ५३१ विद्यार्थ्यांनी उष्णतेसमोर हात टेकत गैरहजेरी लावली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने रविवार २६ एप्रिल रोजी ही परीक्षा दोन सत्रांत घेण्यात आली. सकाळच्या सत्रात भाषा व गणिताचा पेपर सुरू होताच उन्हाची तीव्रता जाणवू लागली. दुपारच्या सत्रात तर अक्षरशः 'आगीचा वर्षाव' सुरू असतानाच विद्यार्थ्यांनी तृतीय भाषा व



बुद्धिमत्ता चाचणी दिली. उन्हाचा कहर आणि त्यात विद्यार्थ्यांची झुंज असे चित्र प्रत्येक परीक्षा केंद्रावर पाहायला मिळाले.

जिल्ह्यात चौथीसाठी ५० तर सातवीसाठी ३९ केंद्रांवर परीक्षा पार पडली. शिक्षणाधिकारी (प्राथ.) सीमा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथके तैनात करण्यात आली होती. परीक्षा सुरळीत व्हावी म्हणून पोलिस बंदोबस्तासह आरोग्य यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आली होती. मात्र, या सगळ्या व्यवस्थेवर उष्णतेचा दाहक प्रभाव स्पष्टपणे जाणवत होता.

पहिल्या पेपरसाठी नोंदणीकृत १२,२३४ विद्यार्थ्यांपैकी चौथीचे ७,२८२ व सातवीचे ४,४२१ विद्यार्थी उपस्थित होते. दुसऱ्या पेपरला उपस्थिती आणखी घसरली. ५४१ विद्यार्थ्यांनी दुसऱ्या सत्राला दांडी मारली, हे चित्र चिंताजनक ठरले. वर्धा, हिंगणघाट आणि सेलू तालुक्यांत अनुपस्थितीचे प्रमाण अधिक असल्याचे समोर आले.

दरम्यान, ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यशस्वी विद्यार्थ्यांना चौथीसाठी दरमहा ५०० रुपये, तर सातवीसाठी ७५० रुपये अशी तीन वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. मात्र, अंगावर कोसळणाऱ्या उन्हामुळे विद्यार्थ्यांची परीक्षा खऱ्या अर्थाने 'जिद्दीची कसोटी' ठरली.

उष्णतेचा कहर, घामाघुम विद्यार्थी आणि तरीही न डगमगणारी चिकाटी या सगळ्यांनी वर्ध्यातील शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजे अक्षरशः 'ज्ञानयुद्ध' ठरली.

## प्रीमियम भरूनही विमा हुलकावणीवर

### खंडाळयातील शेतकरी संतप्त; भरपाईसाठी प्रशासनाकडे धाव

**समुद्रपूर जनमाध्यम :** खंडाळा (वायगाव गोंड मंडळ) परिसरातील शेतकऱ्यांनी २०२५ च्या खरीप हंगामासाठी सोयाबीन, कापूस व तूर पिकांचा विमा उतरवूनही अद्याप भरपाई न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली आहे. अतिवृष्टीमुळे विशेषतः सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

शेतकऱ्यांनी नियमितपणे प्रीमियम भरला, आवश्यक कागदपत्रे सादर केली; मात्र प्रत्यक्ष नुकसान झाल्यानंतरही विम्याची रक्कम खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे विमा हा आधार की केवळ आश्वासन असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे नष्ट झाली. सोयाबीनचे पीक तर उभ्याउभ्या सडून गेले, तर कापूस व तूर पिकांनाही मोठा फटका बसला.

दरम्यान, मांडगाव व इतर काही मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा झाल्याची माहिती समोर येताच खंडाळ्यातील शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना अधिकच तीव्र झाली आहे. समान परिस्थितीतही काहींना भरपाई मिळते आणि काहींना नाही, यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



शेतकऱ्यांचा आरोप आहे की, त्यांच्या भागातील पिकांच्या नुकसानीचे अचूक मूल्यांकन झालेले नाही. उत्पादनाच्या नोंदी, पंचनामे आणि प्रत्यक्ष नुकसान याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. गावपातळीवर प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे पुनर्मूल्यांकन करावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर झाला असून, अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या या कुटुंबांसाठी विमा रक्कम ही अत्यंत महत्त्वाची ठरते. मात्र, वेळेवर मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन या प्रश्नात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन विमा दाव्यांची छाननी पूर्ण करावी व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाई जमा करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## डॉ.उषाकिरण थुटे यांच्यासह ११ सदस्य बिनविरोध निवड

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कार्यकारी मंडळाची निवडणूक रविवारी (२६ एप्रिल) पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदी डॉ. प्रा. श्रीमती उषाकिरण थुटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, कार्यकारी मंडळातील सर्व ११ सदस्यांची निवडही अविरोध झाली आहे.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांच्या निर्देशानुसार ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. निवडणूक निरीक्षक तथा निर्णय अधिकारी स्वा. वी. राऊत यांच्या देखरेखीखाली प्रक्रिया पार पडली. संपूर्ण निवडणूक कायदेशीर चौकटीत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी आशिर्वाद थुटे, सचिवपदी अजय रिठे, सहसचिवपदी बाबाराव शेगोकार यांची निवड झाली आहे. तसेच प्रा. विठ्ठल अवचट, राजेराम कुंभलकर, सुमन पाटील, रंजना थुटे, आशा लुटे, प्रा. शितल ठाकरे आणि दिपक नक्षिणे यांची कार्यकारी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

बिनविरोध निवडीमुळे संस्थेतील एकोपा अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे. नव्या कार्यकारिणीकडून शैक्षणिक व ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात अधिक प्रभावी कामगिरी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दारोडा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर; १०५ ज्येष्ठांना चष्म्यांचे वाटप

**आजनसरा जनमाध्यम :** संत भोजाजी जेष्ठ नागरिक सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दारोडा येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूरचे हिंगणघाट-समुद्रपूर तालुका संयोजक डॉ. विजय पर्वत यांच्या उपस्थितीत शनिवारी (२४) हे शिबिर पार पडले. त्यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. पर्वत यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली. वृद्धापकाळात औषधांबरोबरच आपुलकीचीही तितकीच गरज असते. अशा शिबिरांमुळे



ज्येष्ठांना मानसिक आधार मिळतो, असे त्यांनी सांगितले.

शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शिबिरात १९० रुग्णांची नेत्र तपासणी केली. तपासणीनंतर १०५ गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच १३ रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांच्या शस्त्रक्रिया शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये मोफत करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

शिबिरादरम्यान लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी अशा उपक्रमांमुळे त्यांच्या आरोग्य समस्यांकडे वेळीच लक्ष दिले जात असल्याचे नमूद केले.या प्रसंगी प्रतिष्ठानचे ग्रामीण अध्यक्ष गंगाधर कोल्हे, सचिव सुधाकर डेकाटे, हिंगणघाट शहराध्यक्ष कमलाकर ठाकरे, सचिव गणपत गाडेकर यांच्यासह गणेश सोनोने, विनोद नागोशे, रमेश गोहाडे, मोहन गंडाईत, गजानन वाट, दिलीप उगेमुगे, संजय फटिंग, रवी टापरे आदी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संदीप लोंढे, अविनाश जौंजाळ, अश्विन भांडवलकर आणि बालू पाटील यांनी परिश्रम घेतले.

## रस्त्यावर कचरा टाकला, तर खिशाला फटका

### वर्ध्यात प्रशासनाचा कडक इशारा

**वर्धा जनमाध्यम :** शहर आणि ग्रामीण भागात वाढत चाललेल्या कचऱ्याच्या प्रश्नावर अखेर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. आता रस्त्याच्या कडेला किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांना थेट दंडाचा सामना करावा लागणार आहे. वारंवार सूचना, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृतीनंतरही परिस्थिती न बदलल्याने प्रशासनाने हा 'कडक डोस' दिला आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हॉटेल्स, केटरर्स, विवाह कार्यालये, बाजार समित्या आणि इतर व्यावसायिक आस्थापनांकडून मोठ्या प्रमाणात उघड्यावर कचरा टाकला जात आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याचा धोका वाढला आहे. आता नियम मोडणाऱ्यांना माफी नाही,' असा इशाराच त्यांनी दिला.

#### स्वच्छता ही सवय, जबाबदारी आपलीच

पराग सोमन यांनी नागरिकांना स्पष्ट संदेश दिला स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सवय असली पाहिजे.

प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापन केली असून, ती शहरासह ग्रामपंचायत क्षेत्रात कडक नजर ठेवणार आहे. कचरा साचल्यास तो तात्काळ इंझापूर येथील प्रकल्पात हलवला जाणार आहे. विशेष म्हणजे, एकदा स्वच्छ केलेल्या ठिकाणी पुन्हा कचरा टाकणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाई होणार आहे.

#### नियम कडक-उल्लंघनावर थेट दंड

नवीन नियमांनुसार, सर्व केटरर्स, लॉन्स, विवाह कार्यालये आणि सभागृहांना ओला व सुका कचरा वेगळा करूनच त्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना प्रथम नोटीस आणि त्यानंतर दंड ठोठावला जाणार आहे. नगर परिषद व ग्रामपंचायतींना देखील त्यांच्या कचराकुंड्या नियमितपणे चालू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, जेणेकरून नागरिकांना योग्य सुविधा मिळतील.

#### ११ गावांवर 'विशेष नजर

ही दक्षता समिती वर्धा शहरातील ११ गावे आणि आसपासच्या ९ ग्रामपंचायतींमधील कचरा व्यवस्थापनावर बारीक लक्ष ठेवणार आहे. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अध्यक्ष म्हणून काम पाहणार असून, पोलीस, आरोग्य विभाग, नगर परिषद आणि ग्रामपंचायत अधिकारी या समितीत सहभागी आहेत. हा उपक्रम पालकमंत्री पंकज भोयर यांच्या निर्देशानुसार राबवला जात आहे.

## वर्धा नशेच्या विळख्यात... पोलिसांचा 'आशीर्वाद' की आंधळेपणा?

**वर्धा । जनमाध्यम :** महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांनी उजळलेल्या वर्धा जिल्ह्याची ओळख आज काळ्या सावलीखाली दबली जात आहे. सत्य-अहिंसेची शिकवण देणाऱ्या या भूमीत सध्या दारू, गांजा आणि 'एमडी'सारख्या घातक अंमली पदार्थांचा उघडउघड बाजार भरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. आणि याहून गंभीर बाब म्हणजे, हे सर्व पोलिसांच्या नजरेसमोर सुरू असूनही कारवाई मात्र 'कागदावरच' असल्याची संतप्त चर्चा जनतेत रंगू लागली आहे.

हिंगणघाटात दारूचा पूर उसळला आहे. नियम, परवाने आणि कायद्याची पायमल्ली करत अवैध दारू विक्रीचा व्यवसाय अक्षरशः रात्रंदिवस सुरू आहे. दुसरीकडे, गांजाची विक्री गावोगावी पोहोचली असून युवकांना सहज उपलब्ध होत आहे. वर्धा शहरात तर 'एमडी' या प्राणघातक ड्रगने थैमान घातले आहे. विशेष म्हणजे, या विळख्यात अडकणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाणही वाढत असल्याचे वास्तव समाजासाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

पोलीस यंत्रणा अधूनमधून कारवाया करत असल्याचे दाखवते. मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केल्याचे फोटो, आकडे आणि प्रसिद्धीपत्रके झळकतात. आरोपींना अटक होते, वाहनं जप्त होतातष्ठ पण काही दिवसांतच हेच आरोपी जामिनावर बाहेर येतात आणि पुन्हा त्याच जोमाने धंदा सुरू करतात. ही 'धडक कारवाई' नेमकी कोणासाठी, असा उपरोधिक प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.

या सगळ्या प्रकारामागे कोणाचे पाठबळ आहे, कोणाच्या संरक्षणाखाली हा काळाबाजार फोफावत आहे, पोलिसांच्या मूक संमतीशिवाय हे शक्यच नाही, असा आरोपही जनतेतून ऐकू येऊ लागला आहे. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर संशयाची गडद छाया पडली आहे. दरम्यान, जिल्ह्यात वाढणारी व्यसनाधीनता ही केवळ कायद्याचा मुद्दा राहिलेला नाही, तर सामाजिक अध:पतनाचे मोठे संकट बनले आहे. तरुणाईचे भविष्य अंधारात ढकलले जात असताना प्रशासन मात्र 'झोपेचे सोंग' घेत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी स्वतः पुढाकार घेत या अवैध साम्राज्यावर बुलडोझर फिरवावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, गांधी-विनोबांच्या या भूमीत नशेचा हा राक्षस आणखी विक्राळ होईल आणि समाजाची मुळेच पोखरून टाकेल, यात तिळमात्र शंका नाही.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ‘एलनिनो’चे सावट

गॅसची टंचाई, खतांची अनुपलब्धता, वाढलेली महागाई यातून मार्ग कसा काढायचा, असा गंभीर प्रश्न सध्या जनतेपुढे आहे. ऊर्जासंकट, वाढलेली महागाई, अर्थव्यवस्थेला बसलेले हादरे, अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, रोजगारातील असुरक्षितता यामुळे अगोदरच सामान्यजन धास्तावले आहेत. दररोज नोकरकपातीच्या बातम्या झोप उडवत आहेत. कोसळणाऱ्या शेअर बाजाराने आणि घसरत्या रुपयाने सामान्यांच्या काळजात धस्स होत आहे. त्यातच या वर्षी ‘एल निनो’च्या प्रभावामुळे देशात सरासरीपेक्षा सहा ते सात टक्के कमी पाऊस होण्याची शक्यता आहे, असा अंदाज ‘स्कायमेट’ने वर्तवला आणि त्यानंतर आठवडाभरात भारतीय हवामान विभागाचाही तसाच अंदाज आला. जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये पावसाची तूट अधिक असू शकते, असे दोन्ही संस्थांचे म्हणणे आहे. २०१५ मध्ये राज्याने मोठा दुष्काळ अनुभवला आहे. लातूरसारख्या भागाला रेल्वेने पाणीपुरवठा केल्याची कटू आठवण आजही सर्वांच्या मनात कायम आहे. त्याअगोदर २००४-२००५ या वर्षांमध्येही राज्याला मोठ्या दुष्काळांना सामोरे जावे लागले होते. चारा आणि पाण्यासाठी किती हाल होतात, हे त्या वेळच्या दुष्काळांनी दाखवून दिले होते. कमी पाऊस म्हणजे निसर्गाचा हात आखडता आणि त्याच वेळी सरकारी पातळीवर नियोजनाचा दुष्काळ अशा दुहेरी संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. दोन्ही संस्थांचे कमी पावसाचे अंदाज पाहता यंदाचे वर्ष पूर्वीच्या दुष्काळी वर्षांच्या तुलनेत किती किती बिकट ठरणार, याची चिंता आता सर्वांना लागली आहे. पाऊस चांगला झाला तर उत्पादन वाढते, पुरवठा सुरळीत राहतो आणि महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळते. याउलट परिस्थिती असल्यास मात्र अन्नधान्याच्या किमती वाढतात आणि महागाईचा दबाव वाढतो. यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर या निर्णायक महिन्यांमध्ये पावसाचे प्रमाण ८९ ते ९२ टक्क्यांपर्यंत राहण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. खरीप हंगामात दाणे भरण्याच्या टप्प्यावर असलेल्या पिकांसाठी हे महिने अत्यंत महत्त्वाचे असतात. पंजाब, हरयाणा आणि राजस्थानमध्ये पावसाची तूट झाली, तर अन्नधान्य उत्पादनावर थेट परिणाम होणार हे उघड आहे. मध्य भारतात सोयाबीन आणि कापूस यांसारख्या नगदी पिकांनाही याचा मोठा फटका बसू शकतो. पावसाचे प्रमाण कमी होणे हा केवळ एका हंगामाचा प्रश्न नाही. त्याचा परिणाम धरणांमधील पाणीसाठ्यावर, भूजल पातळीवर आणि पुढील उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर होतो. मॉन्सून हा वर्षभराच्या जलव्यवस्थेचा पाया आहे. तरीही, पर्जन्यवितरणातील वाढती विषमता अधिक चिंताजनक आहे. पूर्वी ७०-८० दिवस पडणारा पाऊस आता ३० दिवसांपर्यंत मर्यादित झाला आहे. कमी कालावधीत होणाऱ्या मुसळधार पावसामुळे पाणी साठवण्याऐवजी वाहून जाते आणि उर्वरित काळात टंचाई निर्माण होते. यापेक्षा मोठे वास्तव म्हणजे, देशात दर वर्षी पडणाऱ्या पावसाचे केवळ दहा टक्के पाणीच साठवले जाते. उर्वरित पाणी वाहून जाते. सिंचन प्रकल्प, जलसंधारण योजना, मोठमोठ्या घोषणा हे सर्व असूनही प्रत्यक्षात पाणी अडवणे, मुरवणे आणि प्रभावीपणे वापरणे या मूलभूत बाबींमध्ये आपण कमी पडलो आहोत. त्यामुळे एखाद्या वर्षी पाऊस कमी झाला की संपूर्ण कृषी अर्थकारण डळमळीत होते. या सगळ्या घडामोडींचा थेट परिणाम रिझर्व्ह बँकेच्या धोरणांवरही होतो. पर्जन्यमानाची शक्यता लक्षात घेऊन महागाईचा अंदाज वाढवावा लागतो. महागाई वाढली, तर व्याजदर वाढवण्याचा दबाव येतो, आणि त्याचा परिणाम उद्योग व्यवसायांवर होतो. अशा प्रकारे मॉन्सूनची अनिश्चितता संपूर्ण आर्थिक व्यवस्थेला अस्थिर करते. यातून बाहेर पडण्याचा मार्ग स्पष्ट असूनही ठोस अंमलबजावणी होताना दिसत नाही. ठिबक आणि तुषार सिंचनाचा व्यापक वापर, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळणे, जलसंधारणाची प्रभावी कामे आणि पाण्याचे सूक्ष्म नियोजन या उपाययोजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरल्या पाहिजेत. प्रशासनाने दुष्काळ येण्याची वाट पाहण्याऐवजी त्यासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. शहरी भागातही वर्षाजल संधारण सक्तीचे करणे, भूजल पुनर्भरणाला प्रोत्साहन देणे आणि पाण्याच्या पुनर्वापरासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे आहे. सिंगापूर आणि इस्त्रायलने दाखवून दिलेला मार्ग आपल्यासाठी आदर्श ठरू शकतो. निसर्गाचे चक्र आपल्या हातात नाही; पण त्याचे परिणाम कमी करणे निश्चितच आपल्या हातात आहे. मान्सूनवर अवलंबून राहण्याची मानसिकता बदलून शाश्वत जलव्यवस्थेकडे वळण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा, पावसाचे हे अनिश्चित गणित अर्थव्यवस्थेला दर वर्षी नव्याने धक्का देत राहील. गेल्या काही वर्षांमध्ये पावसाबाबत केली गेलेली भाकिते बहुतांश वेळा सत्यात उतरताना दिसतात. पाऊस कमी होणार असला, तरी त्यामुळे घाबरून जाण्यापेक्षा सरकार आणि शेतकऱ्यांनी परस्पर सहकार्याने काही नियोजन केल्यास या संकटावर मात करता येईल. भारतासारख्या कृषिप्रधान देशात मान्सून म्हणजे केवळ पाऊस नव्हे, तर अर्थचक्राचा मुख्य आधार आहे. कमी पावसाचा थेट आणि सर्वात मोठा फटका शेतीला बसतो. पावसावर अवलंबून असलेल्या खरीप पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता वाढते. परिणामी, शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. कर्जबाजारीपण वाढते आणि ग्रामीण अर्थव्यवस्था कमकुवत होते. याचे परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. कृषी उत्पादनात घट झाल्यास अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो. त्यामुळे बाजारात दरवाढ होण्यास सुरुवात होते. महागाईचा प्रश्न इथे गंभीर बनतो. अन्नधान्य, भाजीपाला, डाळी यांच्या किमती वाढल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर थेट परिणाम होतो. आधीच वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या कुटुंबांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण बनते. महागाई वाढल्यास ग्राहकांची खरेदी क्षमता घटते. त्यामुळे उद्योग आणि सेवाक्षेत्रातील मागणी कमी होऊ शकते. याचा परिणाम देशाच्या वित्तीय तुटीवरही होतो. सरकारला शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अनुदाने, कर्जमाफी किंवा मदत पॅकेजेस जाहीर करावी लागतात. तसेच, अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी साठे किंवा आयात वाढवणे आवश्यक ठरते. या सर्व उपाययोजनांमुळे सरकारी खर्च वाढतो आणि वित्तीय तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो. वित्तीय तूट नियंत्रणात ठेवणे हेआधीच एक मोठे आव्हान असताना पुरेसा पाऊस न पडल्यामुळे हे अधिक गुंतागुंतीचे बनते.

# आखाती युद्ध आणि भारतासाठी धडे

**आखातातील संघर्ष सध्या शमलेला असला, तरी कोणत्या क्षणी, कोठून तोफ धडाडेल किंवा बॉम्बहल्ले सुरू होतील, हे सांगता येणार नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या शांततेबाबत प्रतीक्षा करणे एवढेच जगाच्या हाती आहे. तथापि, केवळ हातावर हात ठेवून पाहत न राहता या युद्धातून आपल्याला अनेक धडे मिळाले आहेत आणि त्यांचे आकलन करून घेणे ही आधुनिक युद्ध पद्धतींच्या काळात सामर्थ्यशाली राहण्यासाठी गरज आहे.**



युद्ध रशिया-युक्रेनचे असो अथवा अमेरिका-इराणचे, जगाच्या पाठीवर कुठेही सुरू असलेल्या संघर्षाचे जागतिक पडसाद उमटत असतात. त्याचबरोबर या संघर्षातून आधुनिक युद्धाची रणनीती आणि बदलती युद्धपद्धतीही समोर येते. भारतासमोरही सध्या पारंपरिक आणि अपारंपरिक अशा दोन्ही प्रकारच्या सुरक्षेच्या आव्हानांचा संगम आहे. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्ष ही भारतासाठी केवळ एक आंतरराष्ट्रीय घटना नसून, भविष्यातील राष्ट्रीय सुरक्षा धोरण घडवण्यासाठी एक महत्त्वाचा अभ्यासविषय आहे.

फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस सुरू झालेल्या इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल या युद्धातील हल्ले युद्धविरामानंतर थंडावले असले, तरी कधी, कोणत्या क्षणी, कुठे हल्ला होईल आणि कुणाची तोफ धडाडेल, हे सांगता येत नाही. ही अस्थिरता कधी दूर होणार आणि आखातात शांतता खऱ्याअर्थाने कधी प्रस्थापित होणार, याकडे जगाचे लक्ष लागून राहिले आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे, इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील हा संघर्ष पारंपरिक युद्धासारखा नाही, जिथे मोठ्या प्रमाणावर सैन्य हालचाली, रणांगणावर सरळ लढाया आणि निर्णायक विजय दिसतो. हा संघर्ष अत्यंत गुंतागुंतीचा, बहुआयामी (मल्टिडोमेन) स्वरूपाचा आहे. यात प्रॉक्सी युद्ध, आर्थिक दबाव, तंत्रज्ञानाधारित हल्ले आणि मानसशास्त्रीय युद्ध या सर्व घटकांचा समावेश आहे. हायब्रीड आणि ग्रे-झोन युद्धाच्या उदयाने हे स्पष्ट केले आहे की, आधुनिक युद्धे आता औपचारिकरीत्या जाहीर होत नाहीत. ती ग्रे झोनमध्ये लढली जातात. म्हणजेच पूर्ण युद्धाच्या उंबरठ्याखाली. इराण प्रॉक्सी गटांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतो, तर अमेरिका आणि इस्त्रायल टार्गेटेड स्ट्राईक्स, सायबर ऑपरेशन्स आणि गुप्तचर माहितीवर आधारित कारवाया करतात.

या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तान आणि चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध अशाच प्रकारच्या हायब्रीड युद्धासाठी तयार राहणे आवश्यक आहे. प्रॉक्सीविरोधी रणनीती मजबूत करणे आणि गरज पडली, तर अशा शत्रूंना भारताच्या बाहेर आणि पाकिस्तान व चीनच्या आत जाऊन मारण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे. सैन्य, गुप्तचर, सायबर आणि राजनैतिक साधनांचे एकत्रीकरण करून बिगर पारंपरिक (सबकन्व्हेन्शनल) धोक्यांसाठी जलद प्रतिसाद यंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे. कारण, असे धोके केव्हाही आणि अचानकपणाने भारताच्या समोर येऊ शकतात. एकविसाव्या शतकात प्रॉक्सी युद्ध हे नवे वास्तव बनले आहे. इराणने नॉनस्टेट ॲक्टर्सचा प्रभावी वापर करून स्वतःचा प्रभाव वाढवला आहे आणि थेट युद्ध जबाबदारी टाळली आहे. भारत अनेक दशकांपासून सीमापार दहशतवादाचा सामना करत असल्याने दहशतवादी नेटवर्कमध्ये अधिक खोलवर गुप्तचर प्रवेश आवश्यक आहे. गुप्त कारवायांद्वारे (कोव्हर्ट ऑपरेशन्स) शत्रूंवर जबाबदारी लादणे, जशास तसा प्रतिसाद म्हणून गरज असेल तेव्हा हल्ले केलेच पाहिजेत.

आर्थिक युद्ध आणि निर्बंधांचा विचार करता अमेरिकेने इराणवर लादलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे थेट युद्धाशिवायही त्यांची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर कमकुवत झाली. भारतासाठी हा धडा आहे. आर्थिक ताकद ही आता राष्ट्रीय सुरक्षेचा मुख्य स्तंभ बनली आहे. आर्थिक आणि व्यापारातील अडथळ्यांविरुद्ध लवचिकता निर्माण करणे गरजेचे आहे. पुरवठा साखळ्या (सप्लाय चेन्स) विविध करणे, ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, गरज पडल्यास निर्बंध टाळण्यासाठी पर्यायी व्यवस्था तयार करणे अशा उपाययोजना तयार करून ठेवायला पाहिजेत. यामुळे आपला पुरवठा कधीही विस्कळीत होणार नाही. आर्थिक युद्ध हे लष्करी कारवाईइतकेच निर्णायक ठरू शकते. ड्रोन युद्ध आणि कमी खर्चातील प्रभावी तंत्रज्ञानाने रणांगण बदलले आहे. इराणने कमी खर्चातील ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून तांत्रिकदृष्ट्या प्रगत शत्रूंना आव्हान दिले आहे. भारतासाठी धडा म्हणजे भविष्यातील युद्धांमध्ये स्वॉर्म ड्रोन (एकाच वेळी अनेक ड्रोन), अचूक मार्गदर्शक शस्त्रे (प्रिसिजन-गाईडेड म्युनिशन्स) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित युद्ध निर्णायक ठरणार आहे. भारताने स्वदेशी ड्रोन कार्यक्रम वेगाने विकसित करणे, मजबूत अँटिड्रोन प्रणाली विकसित करणे आणि तिन्ही सैन्यदलांमध्ये ड्रोनचे एकत्रीकरण करणे, अशा उपाययोजनांवर लगेच विचार करून त्यावर अंमलबजावणी वेगाने करावी.

ऊर्जा सुरक्षा हा एक रणनीतिक कमकुवत दुवा आहे. या संघर्षामुळे जागतिक ऊर्जापुरवठ्याची असुरक्षितता स्पष्ट झाली आहे. विशेषतः महत्त्वाच्या समुद्री मार्गांमुळे. भारत हा जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयातदारांपैकी एक असल्याने अस्थिर प्रदेशांवरील अवलंबित्व कमी करणे, रणनीतिक पेट्रोलियम साठे वाढवणे, अणुऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. सागरी सुरक्षा आणि सामरिक मार्गांवर नियंत्रण हे युद्धातील निर्णायक घटक बनले आहेत. भारताने हिंदी महासागर क्षेत्रात (आयओआर) उपस्थिती मजबूत करणे आणि समान विचारांच्या देशांसोबत भागीदारी वाढवणे आवश्यक आहे. असममित आणि कमी खर्चाच्या युद्धाची ताकद इराणने दाखवून दिली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी रोखण्यासाठी इराण पारंपरिक नौदलाऐवजी स्वस्त ड्रोन्सचा प्रभावी वापर करेल, याचा अंदाज लावण्यात अमेरिका अपयशी ठरली. भारताला हिंदी महासागर आणि आपल्या सीमांवर अशाच आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. नावीन्यपूर्ण डावपेच वापरणाऱ्या छोट्या राष्ट्रासमोर मोठी नौदले किंवा वायुसेना हतबल ठरू शकतात. रशिया-युक्रेन युद्धातही हेच सिद्ध होत आहे, जिथे ड्रोन्सच्या मदतीने युक्रेन रशियन सैन्याला कडवी झुंज देत आहे. केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरेसे नाही, तर त्याचा नावीन्यपूर्ण वापर करून शत्रूच्या एक पाऊल पुढे राहणे आवश्यक आहे. भारताने अँटिड्रोन तंत्रज्ञान आणि विकेंद्रित संरक्षण प्रणालीमधील गुंतवणूक वाढवणे गरजेचे आहे. केवळ विमानवाहू नौकांसारख्या मोठ्या प्रकल्पांवर अवलंबून न राहता ड्रोन स्वॉर्म्स आणि असममित धोक्यांपासून व्यापारी मार्ग सुरक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

आखातातील युद्धामध्ये माहिती आणि मानसशास्त्रीय युद्धात माहिती नियंत्रण, प्रचार (प्रोपोगंडा) आणि धारणा व्यवस्थापनदेखील अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. बदलत्या काळाची गरज लक्षात घेता भारताने मजबूत माहिती युद्ध धोरण विकसित करून चुकीच्या माहितीचा (मिसइन्फॉर्मेशन) प्रतिकार केला पाहिजे. मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा सक्रिय वापर करणे गरजेचे आहे. आणखी एक मुद्दा म्हणजे, कोणत्याही राष्ट्रासाठी अंतर्गत स्थैर्य हीच खरी ताकद असते. इराणमधील अंतर्गत अस्थिरतेमुळे त्याच्या बाह्य धोरणांवर परिणाम झाला. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थैर्य हे राष्ट्रीय सुरक्षेचे मूळ असून अंतर्गत एकता टिकवणे अत्यावश्यक आहे. रणनीतिक स्वायत्तता आणि बहुपक्षीय संतुलन राखताना भारताने संतुलित परराष्ट्र धोरण स्वीकारले पाहिजे. कोणत्याही एका गटावर अतिअवलंबित्व टाळून बहुपक्षीय (मल्टिअलाईन्मेंट) धोरण सुरू ठेवले पाहिजे. अणू प्रतिबंध आणि तणाव नियंत्रणामुळे या संघर्षात पूर्ण युद्ध झालेले नाही. यामागे प्रतिबंध (डिटरन्स) हा महत्त्वाचा घटक आहे, हे लक्षात घेता भारताने विश्वासार्ह अणू प्रतिबंध कायम ठेवणे, तणाव नियंत्रणासाठी यंत्रणा विकसित करणे आणि सेकंड स्ट्राईक क्षमता मजबूत करणे आवश्यक आहे. आधुनिक युद्धे दीर्घकालीन असतात. त्यामुळे भारताने आर्थिक आणि लष्करी सहनशक्ती वाढवून टिकाऊ धोरणावर भर दिला पाहिजे. एकुणात, इराण संघर्ष हा २१ व्या शतकातील युद्धाचा एक नमुना आहे. आजच्या लढाया केवळ रणांगणावर होत नाहीत, तर आर्थिक, तांत्रिक, माहिती आणि मानसशास्त्रीय क्षेत्रांमध्येही लढल्या जातात. भविष्यातील युद्धे केवळ शस्त्रास्त्रांच्या जोरावर जिंकली जाणार नाहीत, तर राष्ट्राच्या सर्व शक्तींच्या एकत्रित वापरावर अवलंबून असतील. भारताने पारंपरिक लष्करी शक्तीपासून पुढे जात एक सर्वसमावेशक राष्ट्रीय सुरक्षा प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे, जी हायब्रीड युद्ध, आर्थिक दबाव आणि तांत्रिक आव्हानांना समर्थपणे तोंड देऊ शकेल.

हायब्रीड युद्ध हेच नवीन रणांगण आहे. ड्रोन, सायबर आणि एआय तंत्रज्ञान युद्धाचे स्वरूप बदलत आहे. केवळ एका सुरक्षा भागीदारावर अतिअवलंबित्व ठेवल्यास राजनैतिक नुकसान (कोलॅटरल डिप्लोमॅटिक डॅमेज) होऊ शकते. भारताने आपल्या जहाजांना सुरक्षित मार्ग मिळवण्यासाठी इराणशी मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारणे हा योग्य निर्णय होता. होर्मुझमध्ये ‘इंडिया फर्स्ट’ दृष्टिकोन स्वीकारून भविष्यातील संकटांसाठी वेगवेगळ्या मंत्रालयांनी एकत्रित विचार करून समन्वयित योजना आखणे आवश्यक आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यास अर्थव्यवस्थेला खीळ बसू नये म्हणून सुरक्षित सागरी मार्ग विकसित करणे आणि ऊर्जा आयातीचे मार्ग वैविध्यपूर्ण करणेही गरजेचे आहे.

**ब्रिगेडियर हेमंत महाजन**

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत.

या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातीलच नव्हे तर देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशातील अन्य राज्यातही अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे.

त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

**श्याम ठाणेदार**

# ...हा तर नवा सुलतान




मोगलाई गेली. केव्हाच इतिहासजमा झाली. छ. शिवरायांनी रयतेच्या स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याला ग्रहण लावणाऱ्या शहेनशाह औरंगजेबाची कबर शूर मराठ्यांनी याच महाराष्ट्राच्या मातीत बांधली. मोगलाई सुलतानीला याच मातीत गाडले गेले. ब्रिटिश राजवटही गेली. भारतात लोकशाही स्थापन झालेल्याला ७५ वर्षे झाली. सर्व जनतेला राज्यघटनेनुसार समान आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क बहाल झाले. सप्तस्वातंत्र्य मिळाली. पण याची जाणीव मस्तवाल गुंडगिरी करायला सोकावलेल्या शिवसेनेच्या शिंदे गटाच्या आमदार संजय गायकवाडला नाही. आपण खरे शिवभक्त आहोत, असा आव आणत, या गायकवाडने थेट शिवाजी कोण होता? या गोविंद पानसरे यांनी लिहिलेल्या व प्रचंड लोकप्रिय असलेल्या पुस्तकाचे प्रकाशक आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कोल्हापुरातील कार्यकर्ते प्रशांत श्रीकांत आंबी यांना मध्यरात्री फोन करून जिवे मारण्याची दिलेली धमकीची घटना अत्यंत चिंताजनक आणि राज्य सरकारच्या प्रतिमेला चूड लावणारी आहे. या पुस्तकात शिवरायांचा उल्लेख एकेरी कसा केला? गोविंद पानसरे यांची वाट काय लागली हे तुला माहिती आहे. तू त्यांना भेटायला वर जा, अशा धमक्या देत, तुझ्या घरात घुसून तुझी जीभ कापून टाकेन, तुला चिरडून टाकेन अशा धमक्या देत या गुंड आमदाराने आंबी यांच्या आई आणि पत्नीलाही अर्वाच्य भाषेत फोनवर शिवीगाळ केली. मुळातच हे पुस्तक न वाचता आपणच शिवरायांच्या वारश्याचे संरक्षक आणि ठेकेदार असल्याचे या सत्ताधारी पक्षाच्या आमदाराला वाटते. कोणाच्या घरात घुसून त्याला चिरडून टाकण्याची धमकी द्यायला ही काही मोगलाई नाही. सुलतानशाही महाराष्ट्रातील शिवभक्त जनता मुळीच सहन करणार नाही, याचे भान सत्तेचा माज चढलेल्या गायकवाडला नाही. गोविंद पानसरे यांच्या खुन्यांना अद्यापही शिक्षा झालेली नाही व पानसरे यांनी हे कम्युनिस्ट मक्षाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव होते. आयुष्यभर त्यांनी श्रमिक आणि सोशितांसाठी संघर्ष केला. त्यांची विचारसरणी डावी होती, पण छ. शाहू महाराजांच्या कोल्हापूरच्या पुरोगामी शहरात त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि अन्य राजकीय पक्षाच्या नेत्यांशी व कार्यकर्त्यांशी मैत्रीही होती. लोकहिताच्या कार्यात त्यांनी कधीही राजकीय विचार आणले नाहीत. त्यामुळेच ते कोल्हापूर जिल्हा आणि महाराष्ट्राच्या जनतेचे लाडके अण्णा होते. छ. शिवरायांच्या इतिहासाचा आठ वर्षे अभ्यास करून त्यांनी छ. शिवाजी महाराजांचे स्वराज शिवशाही आणि स्वराज्याच्या रयतेला मिळालेल्या स्वातंत्र्याचे मूल्यमापन करताना मोगलाशी लढा देत शिवरायांना स्वराज्य स्थापन करणे कसे शक्य झाले याचे चिकित्सक विवेचन या पुस्तकात केले आहे. कायद्याने गुलामगिरी बंद करणारा हा जगातला पहिला राजा होता. राजा असतानाही रयत आणि राजा एकरूप झाली होती. त्यांनी स्वराज्यातल्या रयतेला देशमुख, सरंजामदाराच्या जाचक छळातून पूर्णपणे मुक्त केले. रयत आणि राजा असे थेट नाते निर्माण करताना रयतेच्या हितासाठी आणले. रयतेच्या भाजीच्या देठालाही शिवू नका, असा शिवरायांच्या स्वराज्याचा दस्तुर होता. सर्व जातिधर्माचे लोक त्यांच्या सैन्यात होते. महिलांची अब्रू सुरक्षित होती आणि त्यामुळे छ. शिवराय लोकराजे ठरले, असा निष्कर्ष त्यांनी या ८० पानाच्या पुस्तकात नोंदवला आहे. १९८८मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिध्द झाली. कमीत कमी किंमतीत हे पुस्तक जनतेला मिळावे, यासाठी या पुस्तकाची किंमत तेव्हा अवघी ४ रुपये होती. गेल्या ३७ वर्षात या पुस्तकाच्या ५ लाखाच्या प्रतींचे वितरण झाले आहे. ऐतिहासिक दृष्ट्या शिवराय आणि त्यांच्या राज्याबद्दलचा नवा दृष्टिकोन ऐतिहासिक पुराव्यासह मांडताना या प्रजेच्या राजाचा उल्लेख एकेरी म्हणजे शिवाजी असा केला हा काही शिवरायांचा अवमान नाही. आपण आपल्या आईला, देवाला एकेरीच संबोधतो. शिवरायाची महानता युगप्रवर्तक कार्य या राजाने केले आणि त्यामुळेच कोट्यवधी जनतेच्या हृदय सिंहासनावर हा राजा पिढ्यान पिढ्या विराजमान झाला, अशा शब्दात पानसरे यांनी शिवशाहीची प्रसंशाही केली आहे. मुळात हे पुस्तक सुलतान गायकवाड याने वाचलेले नाही. आणि मस्तवालपणे तो बरळला आहे. सरकारने त्याच्या मुसक्या आवळायला हव्यात, अशा बेलगाम जीभा सुटल्या तर तो लोकशाहीला गंभीर धोका आहे, हे लक्षात घेऊन राज्य सरकारने अशा उपटसुंभ बांडगुळाचा बंदोबस्त करायला हवा. छ. शिवाजी महाराज असते तर त्यांनी या सुलतानाचा कडेलोटच केला असता.

**श्रीहरी**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पुसद सार्वजनिक बांधकाम विभागात कंत्राटदाराना बिल वाटपात पक्षपात

## वरिष्ठांना संपूर्ण देयक प्रकरणाच्या चौकशीची मागणी!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांच्या विरोधात आर्थिक अनियमितेचे गंभीर आरोप समोर येत असून संपूर्ण विभागात खळबळ उडाली आहे. पुसद,उमरखेड,महागाव व दिग्रस या चार उपविभागातील रस्ते, पुल, इमारत व इतर पायाभूत सुविधाची कोट्यावधी रुपयाचे विकासकामे गेल्या काही महिन्यात पूर्ण करण्यात आले आहेत मात्र या कामाच्या मोबदला देयक वाटपात पारदर्शक अभाव असल्याचा आरोप ठेकेदारा कडून करण्यात येत आहे.

ठेकेदाराच्या म्हणण्या नुसार मार्च अखेरच्या समाप्त काळात महाराष्ट्र शासनाकडून सा.बां. विभागाला निधीच्या मर्यादित म्हणजे सुमारे ८% टक्के निधी प्राप्त झाला होता. या निधीचे योग्य व समप्रमाणात वितरण होणे अपेक्षित असतांना कार्यकारी अभियंता माथुरकर यांनी जवळच्या व मर्जीतील ठेकेदारांना प्राधान्य देत




अंदाजे १५ कोटी रुपयांचे देयक वितरित केल्याचा आरोप काही कंत्राटदार यांच्या कडून करण्यात येत आहे यामुळे इतर अनेक ठेकेदारांना ज्यांनी कामे वेळेत पूर्ण केले आहेत त्यांना अद्याप देयके मिळालेली नाहीत या परिस्थिती मुळे अनेक ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले असून कामगारांचे वेतन साहित्य पुरवठा दराचे बिल आणि बँक कर्जाच्या हप्ते भरणे कठीण झाले आहे. काही ठेकेदारांनी तर काम करूनही पैसे मिळत नसेल तर व्यवसाय चालवायचा कसा असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे त्यामुळे विभागातील नाराजी व असंतोष दिवसें दिवस वाढत आहे

याशिवाय देयक वाटपासाठी कोणते निकष वापरण्यात आले कोणत्या कामांना प्राधान्य देण्यात आले आणि कोणत्या ठेकेदारांना लाभ मिळाला याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात अद्याप मिळालेली नसल्याने दाट संशय व्यक्त केला जात आहे, काही कंत्राटदारांनी या संपूर्ण प्रक्रियेत भेदभाव व पक्षपात झाल्याचा आरोप करत लेखी तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्या कडे दाखल केल्या आहेत. दरम्यान सार्वजनिक बांधकाम परिमंडळ विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी तसेच पुसद विभागातील सर्व विकास कामे व देयक वितरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. याशिवाय संबंधित कागदपत्रे मंजुरी प्रक्रिया आणि निधी वाटपाचा तपशील तपासणी करावी यामध्ये चौकशीत अनियमित आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी असे काही कंत्राटदाराकडून मागणी केली जात आहे. या अगोदर सुद्धा काही कामाच्या टेंडर मध्ये मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्यासाठी अनेक दिवस टेंडर लावण्यात आले नव्हते याबाबत काही वृत्तपत्रात बातम्या सुद्धा प्रसिद्ध झाल्या होत्या. असे अनेक गैरप्रकार पुसद सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता कार्यालयात झालेले आहेत. "कार्यकारी अभियंता महेश माथुरकर हटाव,सार्वजनिक बांधकाम विभाग बचाव" असा संपूर्ण कंत्राटदारामधून सूर निघत आहे. त्यामुळे आता कार्यकारी अभियंता माथुरकर यांच्यावर नेमकी कोणत्या प्रकारे कारवाई होणार तसेच ठेकेदारांना त्यांच्या हक्काचे देयक केव्हा मिळणार याकडे सर्व कंत्राटदाराचे लक्ष लागले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा

उमरखेड : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. 25 ते 29 एप्रिल या कालावधीतपाण्याचा नियोजनबद्ध वापर होण्यासाठी लोक चळवळीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'गोदावरी ते नर्मदा जलयात्रेला प्रतिसाद देत दि 20 एप्रील रोजी उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते पैनगंगा नदीच्या जलकलशाचे पुजन करण्यात आले. 20 एप्रिल रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा नदीच्या जलकलशाचे पुजन उमरखेड महागाव विधानसभा मतदार संघाचे आमदार किसनराव वानखेडे, यांच्या हस्ते उमरखेड येथे करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता अ. बा. जगताप, उपविभागीय अभियंता एस.ए. खोकले,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुदर्शन रावते पाटील, स्थानिक पदाधिकारी, पत्रकार, नागरीक उपस्थित होते. जलयात्रा बाबत बोलताना आमदार किसनराव वानखेडे यांनी लोकांना पाण्याचा नियोजनबद्ध वापर व जलसंवर्धनाचे महत्व सांगून ही लोकचळवळ यशस्वी करण्याच्या दृष्टीने तसेच गोदावरी ते नर्मदा जलयात्रा ना. राधाकृष्ण विखे पाटील, यांनी सुरु केल्याचे सांगितले.

# नगरपंचायतच्या त्या ठरावाचे झाले काय?

## दिरंगाई व लालफितीमध्ये अडकले कर्तव्य




नगरपंचायतने जो ठराव घेतलेला आहे तो विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ नागरिकांचे विद्यार्थ्यांचे हेळसांड न होता आधार मधील त्रुट्या तात्काळ दुरुस्त होऊन त्यांच्या कामात अडथळे न येता ते वेगाने व्हावे यासाठीच तो नगरपंचायतने ठराव घेतलेला आहे. विविध पक्षांनी व संघटनांनी ही अडचण पाहून निवेदन सुद्धा दिले तेव्हा या जनहितास्तव घेतलेल्या ठरावाला प्रशासनाने तत्काळ मंजुरी देऊन अतिरिक्त आधार संच उपलब्ध करून दयावा. कर्तव्यापासून दूर जात असलेल्या शासनाला जर वेळोवेळी निवेदन व ठराव या सर्व बाबीचे गांभीर्य नसेल तर शिवसेना स्टाईल पद्धतीने आंदोलन करावे लागेल.
**– संजय सलेवाड, स्वीकृत नगरसेवक नगरपंचायत ढानकी**

जनमाध्यम प्रतिनिधी

ढाणकी - येथे अतिरिक्त आधार संच सुरू व्हावा आणि जनसामान्यांची आधार दुरुस्ती व अपडेट साठी होणारी फरफट थांबावी यासाठी नगरपंचायत प्रशासनाने दि 4/ 2/ 2026 ला ठराव घेऊन अतिरिक्त आधार संचाची मागणी केली. तसा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवला असताना यावर कोणतीही कारवाई झालेली दिसत नाही. या ठरावाला घेऊन आता दोन महिने होत आहेत त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने व लोकप्रतिनिधीने मांडलेल्या या मागणीला जिल्हा प्रशासन दखल घेत नाही की काय अशी प्रतिमा जनमानसात व लोकप्रतिनिधी मधे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या ठरावाला एवढा मोठा प्रशासकीय वेळ लागत असल्यास शासनाची व प्रशासनाची असलेली कर्तव्याची नाळ ही जनतेशी घट्ट आहे का यावरून प्रकर्षाने पुढे समोर येते. ज्यावेळी जनतेची अडचण होईल व जनतेची कोंडी होत असल्यास लोकप्रतिनिधी ठराव घेऊन जनतेची होणारी फटफजीती थांबण्यासाठी ठराव मंजुर करत असताना प्रशासन मात्र यावर तात्काळ कारवाई करून हा प्रश्न मार्गी लावताना दिसत नाही. केवळ आधार संचाच्या मागणीला एवढा वेळ लागत असेल तर जनतेच्या यापेक्षा अतिरिक्त मागण्या असतील तर प्रशासन किती वेळ खाऊपणा घेईल यावरून दिसून पडते. येणाऱ्या काही दिवसांमध्ये इयत्ता दहावी व बारावीचा निकाल लागल्यानंतर व प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना आपल्या नावामध्ये विविध असलेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी आधार संचा कडे वळावे लागते प्रामुख्याने प्रशासन दरबारी ढाणकी हे नगरपंचायत असून आता अपर तहसील मंजूर सुद्धा झाले त्यामुळे, जिल्हा प्रशासनाने व लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या विचार करून अतिरिक्त संचाची मागणी पूर्ण करून वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांची विद्यार्थ्यांची व गरोदर माता भगिनींची हेळसांड थांबवावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## • वेचक

### सौरऊर्जा कार्यक्षमतेसाठी यवतमाळच्या प्राध्यापकाची दुहेरी पेटंट कामगिरी



यवतमाळ - जगदंबा इंजिनिअरिंग कॉलेज येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. आशिष समर्थ यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत दोन महत्त्वपूर्ण पेटंट प्रकाशित केले आहेत. "स्मार्ट सौर पॅनेल स्वच्छता उपकरण" आणि "फोटोव्होल्टाईक मॉड्यूल शीतकरण प्रणाली" या त्यांच्या अभिनव संकल्पनांमुळे सौरऊर्जेच्या कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्मार्ट स्वच्छता उपकरणामुळे सौर पॅनेलवरील धूळ व घाण स्वयंचलितपणे दूर होते, ज्यामुळे ऊर्जा निर्मिती वाढून देखभाल खर्चात बचत होते. ग्रामीण तसेच शहरी सौर प्रकल्पांसाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. तर शीतकरण प्रणालीमुळे पॅनेलचे तापमान नियंत्रित राहून कार्यक्षमता टिकवली जाते, परिणामी अधिक वीज उत्पादन शक्य होते.गेल्या बारा वर्षांपासून अध्यापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रा. समर्थ यांनी यापूर्वीही विविध संशोधन प्रकल्प, कॉपीराइट्स व पुस्तकांद्वारे शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक प्रतिष्ठा उंचावली असून विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा मिळत आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातीले, प्राचार्य व विभागप्रमुखांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### अवैध मुरूम उत्खनन प्रकरणात ७५ लाखांच्यावर दंड

वणी - तालुक्यातील मोहदा येथील गट क्रमांक ७५ मधील अवैध मुरूम प्रकरणात तब्बल ७५ लाख रुपयांच्यावर दंड ठोठावण्यात आला. २४ एप्रिल रोजी हा निर्णय देताना वणी न्यायालयाने तहसीलदारांचा यापूर्वीचा आदेश कायम ठेवला. त्यामुळे तहसीलदारांच्या आदेशावर स्थगिती मिळविण्यासाठी न्यायालयात धाव घेणाऱ्या फिर्यादींना जोरदार दणका बसला आहे. या प्रकरणात गौतमचंद सुराणा, ज्ञानेश्वर येसेकर, चंद्रशेखर देते, प्रशांत उरकुडे आणि जे. बी. वर्मा यांनी न्यायालयात धाव घेतली होती. वणी तहसीलदारांनी ७ ऑगस्ट २०१८ व २० ऑक्टोबर २०१८ रोजी दिलेल्या आदेशांविरोधात त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, कोर्टातून दिलासा मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरला. सचिन रासेकर व गावकऱ्यांच्या तक्रारीनंतर महसूल विभागाने केलेल्या तपासात मोठा भंडाफोड झाला होता. तलाठी पंचनामा आणि अहवालानंतर पीडब्ल्यूडी व भूमापन विभागाच्या संयुक्त पथकाने इटीएस यंत्राद्वारे केलेल्या मोजणीत तब्बल ५,५३५ ब्रास उत्खनन आढळले. त्यापैकी ४,१०० ब्रास उत्खनन वैध असले तरी उर्वरित १,४३५ ब्रास उत्खनन हे अवैध असल्याचे स्पष्ट झाले.

## राष्ट्रीय जनगणना अभियान; प्रगणकांचे प्रशिक्षण शिबिर सुरू!

# जिल्हाधिकारी यांची प्रशिक्षण स्थळाला भेट

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राष्ट्रीय जनगणना अभियान अंतर्गत २४ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ पर्यंत शहरी भागातील प्रगणकांचे जनगणना प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून शहरातील विभागवार प्रगणक यांना स्थानिक माँ जिजाऊ न. प. प्राथमिक शाळा क्रमांक २० मध्ये आयोजित या विशेष प्रशिक्षण शिबिरात नियुक्त फील्ड ट्रेनर प्रशिक्षण देत आहेत. दरम्यान जिल्हाधिकारी विकास मिना यांनी या प्रशिक्षण स्थळी भेट देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले. या प्रसंगी जनगणना जिल्हा समन्वयक जतिन माहेश्वरी, सा.प्र. विभागाच्या तहसीलदार विद्या शेंडे, यांनीही मार्गदर्शन केले.

गैरहजर प्रगणकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तीन तुकड्यात प्रशिक्षणार्थी प्रगणकांची विभागणी करण्यात आली आहे. येत्या ६ मे पर्यंत हे प्रशिक्षण न. प. च्या माँ जिजाऊ प्राथमिक शाळेत सुरू राहणार आहे. दरम्यान प्रशिक्षण शिबिरात गैरहजर असणाऱ्या ११ प्रगणकांना कारणे



दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

दिलेल्या कालावधीत गैरहजर प्रगणकांचा समाधानकारक खुलासा प्राप्त झाला नाही तर जनगणना नियम १९९० चे कलम ५-३(ब) जनगणना अधिनियम १९४८ चे कलम ११ नुसार तसेच भारतीय न्यायसहिंता कलम १८७ अन्वये संबंधित प्रगणक व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे चार्ज अधिकारी जनगणना तथा मुख्याधिकारी गिरीश परळेकर यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. जनगणना अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात गृहगणना करण्यात येणार आहे. पर्यवेक्षक व प्रगणक यांच्यातील समन्वय कसा असावा, प्रत्यक्ष फिल्डमध्ये जाऊन नागरिकांशी संवाद साधणे, प्रपत्रकातील मुद्दे चिन्हांकित करून गणना कशी करावी याबाबतचे मार्गदर्शन मान्यवरांनी केले.

शहरी भागातील प्रगणकांचे फील्ड ट्रेनर म्हणून डॉ. विनोद डवले, विलास काळे, मजहर अली, राजेंद्र मेनकुदळे, लक्ष्मीकांत कांबळे आणि प्रमोद शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून शहरी जनगणना कक्षाचे लिपिक शेख साजिद यांनी प्रशिक्षण स्थळाची व्यवस्था सांभाळली आहे.

# माजी शिक्षणाधिकारी रंगराव काळे यांना विदर्भभूषण पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल!

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - कन्या शाळा मैदान दर्यापूर येथे पार पडलेल्या रोहिणी फाउंडेशन व दैनिक विदर्भ केसरी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित कार्यक्रमात. प्रतिष्ठित विदर्भातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना विदर्भभूषण पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रामध्ये अद्वितीय कामगारी करणारे पुसद येथील रंगराव काळे माजी शिक्षणाधिकारी तथा अध्यक्ष एम.जे. के.इंग्लिश स्कूल व व्ही. पी. जुनियर कॉलेज बोरगडी यांचे महाराष्ट्रातील विनोदाचा बादशाह सिने कलावंत मकरंद अनासपुरे व अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखेडे यांच्या हस्ते विदर्भातील प्रतिष्ठित विदर्भभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख लाभलेले महाराष्ट्रातील विनोदाचे बादशहा सिने कलावंत मकरंद अनासपुरे हे होते तर अध्यक्ष म्हणून अमरावती जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बळवंत वानखेडे हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित दैनिक तरुण भारत चे संपादक सुधीर पाठक हे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच उद्घाटक म्हणून दर्यापूर नगरपरिषदचे नगराध्यक्षा सौ मंदाकिनी भारसाकळे व प्रमुख पाहुणे म्हणून सत्यशोधक चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक प्रा. निलेश जळमकर, राष्ट्र निर्माण प्रशासकीय अकादमीचे संचालक प्राध्यापक गजानन कोरे, संत गाडगेबाबा मिशनचे संचालक गजानन देशमुख, विदर्भ केसरीचे संपादक अमोल कंटाळे, आदी उपस्थित होते. सर्वप्रथम दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर दैनिक विदर्भ केसरी वर्धापन दिन पुरवणीचे प्रकाशन सोहळा सिने कलावंत मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी विदर्भातील विविध क्षेत्रातील नामवंत तसेच विशेष कार्य करणारे दहा व्यक्तींचा प्रतिष्ठित असा विदर्भभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये सर्वप्रथम पुसद येथील रंगराव काळे यांचे नाव प्रामुख्याने विशेष असे शिक्षण क्षेत्रातील भरू कामगिरी बजावणारे असे माजी शिक्षण अधिकारी रंगराव काळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारसरणी, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि शिक्षणाविषयी असल्याने अटळ बांधिलकीतून त्यांनी जी.एस. जे. एस. बी. एम, या शैक्षणिक संस्थेची स्थापना करून शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. या तत्त्वज्ञानावर त्यांनी संस्थेची भक्कम पाया भरणी केली आहे.

# कृतिशील शिक्षक सैय्यद सलमान यांना 'आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - 24/04/2026 रोजी गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड आर्ट्स,पुसद येथील कृतिशील शिक्षक सैय्यद सलमान सरांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पुसद तर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. विशेष म्हणजे, माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या "माझी शाळा, सुंदर शाळा" या अभियानात त्यांनी नोडल अधिकारी म्हणून दिलेल्या सक्रिय सहभाग व प्रभावी योगदानाचाही या सन्मानामध्ये गौरव




करण्यात आला.

सलमान सर गेल्या 12 वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी मराठी, समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांत एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. सध्या ते संत साहित्य या विषयावर पीएच.डी.चे संशोधन करीत आहेत.ते केवळ शिक्षक म्हणूनच नव्हे तर संत साहित्याचे अभ्यासक म्हणूनही प्रबोधनाच्या सामाजिक कार्यात योगदान देतात. विद्यालयात त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर गाईडन्स कार्यशाळा तसेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विद्यालयाच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहून शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद सादिक शेख सर यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यालयातील शिक्षकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सन्मानाबद्दल सैय्यद सलमान सर यांनी मुख्याध्यापक मोहम्मद सादिक शेख सरांचे तसेच सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थेचे आभार मानले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण शिक्षकवर्गात आनंदाचे वातावरण असून इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळत आहे.

# महागाव तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून बेमुदत बंद आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित अडचणींवर कृषी विभागाकडून योग्य ती कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ महागांव तालुका कृषी साहित्य विक्रेता संघाच्या वतीने २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत "बी-बियाणे व कृषी निविष्ठा विक्री केंद्र बंद" आंदोलन पुकारण्यात आले आहे.

तालुक्यातील विविध कृषी केंद्र चालकांना भेडसावत असलेल्या अनेक गंभीर समस्या अद्याप निकाली न लागल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. प्रमुख अडचणींमध्ये कंपन्यांकडून रासायनिक खतांचा अपुरा पुरवठा, बेकायदेशीर लिंकिंग पद्धती, शेजारील राज्यांतून येणाऱ्या अप्रमाणित बियाण्यांची विक्री, तसेच एसटीबीटी कंपनीशी संबंधित बियाण्यांचे प्रलंबित प्रश्न यांचा समावेश आहे. या सर्व समस्यांमुळे कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा व्यवसाय मोठ्या अडचणीत सापडला असून शेतकऱ्यांनाही याचा फटका बसत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन प्रश्न सोडवावेत, अशी मागणी संघटनेने केली आहे. याबाबतचे निवेदन दि. २४ एप्रिल २०२६ रोजी मा. तहसीलदार, मा. तालुका कृषी अधिकारी तसेच पंचायत समिती महागांव येथील कृषी अधिकारी यांना देण्यात आले. या वेळी तालुक्यातील सर्व मार्केटमधील अध्यक्ष, संघटनेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कृषी निविष्ठा विक्रेते उपस्थित होते. संघटनेने दिलेल्या इशाऱ्यानुसार, मागण्या मान्य न झाल्यास २७ एप्रिल पासून तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. या आंदोलनामुळे शेती हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने मध्यस्थी करून तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ढाणकी येथे ' श्री छत्रपती शिवाजी माहाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा १' संदर्भात पूर्वतयारी बैठक संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी

ढाणकी - महाराष्ट्र शासनाच्या 'श्री छत्रपती शिवाजी महाराज स्व-समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ढाणकी महसूल मंडळामध्ये पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठक आज तलाठी कार्यालय, ढाणकी येथे पार पडली.

या बैठकीला तालुक्याचे नायब तहसीलदार श्री. आर. ए. पंडित तसेच मंडळ अधिकारी श्री. एस. एम. वाघमारे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे नियोजन, लाभार्थी निवड, विविध



विभागांमधील समन्वय तसेच शिबिराची प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, कृषी सहाय्यक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विभागांनी समन्वय साधून नागरिकांना शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचा शासनाचा मानस असून, ढाणकी महसूल मंडळात हे अभियान प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला आहे.

# "नांदेड पिक विमा मंजूर, यवतमाळवर अन्याय का?

## २७ एप्रिलला कृषी कार्यालयावर 'मुक्काम पोस्ट'चा इशारा!"

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात सोयाबीन पीक विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असताना, विदर्भातील प्रमुख कृषी जिल्हा असलेल्या यवतमाळमधील शेतकरी मात्र अद्याप प्रतीक्षेतच आहेत. या दुजाभाव विरोधात शेतकरी चळवळीने आक्रमक भूमिका घेत सोमवार, २७ एप्रिल रोजी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयावर 'मुक्काम पोस्ट' आंदोलन छेडण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

राज्यातील सरकारच्या नेतृत्वाखाली नांदेडमध्ये हेक्टरी मोठ्या प्रमाणात विमा मिळत असताना, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्यापही मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यात तीन मंत्री असतानाही हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वी अनेक निवेदने, आंदोलने व बैठका घेऊनही ठोस निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. "नांदेडला पैसे मिळतात, मग यवतमाळला कधी?" हा सवाल आता अधिक तीव्र झाला आहे.

प्रा. पंढरी पाठे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनातून पीक विम्याची रक्कम तात्काळ जमा करण्याची मागणी करण्यात येणार असून, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीतर्फे पत्रकार विवेक वानखडे यांचा गौरव



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दुसऱ्या पर्वातील अठेचाळीसावे पूजन रविवारी दि.२६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे साप्ताहिक पूजन यवतमाळ येथील म. फुले चौक, आझाद मैदान समोर उत्साहात पार पडले.

यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व मुस्लिम समाज यांच्या वतीने उत्कृष्ट पत्रकार म्हणून गौरव करण्यात आला. त्यामुळे विवेक वानखडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीतर्फे गौरव करण्यात आला. तसेच शशिकांत लोळगे व जितेश नवाडे याचा सुद्धा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास पवन थोटे, सुरेश भावेकर, विजय शिंदे, सुनील सोडगीर, श्रेया शिंदे, राजू गिरी, विजय मालखेडे, किशोर शेळके, रमेश उघडे आदी समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त



### रजिया सुलताना यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती-**जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका रजिया सुलताना यांच्या गाडगेबाबाच्या किर्तनातील समाजचिंतन या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पुणे येथे एस.एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन येथे झालेले आहे.प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे डॉ. सदानंद मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे निवृत्त पोलीस महासंचालक अशोक धिवरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, उत्तराखंड महिला आयोगाच्या उपाध्यक्षा शायरा बानो, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमोसुद्दीन तांबोळी आणि हैदराबादचे प्रसिध्द कथा लेखक शेख युसुफ हजर होते.संचालन रशियन भाषातज्ञ ईशाद वडगावकर आभार प्रदर्शन दिलावर शेख यांनी केलेले आहे.पुस्तक प्रकाशन सोहळ्याला अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, लेखक उपस्थित होते. रजिया सुलताना ह्यांचे सामाजिक आशयाचे हे चाळीसावे पुस्तक आहे.

### निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांना राज्यस्तरीय ‘कार्य गौरव’ पुरस्कार

**अमरावती-**येथील निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांना



यंदाचा आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित ‘राज्यस्तरीय कार्य गौरव’ पुरस्कार जाहीर झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला व क्रीडा संस्थेच्या वतीने या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.दादाजी वंशपायन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके आणि सचिव फुलचंद्र रोकडे यांनी या निवडीबाबत अधिकृत माहिती दिली. ११ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.काकडे यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत सामाजिक बांधिलकी जपत राबवलेले विविध उपक्रम आणि त्यांच्या जनहितार्थ कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, १ मे रोजी वैश्यपायनगर येथील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संतोष काकडे यांना हा सन्मान मिळाल्याबद्दल जिल्हा प्रशासन व सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### बसस्थानक परिसरात पाणपोईचे उद्घाटन

**अचलपूर-**आदिवासी पर्यावरण संघटन, युवासेना (शिंदे गट), मानव सेवा समिति, हॉटेल अनिल इन, शकुंतला रेल बचाव समिती, वनविभाग परतवाडा, सामाजिक वनीकरण अचलपूर यांचा संयुक्त उपक्रम परतवाडा बस स्थानक येथे प्रवाशी वर्गाकरिता पाणपोई ची व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते पानेरीचे उद्घाटन करण्यात आले. अधिरा सुशांत काळे या चिमुकलीने आपल्या वाढदिवसानिमित्त पक्षी साठी ५० जलपात्र पर्यावरण समितीला भेट दिली.तसेच सर्व पदाधिकारी यांनी ऑक्सिजन पार्क मधे जाऊन जनजागृती अभियान राबविल. यावेळी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने, आगार व्यवस्थापक जिवन वानखडे, सहायक वनपाल वनविभाग सचिन वानखडे, अनिल पिंपळे, वनक्षेत्रपाल सुशांत काळे, योगेश खानझोडे यांचे सह अनेक जण उपस्थित होते.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्राला बळ

## महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा ‘मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेसाठी ‘रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर’ तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल ‘क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड’ने गौरविण्यात आले.

भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. हरित ऊर्जेला प्राधान्य मिळाल्याने शेतकऱ्यांना दिवसा व स्वस्त वीज उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. तर वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला ‘क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड’ने गौरविण्यात आले. तसेच ‘मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक ९ लाख १७ हजार सौर पंप कार्यान्वित केले आहे. देशात सर्वाधिक ६४ टक्के सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ५ लाख ५ हजार (३४ टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहे. या योजनेतून केवळ ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप कार्यान्वित करण्याच गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे ४२ लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरु झाला आहे. महावितरणला ’रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.



## श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात संस्कार शिबीर

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालय ,धामणगाव रेल्वे येथे विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ, नागपूर व श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमानाने आंतरशालेय विज्ञान संस्कार शिबिराचे आयोजन २४ ते ३० एप्रिल २०२६ च्या दरम्यान करण्यात आलेले आहे.

शिबिरासंबंधी प्रशिक्षण कार्यशाळा नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी प्रकाश इटणकर ,सचिव विज्ञान भारती विदर्भ प्रांत नागपूर ,वसुंधरा साठे सहसचिव, विदर्भ विज्ञान भारती, नागपूर, माधुरी डेहटकर विदर्भ विज्ञान मंथन प्रांत



समन्वयक,मिलिंद ठोकळ , सदस्य विज्ञान भारती तसेच विनआयटीचे प्राध्यापक,भुरचुंडी व भट यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय सहसचिव डॉ असित पसारी उपस्थित होते. अध्यक्षस्थान शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता देशपांडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी डॉ. असितजी पसारी यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शनात झाला.

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे २७ एप्रिलपासून आंदोलन

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ नांदगाव तालुक्यातील कृषी साहित्य विक्रेता संघाच्या वतीने २७ एप्रिल पासून बेमुदत बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून याबाबतचे निवेदन तहसीलदार तथा तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले.

अनेक दिवसापासून या व्यवसायातील कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणी बाबत पाठपुरावा करूनही कृषी विभाग व शासन कडून या समस्यावर कोणतीच ठोस कारवाई होताना दिसत नाही. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे तीव्र असंतोष पसरला असून २७ एप्रिल पासून कृषी निविष्ठा विक्री बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.



केंद्र व राज्य सरकारकडे हा प्रश्न प्रभावीपणे मांडल्या जावा यासाठी नांदगाव खंडेश्वर येथील कृषी साहित्य विक्रेत्या संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले. अन् अधिकृत एच टी बी टी विक्री खत कंपन्याकडून करण्यात येणारे लिंकिंग तसेच अवैध कीटकनाशके थेट एजंट मार्फत शेतकऱ्यांना विक्री करण्यासाठी आळा घालण्याची मागणी करण्यात आली.याशिवाय मुदत बाह्य कीटकनाशके पुरवठादार कंपन्यांना विक्रेत्याकडून परत घेणे शेजारी राज्यातून येणारी दुय्यम दर्जाची औषधे कीटकनाशके तणनाशके बियाणे रासायनिक खते यांना शेतकऱ्यास विक्री करण्यास प्रतिबंध करणे केंद्र शासनाचे कृषी विभागाकडून नवीन बियाणे कायदा २५ मधील विक्रेत्यासाठी जाचक अटी स्थितील करणे इत्यादी मागण्यासह अडचणी सोडविण्यासाठी कृषी विभागाकडून ठोस निर्णय होत नसल्याने सर्व कृषी केंद्र चालकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजीची भावना आहे.

या सर्व अडचणीचा निर्णय न झाल्यास नाईलाजासह २७ एप्रिलपासून बेमुदत बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी संघटनेचे अध्यक्ष सुनील शिरभाते, नरेंद्र कणसे, जितेंद्र गावंडे, पंकज ठाकरे, अशोक कणसे, राहुल उडबगले, उमेश देवघरे, अक्षय देशमुख, दीपक भगत यांचे सह नांदगाव तालुक्यातील कृषी साहित्य विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कांदा उत्पादक शेतकरी बेहाल

### भाव नसल्याने संकट

**कुऱ्हा/वार्ताहर**

तिवसा तालुक्यातील कुऱ्हा परिसरातील कांदा उत्पादनाचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मारडा व इतर भागातील कांदा उत्पादकांचे यावर्षी अतिशय बेहाल होत असल्याचे दिसून येत आहे.

कांदा लागवडीचा खर्च किती येतो आणि उत्पन्न किती होते यावर शेतकरी अवलंबून असतो महागाई इतकी आहे. बियाणांपासून तर खते, किटक नाशके व लागणारी मशागत व मजुरी आणि ओलीत पाणी देणे इत्यादीचा खर्च काढला की, त्या शेतकऱ्यांना किती उरते हे मात्र कळत नाही.यात यावर्षी कांदाचे भाव ४०० ते ५०० प्रती क्विंटल त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणते उत्पन्न घ्यावे असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.

शेतकऱ्यांचा कोणताही माल निघाला की, त्याच्या मालाला अजिबात भाव मिळत नाही. मात्र पेरणी करिता कोणत्याही वस्तू घ्यावा लागल्यास महागाईचे सर्वच बियाणे, खते, किटक नाशके, मशागत आणि लागणारी मंजूरी याचा विचार केला तर शेती करणे फारच अवघड झाल्याचे पाहवयास मिळत आहे.मात्र



शासन याची कोणतीही दखल घेत नाहा.निवळ पोकळ घोषणाबाजी करून शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. तेव्हा शेतकऱ्यांच्या कांदा या उत्पन्नाला योग्य भाव मिळावा अशी अपेक्षा या भागातील सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांची एकमुखी मागणी आहे.

### दुकाने १० वाजता बंद करण्याच्या निर्णयावर व्यापारी वर्गात रोष

## परतवाडयात खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची पळापळ

**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरात कायदा व सुव्यवस्थेचे कारण पुढे करीत पोलिस प्रशासनाने मुख्य बाजारपेठेतील व्यावसायीक प्रतिष्ठाने रात्री १० वाजता बंद करण्याचा निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यानी तीर्व रोष व्यक्त केला आहे.एकीकडे रात्री १० वाजताच हातात दंडुके घेऊन दुकान बंद करण्याचे फर्मान सोडणाऱ्या पोलिसांमुळे बाजारपेठेत भीती पसरली आहे.

परतवाडा ही या भागातील मोठी बाजारपेठ असल्याने मेळघाटसह अचलपूर-चांदूर बाजार तालुक्याच्या ग्रामीण भागातील नागरिक येथे खरेदीसाठी येतात. सध्या एप्रिलचे कडाक्याचे ऊन असल्याने नागरिक दुपारी बाहेर पडणे टाळत आहेत. सायंकाळनंतर बाजारपेठेत गर्दी होत असतानाच रात्री १० वाजता पोलीस शिट्ट्या वाजवत आणि हातात दंडुके घेऊन दुकानदारांना हुसकावून लावत आहेत. यामुळे खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची मोठी पळापळ होत असून व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यावर व्यापारी संघटनासुद्धा आता निवेदन देण्याच्या तयारीत आहे. परतवाडा शहरात सर्वसामन्यांना वेठीस धरण्याचे कारण काय? हा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे. एकीकडे लग्न सराईचे मोठे मुहूर्त आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिक लग्नाची खरेदीसाठी रात्री उशिरा पर्यंत बाजार पेठेत थांबतात यामुळे तगडा पोलिस बंदोबस्त असताना रात्री ११ वाजेपर्यंत प्रतिष्ठाने सुरू ठेवण्यास अडचण काय ? हा प्रश्न सुद्धा नागरिकांनी उपस्थितीत केला आहे.

> रात्री १० वाजता दुकाने बंद करण्याचा निर्णय आर्थिकदृष्ट्या कठीण आहे.संध्याकाळीच ग्राहकांची सर्वाधिक गर्दी होत असते. वेळेची मर्यादा वाढविण्याचा प्रशासनाने विचार करावा. सुरक्षेच्या दृष्टीने निर्णय योग्य असला तरी व्यापाऱ्यांचे नुकसान टाळावे, याबाबत प्रशासनाने व्यापाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढावा.
>
> **गौरव बंसल,** व्यापारी, परतवाडा.

# सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सव



## अनिरुद्ध जोशी,मधुरा कुंभार,मंगेश बोरगावकर व राधिका भिडे यांची मैफिल

## ‘हे सुरांनो चंद्र व्हा…’ चे गुरुवारी आयोजन

**अमरावती/का.प्र.**


सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवात येत्या गुरुवारी ३० एप्रिल रोजी महाराष्ट्रातील आघाडीचे प्रतिभावंत गायक अनिरुद्ध जोशी ,मधुरा कुंभार , मंगेश बोरगावकर व राधिका भिडे यांचा ’हे सुरांनो चंद्र व्हा…’ ही मराठी व हिंदी गीतांच्या सादरीकरणाची मैफिल आयोजित करण्यात आली आहे . संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६. ३० वाजता आयोजित हा कार्यक्रम नि:शुल्क आहे.

सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ , आम्ही सारे फाऊंडेशन आणि सोमेश्वर पुसतकर मित्र परिवाराच्या वतीने दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते . या महोत्सवाला अमरावतीकरांचा भरघोस प्रतिसाद लाभतो. मागील वर्षी आयोजित महोत्सवाला अमावतीकरांनी रेकॉर्डब्रेक गर्दी केली होती. यावर्षीच्या ज्या चार गायकांचा कार्यक्रम आयोजित केला आहे . ते चारही महाराष्ट्रातील नामवंत व गाजलेले कलाकार आहेत .

**मधुरा कुंभार-**‘५७ व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट’ व ‘स्त्री शक्ती सन्मान’ या पुरस्कारांच्या विजेत्या असून ‘सारेगामापा, सिंगिंग सुपरस्टार’ आणि ‘सुर नवा ध्यास नवा’ या लोकप्रिय कार्यक्रमांतून त्यांनी आपल्या प्रभावी, भावपूर्ण गायकीची छाप पाडत संपूर्ण महाराष्ट्रात भक्कम नावलौकिक मिळवला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण साधना, व्यासंगी वृत्ती आणि दर्जेदार सादरीकरणामुळे त्या संगीतविश्वात एक सक्षम व आश्वासक आवाज म्हणून उदयास आल्या आहेत.

**मंगेश बोरगावकर-**मंगेश बोरगावकर हे मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक आहेत.

२००६ मध्ये झी मराठी वाहिनीवर सुरू झालेल्या ‘सा रे ग म प’ या लोकप्रिय



गायन रिॲलिटी शोच्या पहिल्या पर्वाचे ते उपविजेते (Runner-up) ठरले होते. याच कार्यक्रमाने त्यांना महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवले आणि त्यांच्या व्यावसायिक सांगीतिक प्रवासाची सुरुवात झाली.त्यांनी गायलेली ‘नाही कळले कधी’,‘तुझ्याविना’ ही गाणी अत्यंत लोकप्रिय आहेत. तसेच त्यांचा ’दिवाना झालो तुझा’ हा संगीत अल्बम तरुण वर्गात प्रचंड गाजला होता.

मंगेश बोरगावकर हे मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक आहेत.२००६ मध्ये झी मराठी वाहिनीवर सुरू झालेल्या ‘सा रे ग म प’ या लोकप्रिय गायन रिॲलिटी शोच्या पहिल्या पर्वाचे ते उपविजेते (Runner-up) ठरले होते. याच कार्यक्रमाने त्यांना महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवले आणि त्यांच्या व्यावसायिक सांगीतिक प्रवासाची सुरुवात झाली.त्यांनी गायलेली ‘नाही कळले कधी’, ‘तुझ्याविना’ ही गाणी अत्यंत लोकप्रिय आहेत. तसेच त्यांचा ’दिवाना झालो तुझा’ हा संगीत अल्बम तरुण वर्गात प्रचंड गाजला होता.


**राधिका भिडे-**राधिका प्रामुख्याने ‘आय पॉपस्टार’ (I-Popstar) या हिंदी म्युझिक रियालिटी शोमुळे प्रकाशझोतात आली. या स्पर्धेत तिने केवळ गायिका म्हणून नव्हे, तर स्वतः गाणी लिहून आणि ती कंपोज करून सादर केली.तिचे ‘मन धावतंया’ हे गाणे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. या गाण्याने तिला घराघरात पोहोचवले.तिच्या एका संस्कृत लघुपटासाठी तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार मिळाला आहे.तिने ‘दे धक्का २’ सारख्या चित्रपटांसाठी सहाय्यक संगीत दिग्दर्शिका म्हणूनही काम केले आहे. राधिका प्रामुख्याने ‘आय पॉपस्टार’ (I-Popstar) या हिंदी म्युझिक रियालिटी शोमुळे प्रकाशझोतात आली. या स्पर्धेत तिने केवळ गायिका म्हणून नव्हे, तर स्वतः गाणी लिहून आणि ती कंपोज करून सादर केली. तिचे ‘मन धावतंया’ हे गाणे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले.

या गाण्याने तिला घराघरात पोहोचवले.तिच्या एका संस्कृत लघुपटासाठी तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार मिळाला आहे.तिने ‘दे धक्का २’ सारख्या चित्रपटांसाठी सहाय्यक संगीत दिग्दर्शिका म्हणूनही काम केले आहे.

**अनिरुद्ध जोशी -**‘सा रे ग म प – सुर नवा ध्यास नवा’ या प्रतिष्ठित मंचावर अनिरुद्ध जोशी यांनी आपल्या सुरेल, भावस्पर्शी आणि दमदार आवाजाच्या जोरावर प्रेक्षकांची मनं जिंकली. ‘सा रे ग म प’ मध्ये फायनलिस्ट म्हणून तर ‘सुर नवा ध्यास नवा’ या स्पर्धेत त्यांनी विजेतेपद पटकावत आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला. विविध गायनशैलींवर प्रभुत्व, अथक मेहनत आणि संगीतावरील निष्ठा यांच्या बळावर त्यांनी ‘महाराष्ट्राचा महागायक’ ही मानाची ओळख निर्माण केली.

# आकड्यांपल्याडचा लोकशाहीचा आत्मा

**महिला आरक्षण विधेयकाच्या निमित्ताने पुन्हा एकदा मतदारसंघांच्या पुनर्रचनेवर देशभर चर्चा सुरू झाली. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार असला तरी लोकसंख्यानियंत्राचे धोरण यशस्वीपणे राबवणाऱ्या दक्षिण भारताला त्याची शिक्षा मिळू नये. याप्रश्नी समतोल विचार करून मधला मार्ग अवलंबणे गरजेचे आहे.**



चालू एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात संसदेचे विशेष अधिवेशन भरले, तेव्हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एका अत्यंत महत्त्वाच्या अध्यायाची सुरुवात झाली. राज्यघटना (१३१वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ आणि मतदारसंघांची पुनर्रचना विधेयक, २०२६ या दोन्ही विधेयकांनी एका ऐतिहासिक चर्चेला जन्म दिला आहे. ही चर्चा केवळ मतदारसंघांच्या संख्येबाबत नाही, ती भारतीय लोकशाहीच्या मूलभूत स्वरूपाबाबत आहे. ती पक्षीय राजकारणाच्या धुरळ्यात हरवू नये म्हणून तिला राज्यघटनेच्या उजेडात समजून घेणे अत्यावश्यक आहे.

सर्वप्रथम एक अस्वस्थ करणारे सत्य मांडणे आवश्यक आहे, जे सर्व पक्षांना लागू होते. लोकसभेची सध्याची रचना लोकशाहीच्या दृष्टीने एक कालबाह्य व्यवस्था आहे. भारताचे संसदीय प्रतिनिधित्व गेल्या पाच दशकांहून अधिक काळ १९७१च्या जनगणनेवर गोठवले गेले आहे आणि या काळात देशाची लोकसंख्या ५४.१ कोटींवरून तब्बल १४० कोटींवर पोहोचली आहे. त्यातून एक गंभीर असमतोल तयार झाला आहे. आज बिहारमधील एक खासदार सुमारे ३१ लाख नागरिकांचे प्रतिनिधित्व करतो, केरळमधील एक खासदार जेमतेम १७.५ लाख नागरिकांचे तर उत्तर प्रदेशात एक खासदार सुमारे ३० लाख लोकांसाठी बोलतो. ही एक केवळ आकडेवारी नाही, हा 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वाचे उल्लंघन आहे.

सन १९७६च्या ४२व्या घटनादुरुस्तीने जागांचे वाटप १९७१च्या जनगणनेवर गोठवले. सन २००२च्या ८४व्या घटनादुरुस्तीने ती मुदत २०२६पर्यंत वाढवली. लोकसंख्या नियंत्रणास प्रोत्साहन देण्यासाठी सुरू झालेली ही व्यवस्था आता एका दीर्घकालीन त्रुटीमध्ये रूपांतरित झाली आहे. मूळ राज्यघटनेने दर ७ लाख ५० हजार नागरिकांमागे एक खासदार हे प्रमाण निश्चित केले होते; आज राष्ट्रीय सरासरी दर २५ लाख नागरिकांमागे एक खासदार अशी झाली आहे. भारतीय नागरिकांना संसदेत अपुऱ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत आहे. त्यात सुधारणा करणे हा केवळ राजकीय विषय नाही, ती एक घटनात्मक आणि लोकशाहीवादी अनिवार्यता आहे.

'मतदारसंघांची पुनर्रचना विधेयक, २०२६' हे लोकसभेचे संख्याबळ ५४३वरून सुमारे ८१६ ते ८५० जागांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव ठेवते, हे एक खरोखरच ऐतिहासिक महत्त्वाचे पाऊल आहे. हवामान बदल, तंत्रज्ञान, सार्वजनिक आरोग्य, आर्थिक असमानता आणि भू-राजनैतिक संक्रमणाशी सामना करत असलेल्या १४० कोटींच्या देशात एक मोठे, अधिक प्रतिसादक्षम प्रतिनिधीगृह ही गरजेची बाब आहे. या प्रस्तावासोबत 'नारी शक्ती वंदन अधिनियम' महिलांसाठी ३३ टक्के जागा राखून ठेवणारा २०२३ चा कायदा लागू होण्याची शक्यताही आहे. जी लोकशाही स्वतःच्या निम्म्या लोकसंख्येला पुरेसे प्रतिनिधित्व नाकारते, ती खऱ्या अर्थाने पूर्ण लोकशाही असू शकत नाही. त्यामुळे मतदारसंघांच्या पुनर्रचनेची प्रेरणा न्याय्य आणि आवश्यक आहे.

या पुनर्रचना प्रस्तावाला सर्वांत ठोस आणि घटनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आव्हान दक्षिण भारतातून आले आहे.तमिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगण या राज्यांकडून आलेले हे आव्हान केवळ प्रादेशिक अस्मितेमधून केलेले आकांडतांडव नाही, तर तो एक सखोल घटनात्मक प्रश्न आहे. या पाच राज्यांनी विकासाच्या दृष्टीने एक दुर्मीळ कामगिरी केली आहे त्यांनी केंद्र सरकारच्या लोकसंख्या नियंत्रण धोरणांची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे. एकूण प्रजनन दर २.१ स्थिर ठेवण्यात यशस्वी ठरलेले केरळ हे भारतातील पहिले राज्य आहे. तमिळनाडू, कर्नाटक आणि तेलंगणाने तुलनात्मक लोकसंख्या स्थिर ठेवली. परंतु, केवळ लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना झाली तर त्यांच्यासाठी ही एक शिक्षा ठरेल. राष्ट्रीय धोरणाचे पालन करणाऱ्या राज्यांना शिक्षा आणि ते धाब्यावर बसवणाऱ्यांना बक्षीस, अशी परिस्थिती होईल.

या संदर्भातील आकडेवारी बोलकी आहे. केवळ सध्याच्या लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना केल्यास केरळच्या जागांमध्ये शून्य टक्के वाढ होईल, तर तमिळनाडूत केवळ २६ टक्के; मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशला मात्र ७९ टक्के वाढ मिळेल. सर्वोच्च न्यायालयाने २०२५मध्ये निरीक्षण नोंदवले होते की, लोकसंख्येवर आधारित मतदारसंघांची पुनर्रचना लोकसंख्येवर प्रभावी नियंत्रण मिळवणाऱ्या दक्षिण भारतावर अन्यायकारक ठरेल. दक्षिणेकडील राज्यांकडे सध्या ५४३ पैकी १२९ जागा म्हणजे २३.७६ टक्के लोकसभा प्रतिनिधित्व आहे आणि भारताच्या एकूण जीडीपीमध्ये त्यांचा वाटा सुमारे ३१ टक्के आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात कर्नाटक, तेलंगण आणि तमिळनाडूने मोठ्या राज्यांमध्ये सर्वाधिक दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न नोंदवले आहे. ही राज्ये याचक नाहीत, ती संविधानिक न्यायाची मागणी करणारी, उच्च कामगिरी करणारी राज्ये आहेत.

हा अन्याय आर्थिक क्षेत्रातही दिसतो. वित्त आयोगाची आकडेवारी पाहता दक्षिणेकडील राज्यांनी राष्ट्रीय कर निधीत घसघशीत योगदान दिले आहे; परंतु, त्यांना परत मिळणारा वाटा तुलनेने कमी आहे. आधीच्याच या आर्थिक असंतुलनात आता लोकसंख्येवर आधारित प्रतिनिधित्वाची भर पडणार असेल तर ते संघराज्यीय समीकरणावर नवा ताण निर्माण करेल. लोकसंख्येवर आधारित मतदारसंघांच्या पुनर्रचनेमुळे उत्तरेकडील राज्यांना ४३ जागा अधिक मिळतील, तर दक्षिणेकडील राज्ये २४ जागा गमावतील, हे २०२५ मध्ये प्रकाशित एका पाहणीतून स्पष्ट झाले आहे. हे संघराज्यीय समतोलात मूलभूत बदल घडवणारे ठरेल. त्यामुळे दक्षिणेकडील राज्यांची मागणी प्रथमदर्शनी अवास्तव वाटत असली, तरी त्यामागील घटनात्मक चिंता अत्यंत वैध आहे.

भारत हा जाणीवपूर्वक विविध राज्यांचे एक संघराज्य म्हणून साकारला गेला. प्रत्येक राज्याचा स्वतःचा इतिहास, संस्कृती, अर्थव्यवस्था आणि लोकसंख्याशास्त्रीय मार्ग आहे. राज्यघटना ही केवळ केंद्रीकृत लोकशाहीचा आराखडा नाही; ती म्हणजे केंद्र आणि राज्यांमधील एक करार आहे. अनुच्छेद १ भारताला 'राज्यांचा संघ' म्हणतो, हे शब्द अपघाताने नव्हे, तर सखोल विचारांती निवडले गेले आहेत.

घटनादुरुस्ती विधेयकाबाबत (१३१ व्या) घटनातज्ज्ञांकडून गंभीर कायदेशीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संसदीय जागांचे वाटप थेट नियंत्रित करणाऱ्या अनुच्छेद ८२ मधील बदलांसाठी अनुच्छेद ३६८(२) अंतर्गत किमान निम्म्या राज्यांच्या विधानसभांच्या मंजुरीची आवश्यकता आहे, हे कदाचित पूर्णपणे पाळले जात नाही. संसदेला साध्या बहुमताने मतदारसंघांची पुनर्रचना कधी करायची आणि कोणती जनगणना वापरायची हे ठरवण्याचा अधिकार दिल्यास, एक गंभीर आणि अपरिवर्तनीय संघराज्यीय प्रश्न त्या वेळच्या सत्ताधारी पक्षाच्या हातात सोपवण्याचा धोका निर्माण होतो. ही केवळ तांत्रिक बाब नाही, हा संविधानिक वादाचा केंद्रबिंदू आहे.

या पूर्वीच्या मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियांमध्ये मतदारसंघांच्या रचनेत पक्षपात झाल्याचे आरोप झाले आहेत. लोकशाहीतील वैधता केवळ गंतव्य स्थानाबद्दल नाही, ती त्या गंतव्यापर्यंत पोहोचण्याच्या प्रक्रियेबद्दलही आहे. त्यामुळे मतदारसंघ पुनर्रचना आयोग हा खऱ्या अर्थाने स्वतंत्र, प्रत्येक टप्प्यावर सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असला पाहिजे. भारताला संघराज्यवादाची परंपरा आहे: आंतरराज्य परिषदेला संवैधानिक दर्जा दिला पाहिजे. राज्यांमधील समतोलावर मूलभूत परिणाम करणाऱ्या बाबींमध्ये केंद्राने संयम बाळगणे गरजेचे आहे. मतदारसंघांच्या पुनर्रचनेसारखा मुद्दा सहकार्य, चर्चा आणि सहमतीच्या भावनेने हाताळला पाहिजे.

मग पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा मुद्दा सोडून देण्यात नाही, कारण तसे केल्यास पन्नास वर्षांचा हा जुना प्रश्न तसाच झाकून ठेवल्यासारखे होईल. ही प्रक्रिया खरोखरच न्याय्य, संविधानिकदृष्ट्या भक्कम आणि संघराज्यदृष्ट्या वैध बनवणे हा त्यावरील मार्ग असू शकतो.

याबाबत काही पर्यायांचा गांभीर्याने विचार करावा लागेल. पहिला मार्ग, लोकसंख्येपलीकडे जाऊन प्रतिनिधित्व देणे. तज्ज्ञांच्या प्रस्तावांनुसार, लोकसंख्येची आकडेवारी, साक्षरता दर, आरोग्य निर्देशांक, लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी आणि सातत्यपूर्ण प्रजनन नियंत्रण यांसारख्या विकास निर्देशांकांशी प्रतिनिधित्व जोडणे शक्य आहे.

वित्त आयोगाने आधीच उत्पन्नातील अंतर, क्षेत्रफळ, पर्यावरणीय आच्छादन आणि लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी हे निकष वापरले आहेत. असाच एक मिश्र निर्देशांक लोकशाही आणि विकास या दोन्हींची सांगड घालू शकेल.दुसरा मार्ग, विस्तार प्रारूपाची निर्विकल्प अंमलबजावणी. लोकसभेच्या जागा ५० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव आहे. हा एक व्यावहारिक आणि राजकीयदृष्ट्या मध्यम मार्ग आहे.

तिसरा मार्ग, मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची संपूर्ण स्वायत्तता. आयोगाची रचना, निर्णय आणि प्रक्रिया सत्तेतील कोणत्याही पक्षाच्या हितापासून अलिप्त असणे आवश्यक आहे. केवळ कायदेशीर औपचारिकता म्हणून नाही, तर कृतीतून दिसणारी राजकीय वचनबद्धता म्हणून हे घडायला हवे.

चौथा आणि सर्वांत महत्त्वाचा मार्ग, अंतिम मतदारसंघ पुनर्रचनेचा आदेश जारी होण्यापूर्वी सर्व राज्यांना आणि सर्व प्रमुख पक्षांना समाविष्ट करणारा राष्ट्रीय संवाद अत्यावश्यक आहे. राजकीय क्षेत्रातील मतांची व्यापक सल्लामसलत आणि सहमतीतून ते घडायला हवे. दक्षिणेकडील राज्यांचे आर्थिक योगदान, लोकसंख्या नियंत्रण आणि न्याय्य प्रतिनिधित्वाची चिंता केंद्रस्थानी ठेवून सर्वपक्षीय विचारमंथन प्रक्रिया घडवणे ही घटनात्मक अनिवार्यता आहे.

भारतातील नागरिक, मग ते तिरुवनंतपुरमचे असोत वा लखनऊचे, बेंगळुरूमधील असोत वा पाटण्याचे, सगळ्यांना अपेक्षा आहे ती त्यांचे खरेखुरे प्रतिनिधित्व करणाऱ्या सभागृहाची, जिथे त्यांच्या मताला समान मूल्य असेल, त्यांच्या विकासकामगिरीच्या वाट्याला जिथे कौतुक येईल, शिक्षा नव्हे; आणि जिथे राजकीय सत्तेचे वितरण संविधानिक मूल्यांवर ठरवले जाईल, पक्षीय हिशोबाने नाही. योग्य मार्गाने केलेली मतदारसंघांची पुनर्रचना हे तिन्ही साध्य करू शकते, पण त्यात स्वार्थ आला की संघराज्यीय रचनेला धोका वाढू शकतो.

देशाने याआधी अनेक कठीण घटनात्मक कसोट्यांचे क्षण पार केले आहेत. राज्यघटनेने ती निर्णयक्षमता आपल्याला दिलेली आहे. या क्षणी तीच शहाणीव गरजेची आहे. विचारमंथन, सल्लामसलत आणि सहमतीमधून जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र नागरिककेंद्री आणि लोकशाहीवादी प्रकिया पार पाडू शकेल, यात शंका नाही.(साभार रविवार म.टा)

**डॉ. मनीष दाभाडे**

# महाविद्यालयीन वाढती विद्यार्थी अनुपस्थितीः निष्कर्ष व शिफारशी

भारतात गुरुकुल पद्धतीने सुरु झालेली शिक्षणाची पद्धत काळानुरूप बदलत गेली. परकीय आक्रमण, वैश्विकरणाच्या प्रवाहात मिसळून आजची शैक्षणिक पद्धती जन्माला आली आहे असे म्हणता येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे, अन्यायाविरुद्ध लढण्याचे आणि शोषित-वंचितांच्या सक्षमीकरणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. आज भारताच्या अतिदुर्गम भागापर्यंत शिक्षण व्यवस्था प्रवाहित झाली असून तिच्या या प्रवाहातून समाजातील सर्व स्तरावरचे घटक तृप्त होत आहेत. शासनाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, कौशल्याधीष्टीत शिक्षण पद्धती, भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास यातून शिक्षण व्यवस्था अधिक विकसित होतांना दिसत असली तरी महाविद्यालयात विद्यार्थ्यांची वाढती अनुपस्थिती चिंतेचा विषय बनली आहे. हजेरी पटावरील संख्या आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांची महाविद्यालयात उपस्थिती यात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते त्यामुळे याच्यावर तोडगा काढला नाही तर महाविद्यालये फक्त प्रवेश आणि परीक्षा पुरते मर्यादित राहतील. प्रामुख्याने महाराष्ट्रातील स्नातक आणि स्नातकोत्तर महाविद्यालयांची विद्यार्थी अनुपस्थितीबाबतची स्थिती भयावह असून अनुपस्थितीची कारणे, परिणाम व त्या संबंधींच्या उपाययोजना यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ या काळात अभाविपने मराठवाडा व खान्देश विभागात महाविद्यालयीन विद्यार्थी अनुपस्थिती सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात त्यांनी अनुपस्थिती संदर्भात विद्यार्थी, शिक्षक, पालक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षण तज्ञांचे मत घेऊन त्याची कारणे आणि शिफारशी संबंधात विस्तृत अहवाल तयार केला असून पुढील निष्कर्ष प्रामुख्याने शासनाने, महाविद्यालयांनी आणि सर्व विद्यापीठांनी अधोरेखित करणे आवश्यक आहेत व त्यावर पुढील उपाय योजना करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी अध्यापनाची गुणवत्ता, करिअर विकासाच्या संधी आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता यावर लक्ष केंद्रित केले असून विद्यमान अध्यापन पद्धती अधिक विद्यार्थी केंद्रित, कौशल्याभिमुख आणि तंत्रज्ञान आधारित असाव्यात असे विद्यार्थ्यांचे मत आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा, वेळेचे व्यवस्थापन, करियर नियोजन कार्यशाळेचे आयोजन, मेंटोरिंगची सुविधा, मानसशास्त्रीय समुपदेशन आणि मानसिक आरोग्य समर्थन केंद्र स्थापन करण्याचे शिफारशी विद्यार्थ्यांनी दिल्या या बरोबरच उपस्थिताला अंतर्गत गुण, सहभाग गुण किंवा इतर प्रोत्साहनांशी जोडणे, आर्थिक अडचण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फी सवलत, शिष्यवृत्ती उपलब्ध करून देणे व सांस्कृतिक, क्रीडा सारख्या सहशालेय उपक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी करणे या सारख्या उपाय-योजना देखील या अहवालातून सुचवल्या गेल्या.

प्राचार्यांचे मत आहे की, अनुपस्थिती ही फक्त वैयक्तिक किंवा शैक्षणिक किंवा समस्यांमधून उद्भवत नाही तर सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक, मानसिक व शैक्षणिक व्यवस्थेतील त्रुटींचा एकत्रित परिणाम आहे. महाविद्यालयातील पारंपारिक, एकसुरी आणि सिद्धांतप्रधान अध्यापन पद्धती विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील रुची कमी करतात, पायाभूत सुविधांची कमी गुणवत्ता, स्वच्छतेचा अभाव तसेच महाविद्यालयाच्या वातवरणाविषयी निर्माण होणारी उदासीनता यामुळे शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांध्ये नकारात्मक भावना निर्माण होते व याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर पडतो.अध्यापन मंडळ (बीओएस) सदस्यांचे मानणे आहे की विद्यापीठीय पातळीवरील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती परस्परावलंबी कारणांच्या एकत्रित परिणामातून उद्भवते. शैक्षणिक व्यवस्थेतील पद्धती, विद्यार्थ्यांची सामाजिक व आर्थिक वास्तवता, मानसिक आरोग्य तसेच व्यवसायिक दृष्टीकोणाशी घट्टपणे निगडीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

करिअर मार्गदर्शन, प्लेसमेंट सेलची सक्षमता आणि स्पर्धा परीक्षा तयारी साठीचे उपयुक्त उपक्रम नियमित स्वरुपात राबवल्यास रोजगारक्षमता वाढेल आणि महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सहभागही अधिक सक्रीय राहील, असा विद्यार्थ्यांचा विश्वास आहे. शिक्षकांनी अध्यापन करतांना विद्यार्थी केंद्रित आणि आधुनिक अध्यापन पद्धती वापरणे, प्राध्यापकांनी आयसिटी प्रशिक्षण, पेडॅगॉजी कार्यशाळा यामध्ये नियमित सहभाग घेणे, विद्यार्थ्यांशी सतत संवाद ठेवणे, शैक्षणिक फॉलो-अप करणे, प्रकल्प केस स्टडी, गटचर्चा, प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण वापरणे, विद्यार्थ्यांना वेळेवर फीडबॅक देणे आणि शैक्षणिक उद्दिष्टे स्पष्ट करण्यासंबंधीच्या शिफारशी अहवालातून प्राप्त झाल्या.विद्यापीठांनी प्रथम नावोन्मेषी व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची रचना करण्याची गरज विद्यार्थ्यांनी अधोरेखित केली असून विद्यमान अभ्यासक्रम उद्योग व जागतिक बदलांशी पूर्णपणे सुसंगत राहण्यासाठी त्याचे नियमित अद्ययावतीकरण झाले पाहिजे असे विद्यार्थ्यांचे मत आहे. विद्यापीठांनी पात्र, कौशल्यसंपन्न आणि अनुभवी शिक्षकांची भर्ती प्राधान्याने करावी असे देखील विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे.

अहवालातून पालकांसाठी देखील शिफारशी देण्यात आल्या असून नियमित पालक-शिक्षक सभा आयोजित करणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रगती आणि वर्तन याबाबत मासिक अहवाल पाठविणे, एसएमएस/व्हाट्स अप/इमेल द्वारे अनुपस्थितीची माहिती तत्काळ देणे, पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची, प्रवासाची आणि वेळापत्रकाची दखल घेणे, पालकांचा शैक्षणिक सहभाग वाढविण्यासाठी विशेष जागरुकता कार्यक्रम हाती घेणे या उपाय योजना केल्यास निश्चितच अनुपस्थितीला आळा बसेल असे वर्तविण्यात आले.

विद्यापीठांसाठी राज्यस्तरीय एकसंघ राज्यस्तरीय उपस्थिती धोरण तयार करणे, सर्व महाविद्यालयांकडून सेमिस्टरनिहाय उपस्थिती अहवाल घेणे, कमवा आणि शिका, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत योजना वाढविणे, विद्यापीठस्तरावर बस सेवा, वसतिगृह आणि डिजिटल सुविधा उभारणे अशा उपाय योजना केल्यास निश्चितच अनुपस्थिती कमी येईल असे सर्वेक्षणातून दिसून आले. शासनाने देखील ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी वाहतून, वसतिगृह, भोजन इत्यादी सुविधा मजबूत करणे, महाविद्यालयांच्या डिजिटल पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देणे, मानसिक आरोग्य व समुपदेशन सुविधा अनिवार्य करणे, उद्योग-शिक्षण समन्वय वाढवून कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे अहवालातून निदर्शनास आले.

शिक्षणाशी सगळे जोडले जावे व ज्ञानातून समाजाचा व राष्ट्राचा विकास करायचा असेल तर महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढणे आवश्यक आहे. ए-आय आणि तंत्रज्ञानाच्या युगात आभासी माध्यमातून शिक्षणाची कवाडे जरी उघडी असली तरी चारित्र्यसंपन्न युवा पिढीचा निर्माण करायचा असेल तर महविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठे, शासन, पालक आणि शिक्षकतज्ञांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे तरच येणाऱ्या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयांमध्ये फक्त हजेरीपटावर नाही तर प्रत्यक्षात विद्यार्थ्यांची संख्या वाढेल.

**डॉ.दुर्गेश साठवणे**
मो.८२०८०६८८५३
नागपूर

# गावोगाव पोचणारी आरोग्याची 'संवेदना'

अमरावती- बडनेरा जवळच्या टिमटाळा गावाचे नाव आपणा सर्वांनाच मा. एकनाथ जी रानडे यांचे जन्मस्थान म्हणून परिचित आहे. कन्याकुमारी येथील विवेकानंद शीला स्मारकाचे भव्यदिव्य स्वप्न त्यांनी पाहिले आणि ते प्रत्यक्षात आणून त्याला मूर्त स्वरूप दिले. त्याच टिमटाळा गावापासून सुरु झालेल्या सेवाकार्याला म्हणता म्हणता एक दशक पूर्ण होते आहे. ज्या जनकल्याण सेवा संस्थेच्या अंतर्गत डॉ .हेडगेवार हॉस्पिटल चालते, त्याच संस्थेने हॉस्पिटलसोबत संलग्न असणारे 'संवेदना आरोग्य प्रसार उपक्रम' या नावाने ग्रामीण भागात मूलभूत आरोग्यसेवा लोकांच्या दारी पोचवण्याचे कार्य २०१६ मध्ये सुरु केले. हा उपक्रम एकनाथजींच्या जयंतीला १९ नोव्हेंबरला आरोग्य तपासणी शिबीर घेण्यापासून सुरु झाला. हळूहळू आठवड्यातून एक दिवस ठराविक ओ.पी.डी गावातील शाळेत किंवा मंदिरात घेणे सुरु झाले. केवळ टिमटाळ्यापुरती सीमित न राहता ही ओ.पी.डी पुढे आजूबाजूच्या इतर तीन गावातील लोकांना सेवा देऊ लागली.

आज अमरावतीच्या आजूबाजूच्या नांदगाव खंडेश्वर ,मोर्शी ,भातकुली या तालुक्यांमधील अनेक गावांमध्ये उदा . पिंपळखुटा , ब्राह्मणवाडा ,खालकोणी आणि त्या गावांच्या आजूबाजूच्या ४३ लहान मोठ्या गावांमध्ये संवेदनाचे काम पोचले आहे. एकंदरीत २० ठिकाणी प्रत्येक आठवड्याला ओ.पी.डी होते.यामध्ये अमरावती शहरातील ४ सेवा वस्त्यांचाही समावेश आहे. एका गावापासून ४३ गावांपर्यंत पोचण्याच्या काळात काही महत्वाचे टप्पे आले. २०२० मध्ये खासदार निधीमधून टीमटाळा येथे मल्टी युटिलिटी सेंटर बनवले गेले. संवेदनाच्या या सेवा कार्यासाठी तेथे जागा उपलब्ध झाल्याने तेथे नियमित वैद्यकीय सेवा देणे शक्य झाले. या ठिकाणी दिवसभर मेडिकल ऑफिसर असतात व डे केयर सेंटर चालते. सामान्य आजारांसाठी उपचार, ड्रेसिंग, टाके घालणे इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. २०१९-२०२१ या काळात जनकल्याण सेवा संस्थेला दोन अँब्युलन्स देणगी स्वरूपात मिळाल्या. त्यामुळे टिमटाळ्या शिवाय अन्य गावांमध्ये काम करण्याची सोय झाली. इतर तालुक्यांमधील गावे व अमरावतीमधील सेवा वस्त्यांमध्ये काम सुरु झाले.

मागील वर्षभरामध्ये २०२५ - २६ मध्ये जवळ जवळ १०,००० रुग्णांनी या आरोग्य सेवेचा लाभ घेतला आहे.या वर्षभरात ओ.पी.डी शिवाय संवेदनाच्या अंतर्गत सर्वेक्षण हाती घेण्यात आले. यामध्ये तीन विषय समाविष्ट केले गेले. (१) (२)मधुमेह,उच्च रक्तदाबाचा आजार आणि (३)कीटक नाशकांमुळे उद्भवणारे विविध शारीरिक विकार.वर्षभरात एकंदरीत साडेसात हजारहुन अधिक लोकांचे सर्वेक्षण झाले. गावखेड्यातील स्त्रियांमधील मासिक पाळीतील रक्तस्त्राव किंवा पुरुषांनाही मूळव्याधीतून होणारा रक्तस्त्राव हे दुर्लक्षित आजार आहेत .त्यासाठी एक सर्वेक्षण करण्यात आले. ज्यामध्ये बारा वर्षावरील सर्व व्यक्तींना जाणवणाऱ्या विविध तक्रारींचा आढावा घेतला गेला, जसे की, थकवा जाणवणे,चक्कर येणे ,दम लागणे,भूक न लागणे,तोंड येणे, केस गळणे,नखे तुटणे ...अशा सर्वसाधारण वाटणाऱ्या लक्षणांची माहिती घेतली गेली. रक्त तपासणी व रक्तगट तपासणी केली गेली.( ८१ टक्के लोकांना आपला स्वतःचा रक्तगटही माहिती नव्हता !) हा कार्यक्रम जवळ जवळ एक वर्षभर राबवला गेला. उच्च रक्तदाब व मधुमेह हे सदतीस टक्के नागरिकांमध्ये आढळले तर ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांमध्ये जवळजवळ ५० इपुरुषांमध्ये उच्च रक्तदाबाचे प्रमाण दिसले .योग्य वेळी योग्य उपचार मिळत नसल्याने आकस्मिक मृत्यू,हार्ट अटॅक,लकवा इत्यादी आजारांचे प्रमाण अलिकडच्या काळात ग्रामीण भागातूनही वाढते आहे.रुग्णांना योग्य ती ट्रीटमेंट चालू करून त्यांच्या महत्वाच्या चाचण्या वेळोवेळी केल्या जात आहेत.तिसरा प्रश्न होता औषधी फवारण्यांच्या वापरामुळे शारीरिक स्वास्थ्यावर होणारे परिणाम. प्रामुख्याने शेतीमध्ये काम करणाऱ्या या लोकांचा पैकी ९६ इ लोक पिकांसाठी काही ना काही रासायनिक खते व औषधांचा वापर करतात .त्यातील ५७ इ लोक हे काम स्वतःच करत होते .ते करताना तंबाखू ,गुटखा,खर्रा ,पानमसाला ,बिडी ,सिगरेट, दारू याचे व्यसनही ते सोबत करतच होते असे लक्षात आले .त्यातील बहुतांश लोकांना हातापायात मुंग्या येणे,थरथरणे, डोळे -अंग जळजळणे, थकवा येणे या तक्रारी होत्या. तसेच काहींना त्वचारोग झालेला दिसत होता. २० टक्के लोकांना श्वसनाचा व उच्च रक्तदाबाचा ही त्रास होता. या शिवाय वर्षभरात वेगवेगळ्या तालुक्यांमधील जिल्हा परिषदेच्या ८ शाळांच्या विद्यार्थ्यांसोबत प्रथमच स्कुल हेल्थवर प्राथमिक काम देखील करण्यात आले.

या सर्व रुग्णांना त्यांच्या गावातच सेवा देण्यासाठी संवेदनाकडे सध्या तीन ॲम्बुलन्सेस आहेत, रुग्णांना दिवसभर ॲडमिट करण्यासाठी पाच बेड्सची सोय आहे.दंत वैद्यासाठी एक चेअर आहे.औषधी विभाग व एक ईसीजी मशीन अशी ही यंत्रणा आहे. काम करणाऱ्यांमध्ये वैद्यकीय सेवा देणारे पाच डॉक्टर्स,तीन नर्सेस ,सहा सोशल वर्कर्स ,ड्रायव्हर व मदतनीस, तसेच कार्यालयीन रेकॉर्ड ठेवण्यासाठी दोन जण असे एकूण मिळून अंदाजे २० व्यक्ती कार्यरत आहेत. यामध्ये विनामोबदला ठराविक वेळ देणारी डॉक्टर मंडळी समाविष्ट आहेत.

आगामी वर्षात चालू कामाला गती देणे,अधिक गावांपर्यंत सेवा नेणे व सामाजिक आरोग्यातील इतर काही समस्यांवर काम सुरु करणे असे संवेदनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी अनेक स्वयंसेवी व्यक्ती, वैद्यक तज्ञ, सोशल वर्कर आणि या सर्व साखळीचा समन्वय साधणारे अशी अनेकांची मदत आवश्यक असणार आहे.... तरच हा जगन्नाथाचा रथ ओढता येणे शक्य होणार आहे .

गेली अनेक वर्षे या कामाला अनेकांचा हातभार लागला आहे,पण सिंगापूरचे कर्णिक कुटुंबीय व भाग्य नगरच्या अंगिरस फाउंडेशनच्या डॉ. अंजली मोदी यांनी दाखवलेला विश्वास आणि सातत्यपूर्ण सहयोग उल्लेखनीय आहे. अमरावतीकर आणि इतरांनीही या जीवनोपयोगी कार्यास सक्रिय व सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन करावेसे वाटते.संवेदनाच्या या कामांमध्ये वैद्यक क्षेत्रातील उगवत्या पिढीने अधिकाधिक सहभागी व्हावे,समाजाप्रती असणाऱ्या त्यांच्या बांधिलकीची त्यांना जाणीव व्हावी,तसेच त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्वही अधिक विकसित व्हावे,यासाठी या विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांना डॉ. हेडगेवार हॉस्पिटलचे डॉ. बोधनकर,डॉ. गिरी यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. हे काम सातत्याने भविष्यकाळात चालू राहावे,अधिक व्यापक व्हावे व समाजातील गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचावायास हवे असे मनापासून वाटते.

**डॉ.मोहना कुलकर्णी**
सिनियर फिजिशियन व
समुपदेशक

# विदर्भस्तरीय जलतरण स्पर्धेचे उदघाटन उत्साहात संपन्न

## स्व.अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

**अमरावती :** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भस्तरीय जलतरण स्पर्धेचे उदघाटन रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता उत्साहपूर्ण व जल्लोषमय वातावरणात संपन्न झाले. स्पर्धेचे आयोजन स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र, अमरावती येथे करण्यात आले. उदघाटन


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले तसेच उदघाटक म्हणून वैशाली पाथरे(पाटील), सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ?डव्होकेट गजानन पुंडकर (उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), वैशाली इंगळे (क्रीडा अधिकारी, अमरावती) , राजाभाऊ सुंदरकर,सदस्य, स्व अनंत पंजाबराव देशमुख स्मृति केंद्र तसेच प्रा. डॉ. अशोक घोगरे (माजी सचिव, स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण






केंद्र) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उद् घाटन प्रसंगी सर्वप्रथम ?डवोकेट गजानन पुंडकर यांनी आपल्या मनोगतातून जलतरण या क्रीडा प्रकाराचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. नियमित सराव, शिस्त, चिकाटी आणि क्रीडाभाव या गुणांच्या जोरावर खेळाडूंनी प्रगती साधावी, असे मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या उदघाटक वैशाली पाथरे(पाटील), यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, जलतरण हा सर्वांगीण विकास घडवणारा महत्त्वाचा क्रीडा प्रकार असून विद्यार्थ्यांनी नियमित सराव, शिस्त व आत्मविश्वास यांच्या बळावर या क्षेत्रात प्रगती साधावी. अशा स्पर्धांमुळे खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळते



व भविष्यात मोठ्या स्तरावर पोहोचण्याचा मार्ग मोकळा होतो, असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, क्रीडा क्षेत्रात यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. जलतरणासारख्या खेळांमुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक ताकदही वाढते. संस्थेमार्फत खेळाडूंना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात असून भविष्यात अधिक दर्जेदार स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सदर स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने जलतरणपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध वयोगटांमध्ये आणि विविध प्रकारांमध्ये स्पर्धा पार पडणार असून स्पर्धेच्या निमित्ताने जलतरण क्षेत्रात नवीन प्रतिभेला वाव मिळणार आहे. याप्रसंगी वैशाली पाथरे, सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष अमरावती यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा अंतर्गत राज्यस्तरावर सर्वोत्कृष्ट कल्पना उपक्रम शासकीय संस्था या संकल्पनेसाठी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल, त्याचप्रमाणे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मंगेश व्यवहारे व नुकत्याच बँकॉक येथे भारताच्या स्विमिंग टीमचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक म्हणून प्रतिनिधित्व करणारे डॉ. योगेश निर्मळ यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजनाची माहिती श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्वर्गीय अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सचिव डॉ. सुभाष गावंडे यांनी दिली. त्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री शिवाजी हायस्कूल स्टेशन ब्रांच शाखा अमरावती चे मुख्याध्यापक तसेच स्वर्गीय अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सदस्य, संदीप इंगोले यांनी केले. सदर स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सचिव तथा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, जलतरण केंद्रावर कार्यरत प्रशिक्षक , कर्मचारी, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या स्पर्धेकरिता विद्यार्थी, क्रीडाप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये ओजस्विनी मोहोड तसेच समर प्रताप देशमुख या दोन स्पेशल चाइल्ड नी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन स्पर्धा संपूर्ण करून पदक प्राप्त केले. मान्यवरांनी या दोन्ही खेळाडूंचे विशेष कौतुक करीत त्यांचे अभिनंदन केले.

# ढाकणाच्या जंगलात भीषण वणवा

## -शेकडो हेक्टर जमीन विळख्यात

**धारणी-** चिखलदरा आणि घटांग ते सेमाडोह दरम्यानच्या घाटवळणातील जंगलात काही दिवसांपूर्वी लागलेली आग यावर्षीची सर्वात भयंकर मानली जात असताना आता गुगामलच्या ढाकणा परिक्षेत्राच्या जंगलात शुक्रवार, २५ एप्रिलला भीषण वणवा पेटून शेकडो झाडांची राखरांगोळी झाल्याने वन्य प्राण्यांवर संकट कोसळलेले आहे.

धारणीपासून २० कि. मी. अंतरावरील ढाकणा परिक्षेत्रामधील खारी, सिडूकुंड आणि डेगूपाटी व अढाव शिवारातील शेतांना लागून असलेल्या राखीव जंगलात २५ एप्रिलला सकाळपासून आग लागलेली होती. माहिती मिळताच आरएफओ चौधरी यांनी आग प्रतिबंधक पथकाला तत्काळ रवाना केले. ढाकणा हे मुख्यालयाचे गाव असल्याने सर्वच कर्मचारी हजर होते. परिणामी जंगलातील आग भीषण वणवा होण्यापूर्वीच आटोक्यात आणली होती, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. एका माहितीनुसार, गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी आगीचे प्रमाण कमी असले तरी धारणी-ढाकणा भागात सूर्यदेव साक्षात आग ओकत असल्याने जंगलात आग लागण्याचे प्रमाण वाढू शकते म्हणून हरिसाल, चौराकुंड, तारुबांदा तथा प्रादेशिकच्या धारणी व सुसर्दा परिक्षेत्राच्या जंगलाकडे सतत लक्ष देण्याची गरज आहे.



ढाकणा जवळच्या खारी व डेगूपाटीच्या जंगलात आग लागल्याने वन्यप्राण्यांची पण प्रचंड धावपळ झाल्याची गंभीर माहिती असून तापमान ४३ च्यावर गेल्याने वन्यजीव संकटात सापडल्याची गंभीर बाब मानली जात आहे. विशेष असे की, ढाकणाच्या जंगलात वाघ, बिबट, अस्वल, सांबर, हरिण यासह अतिदुर्लभ चांदी अस्वल, सर्प, गरुड व गिधाड सारखे अनेक वन्यजीव वास करत असतात. जंगलात लागलेल्या आगीमुळे पक्षी, तृणभक्षी प्राणी तथा अस्वलीला प्रचंड धोका असतो. याशिवाय जंगलातील तापमान वाढून वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक विचरणात बाध उत्पन्न होत असते. ढाकणा भागात आग लागण्याचे प्रमाण नेहमी जास्त राहत असल्याने फायर फाईटर पथकाला नेहमी सज्ज राहण्याची गरज आहे.

# श्री हव्याप्र मंडळ येथे सबज्युनियर बास्केटबॉल निवड चाचणी २८ एप्रिलला

**अमरावती/ प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनतर्फे दि.३ ते ८ मे २०२६ दरम्यान सातारा येथे ५१ वी सबज्युनियर मुले व मुली अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अमरावती जिल्हा संघ निवडण्यासाठी अमरावती जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनतर्फे निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी दि.२८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या बास्केटबॉल कोर्टवर होणार आहे. या निवड चाचण्या मंडळाच्या सचिव तथा अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्षा डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. या स्पर्धेसाठी ०१ जानेवारी २०१३ नंतर जन्म झालेल्या मुलं व मुलींना पात्रता असून, इच्छुक खेळाडूंनी निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभागी होताना खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच सर्व खेळाडूंनी दि.२८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या बास्केटबॉल कोर्टवर उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. माधुरीताई चेंडके यांनी केले आहे. यासोबतच अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव डॉ. मधुकर बुरनासे ९४२३६४९४१० व उपाध्यक्ष नितीन पोटे ९४०४३३८४९० यांनीही खेळाडूंना सहभागासाठी प्रोत्साहित केले आहे.



**५१ वी सबज्युनियर मुले व मुली अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेकरिता निवड चाचणी**

# उष्णतेची तीव्रता वाढली; नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी

## वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

**अमरावती/ प्रतिनिधी:** शहरात दैनंदिन तापमानात वाढ होत असून उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून दुपारच्या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असते. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर जाणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल तर डोके झाकण्यासाठी टोपी, कॅप, गॉगल किंवा ओढणीचा वापर करावा. तसेच हलक्या रंगाचे आणि सैल सूती कपडे परिधान केल्यास शरीरावर उष्णतेचा परिणाम कमी होण्यास मदत होते.

नागरिकांनी दिवसाभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास थकवा, चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे नियमित अंतराने पाणी पिणे, तसेच ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रव पदार्थ सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. मद्यपान, जास्त प्रमाणात चहा-कॉफी तसेच कार्बोनेटेड पेये यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.

उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी, बांधकाम कामगारांनी तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. दीर्घकाळ थेट उन्हात काम करणे टाळावे. कामाच्या दरम्यान डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. शक्य असल्यास सकाळी किंवा सायंकाळी काम करण्यास प्राधान्य द्यावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. अशा व्यक्तींना उष्णतेचा त्रास होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांना थेट उन्हात जाणे टाळावे. घरात थंड आणि हवेशीर वातावरण ठेवावे तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवण्यावर भर द्यावा.

उष्माघाताची काही लक्षणे दिसल्यास त्वरित सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, उलटी, जास्त घाम येणे, अशक्तपणा किंवा बेशुद्धी जाणवत असल्यास त्याला त्वरित सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. त्या व्यक्तीचे कपडे सैल करावेत आणि शरीरावर थंड पाणी टाकून शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याला पाणी, ओआरएस किंवा इतर द्रव पदार्थ द्यावेत.

परिस्थिती गंभीर वाटल्यास संबंधित व्यक्तीस तातडीने जवळच्या शासकीय किंवा खासगी आरोग्य केंद्रात दाखल करावे, जेणेकरून वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकतील. उष्णतेमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

शहरातील नागरिकांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

# शाळेत विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त वस्तूंचे वाटप व स्नेहभोजन



**अमरावती/ प्रतिनिधी:** स्थानिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगाच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच स्नेहभोजनाचा आनंदही देण्यात आला. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व शाळेच्या मुख्याध्यापिका मंजू वानखडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, शिस्त आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला सेल्फी पॉईंट आणि ग्रॅज्युएशन हॅट. चैताली टोबरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता दाखवत सुंदर सजावट केली, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्गशिक्षिका वैशाली महाजन मॅडम, श्रुतिका शिंगणे मॅडम, रहीम सर, प्रिती भोकरे मॅडम, खंडारे सर, वैशाली केणे, स्नेहा ठाकूर आणि गौरव परणकर यांनी मोलाचे योगदान दिले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व प्रेरणादायी ठरला.

# टाकरखेडा शंभू येथे फार्मर कप व खरीप पूर्व शेतकरी सभेचे आयोजन

**टाकरखेडा संभू -** भातकुली तालुक्यातील टाकरखेडा शंभू येथे ग्रामपंचायत कार्यालयात कृषी विभाग, पाणी फाउंडेशन तसेच उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेचे आयोजन सहाय्यक कृषी अधिकारी रुपाली ठाकरे यांनी केले.

सभेमध्ये पाणी फाउंडेशनचे जयकुमार सोनुले यांनी फार्मर कप स्पर्धेबाबत सविस्तर माहिती देत स्पर्धेचे स्वरूप स्पष्ट केले. महिला व पुरुष गटांनी गटशेतीच्या माध्यमातून कमी खर्चात अधिक उत्पादन घेऊन नफा कसा वाढवता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सहाय्यक कृषी अधिकारी रुपाली ठाकरे यांनी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेताची मशागत, बियाणे पेरणी याविषयी मार्गदर्शन केले. घरच्या साठवलेल्या बियाण्यांची उगवण



क्षमता कशी तपासावी, याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. सोयाबीन बियाण्यांची बीज प्रक्रिया, बीबीएफ पद्धतीने पेरणी, तसेच माती परीक्षणानुसार खत व्यवस्थापन याबाबत माहिती देण्यात आली.

जिजामाता कृषी भूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी पौर्णिमा सवई यांनी गावातील बचत गट व शेतकरी गटांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग घेण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रश्मी देशमुख होत्या. त्यांनी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी फार्मर कप स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपाली ठाकरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उमेदच्या श्रुती वानखेडे यांनी केले.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य, उमेदचे स्वप्निल रोहनकर, गजानन भुयार, श्रुती वानखेडे, पाणी फाउंडेशनचे जयकुमार सोनुले तसेच गावातील बचत गटातील महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन:

घरच्या सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता तपासूनच पेरणी करावी. तसेच येणाऱ्या खरीप हंगामात आयोजित करण्यात आलेल्या फार्मर कप स्पर्धेत शेतकऱ्यांनी गट तयार करून १५ मेपर्यंत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन भातकुली तालुक्यातील सर्व शेतकरी व बचत गटांना करण्यात आले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अनिस ने धीरेंद्र शास्त्री यांच्या दिव्यशक्तीला दिले आव्हान

## प्रा. श्याम मानव यांची पत्रकार परिषद

### बुवाबाजी विरोधात मोहीम

**अमरावती/ प्रतिनिधी:**

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यभरात बुवाबाजीच्या विरोधात मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहीम अंतर्गत समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव आज शनिवार २५ एप्रिल रोजी अमरावती दौऱ्यावर आले होते. यादरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना बागेश्वर धाम येथील धीरेंद्र कृष्णाजी महाराज यांच्या दिव्यशक्तीला आव्हान दिले. त्यांनी सांगितले की, धीरेंद्र शास्त्री महाराज यांच्याजवळ दिव्यशक्ती आणि चमत्कारी शक्ती असल्याचा दावा करत आहे. यामुळे ते दुसऱ्यांच्या मनात काय सुरू आहे हे ओळखून घेतात असे त्यांचे म्हणणे आहे. जर त्यांच्याजवळ दिव्यशक्ती आहे, तर त्यांनी आम्ही सांगितलेल्या दहा इसमांचे नाव



वडिलांचे नाव आणि मोबाईल नंबर सांगावे. या दहा लोकांचे नावे पहिलेच एका लिफाफामध्ये पंचांच्या समक्ष ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर धीरेंद्र शास्त्री महाराजांना त्यांचे नाव सांगायचे आहे तसेच आम्ही एका रूममध्ये दहा वस्तू ठेवू महाराजांना त्या रूममध्ये कोणत्या दहा वस्तू आहे हेही सांगायचे आहे. आमच्या आव्हानावर जर त्यांनी ९०३ माहिती खरी सांगितली तर आम्ही मानू की त्यांच्याजवळ खरंच दिव्यशक्ती आहे. ही प्रक्रिया पाच दिवसाच्या अंतरावर दोन वेळा करण्यात येणार आहे. यावर जर ते खरे उतरले तर त्यांना ८० लाखाचे पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही प्रा.श्याम मानव यांनी म्हटले. फ्रॉड अँड प्रूफ कंडिशन स्वरूपात हे आयोजन होणार आहे. आव्हान स्वीकारणारा व्यक्तीला स्टॅम्प पेपरवर हस्ताक्षर करून त्याच्यावर दिलेल्या अटि वाचल्यानंतर आव्हान स्वीकाराचे आहे. आव्हान स्वीकारणाऱ्याला आठ लाख रुपये अनामत रक्कम जमा करायची आहे. दोन्ही प्रक्रियांमध्ये विशेषता या समितीचा निर्णय अंतिम राहणार आहे. जर त्यांनी आव्हान नाही स्वीकारले तर त्यांचे चमत्कार आणि दिव्यशक्ती चे दावे खोकले ठरणार असल्याचेही ते म्हणाले. १९ मे पर्यंत राज्यभरात अंनिसची ही मोहीम सुरू राहणार आहे. विविध शहरां मध्ये जाऊन लोकांमध्ये प्रा. मानव जनजागृती करणार आहे.

# नाफेड खरेदीत गोंधळ; पोर्टल अचानक बंद

## -मोजणीसाठी आलेले शेतकरी परतले

**तिवसा-** तालुक्यात बारदाण्याच्या टंचाईमुळे तब्बल वीस दिवस ठप्प असलेली नाफेड अंतर्गत हरभरा खरेदी प्रक्रिया २० एप्रिलपासून पुन्हा सुरू झाली आणि शेतकऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला. मात्र ही आशा फार काळ टिकली नाही. खरेदीला सुरुवात होताच काही प्रमाणात मोजणी सुरू झाली असतानाच अचानक पोर्टल बंद झाल्याने पुन्हा संपूर्ण प्रक्रियेला ब्रेक लागल्याचे चित्र समोर आले आहे.

बारदाणा उपलब्ध झाल्यानंतर तिवसा नाफेड केंद्रावर मोठ्या प्रमाणात शेतकरी आपला हरभरा घेऊन दाखल झाले होते. ट्रॅक्टर व मालवाहू वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. अनेक दिवस प्रतीक्षेत असलेले शेतकरी आज तरी माल विक्री होईल या आशेने केंद्रावर आले होते. सुरुवातीला कालपर्यंत काही शेतकऱ्यांच्या मालाची मोजणीही पार पडली. अधिकृत माहितीनुसार, जवळपास १५०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी केवळ सुमारे १८५ शेतकऱ्यांची मोजणी पूर्ण झाली आहे. उर्वरित हजारो शेतकरी अजूनही प्रतीक्षेत आहेत. खरेदी प्रक्रिया सुरळीत होण्याच्या मार्गावर असतानाच २४ एप्रिल रोजी रात्री सुमारे १० वाजता नाफेड पोर्टल बंद करण्यात आल्याने दुसऱ्याच दिवशी केंद्रावर आलेल्या शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला.

पोर्टल बंद असल्यामुळे मोजणी प्रक्रिया थांबवण्यात आली आणि अनेक शेतकऱ्यांना आपला माल परत न्यावा लागला. यामुळे वाहतूक खर्च, मजुरी आणि वेळेचे मोठे नुकसान शेतकऱ्यांना सहन करावे लागले. बाजारात दर कमी असल्यामुळे हमीभावाच्या अपेक्षेने नाफेडकडे वळलेल्या शेतकऱ्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे.

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/८९/एमआरसी-८१/धामणगांव/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शुभम विनायक वैराळे**, रा.**धामणगांव**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **धामणगांव** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**धामणगांव** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **धामणगांव** येथे स्वतःचे जन्म दिनांक **२४.०३.१९९६** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# पत्नीचा खून करून फरार आरोपी मुर्तिजापुरात अटकेत

## » मध्य प्रदेशातील बैतूल येथील गुन्हा; पोलिसांच्या सतर्कतेमुळे संशयित जाळ्यात

• मुर्तिजापूर | प्रतिनिधी •

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा खून करून फरार झालेल्या मध्य प्रदेशातील आरोपीला मुर्तिजापूर शहर पोलिसांनी सतर्कता दाखवत अटक केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी एक संशयास्पद इसम शहर पोलीस ठाण्यात आला. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याची चौकशी केली. सुरुवातीला त्याने टाळाटाळ केली; मात्र नंतर त्याने दिलेल्या कबुलीजबाबामुळे पोलिसही स्तब्ध झाले.



आरोपीने दि. १९ एप्रिल रोजी मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील मीना डॅम परिसरात पत्नी बाली मुंगीया जावरकर हिचा दगडाने ठेचून खून केल्याची कबुली दिली. खून केल्यानंतर मृतदेह डॅमच्या पाण्यात फेकून तो फरार झाल्याचेही त्याने सांगितले. या माहितीची खातरजमा करण्यासाठी मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजित जाधव यांनी तत्काळ बैतूल बाजार पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. तेथील पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपीविरुद्ध अप. क्र. १२४/२६ अन्वये गुन्हा दाखल असून तो फरार असल्याची पुष्टी झाली.

यानंतर मुर्तिजापूर पोलिसांनी आरोपीची ओळख पटवून त्याला ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी बैतूल बाजार पोलिसांचे पथक मुर्तिजापूरकडे रवाना झाले असून, त्यांच्या ताब्यात आरोपीला सुपूर्द करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईत स. फौ. सुरेश पांडे, संतोष अंबिलवादे, इरफान नोडिदन, नामदेव आडे, पवन बोचरे, सुरेंद्र शेजव व शाम आठवे यांनी सहभाग घेतला.

# मातंग समाजासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन

• अकोला | प्रतिनिधी •

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) यांच्या वतीने मातंग समाज व तत्सम बारा पोट जातीतील वंचित घटकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार, दि. ५ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता सामाजिक न्याय भवन, निमवाडी, पोलीस वसाहत जवळ, अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश म्हणजे मांग व मातंग समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हा आहे.

कार्यशाळेत उपस्थितांना विविध योजना, लाभ घेण्याची प्रक्रिया आणि आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एम. टी. खडसे यांनी केले आहे.

# अकोल्यात हरभरा खरेदी पुन्हा सुरू होणार

## » आमदार रणधीर सावरकरांच्या पाठपुराव्याला यश
## » मुख्यमंत्र्यांनी घेतली तातडीची दखल, केंद्राकडे प्रस्ताव

• अकोला | प्रतिनिधी •

अकोला जिल्ह्यात हरभरा खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेला लक्षांक पूर्ण झाल्यामुळे बंद करण्यात आलेली खरेदी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश येण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत केंद्र सरकारकडे लक्षांक वाढविण्याचा प्रस्ताव पाठवला आहे.

जिल्ह्यात यंदा हरभऱ्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले असतानाही नाफेडकडून निश्चित करण्यात आलेला खरेदी लक्षांक कमी पडल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरात अजूनही मोठ्या प्रमाणात हरभरा साठून आहे. परिणामी शेतकरी अडचणीत सापडले असून खरेदी



प्रक्रिया बंद झाल्याने नाराजी वाढली होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री तसेच पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे तातडीने पाठपुरावा केला. त्यांनी राज्यातील व विशेषतः अकोला जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती देत हरभरा खरेदीचा लक्षांक वाढवण्याची मागणी केली होती.

या मागणीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी तातडीने संपर्क साधून चर्चा केली. राज्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन केंद्राकडून मिळाल्याची माहिती आमदार सावरकर यांनी दिली.

दरम्यान, नाफेडमार्फत अकोला जिल्ह्यासाठी वाढीव लक्षांक मंजूर करून खरेदी प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल, असे आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले आहे. यासोबतच आमदार सावरकर यांनी नाफेडच्या महाव्यवस्थापकांकडेही स्वतंत्रपणे पाठपुरावा करून खरेदी पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे नेतृत्व म्हणून आमदार रणधीर सावरकर यांच्या सक्रियतेची पुन्हा एकदा प्रचिती आल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.

# ज्येष्ठ समाजसेवी तनसुखभाई पारेख यांचे देहदान



• अकोला | प्रतिनिधी •

महानगरातील ज्येष्ठ समाजसेवी व जैन समाजातील दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ओळख असणारे स्थानिक अमृतवाणी परिसरातील रहिवासी तनसुखभाई हिम्मतलाल पारेख यांचे शुक्रवार दिनांक 24 एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते 84 वर्षाचे होते.त्यांना जयश्री पंचमीया,अवनी कोठारी,अमी मोदी या तीन मुली व अमरीश हा पुत्र आहे. त्यांनी आपल्या हयातीत मरणोत्तर नेत्रदान व देहदानाचा संकल्प केला होता. त्यांचा हा संकल्प त्यांचे पुत्र व बिल्डर अमरीश पारेख यांनी पूर्ण केला.त्यांनी या संदर्भात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला पाचारण करीत आपल्या वडिलांचे शासकीय वैद्यकीय विद्यालय येथे देहदान करीत महाविद्यालयास वडिलांचे पार्थिव सुपूर्द केले. सर्वप्रथम त्यांच्या घरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्रपेढीच्या वतीने नेत्र संकलन करण्यात आले. वैद्यकीय विश्वातील संशोधनासाठी आपला देह सत्कारणी लागावा या महान भावनेने त्यांनी देहदानाचा हा संकल्प घेतला होता. पारेख कुटुंबाच्या या निर्णयाचे समाजात सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

# भाजपची गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सत्ता
# तरीही उड्डाणपुलाला विलंब का ?

## » शासन दरबारी पाठपुरवठा करण्यात लोकप्रतिनिधी अपयशी

• अकोला | प्रतिनिधी •

गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता असताना न्यू तापडिया नगरातील रेल्वे उड्डाणपुलाचे काम तब्बल दशकभर रखडलेलेच आहे. सत्तेची सर्व सूत्रे हाती असूनही केवळ तांत्रिक परवानग्या मिळविणे आणि प्रभावी पाठपुरावा करण्यात भाजपचे लोकप्रतिनिधी पूर्णतः अपयशी ठरल्याची जोरदार टीका उद्धवसेनेचे तालुकाप्रमुख (अकोला पूर्व) ज्ञानेश्वर गावंडे यांनी केली आहे.

राज्यात २०१६ ते २०२६ या दहा वर्षांच्या कालावधीत केवळ दोन वर्षेच उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, तर उर्वरित आठ वर्षे भाजपची सत्ता असूनही उड्डाणपुलाचा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे "सत्ता असूनही काम नाही" अशी तीव्र भावना अकोलेकरांमध्ये निर्माण झाली आहे. न्यू तापडिया नगरातील उड्डाणपुलासाठी राज्य शासनाने मंजूर केलेल्या ५४ कोटी रुपयांच्या निधीवरून सध्या श्रेयवादाचे राजकारण रंगले आहे. मात्र, प्रत्यक्षात अपयश झाकण्यासाठीच भाजपकडून शहरात बॅनरबाजी करून सवंग



प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप गावंडे यांनी केला. "जनतेच्या रोजच्या हालअपेष्टांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून केवळ श्रेय घेण्याची स्पर्धा सुरू आहे," असा घणाघाती आरोपही त्यांनी केला.

### पुलाचे काम कधी पूर्ण होणार?

सन २०१६ मध्ये या उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली. मात्र आज दहा वर्षांनंतरही पुलाचे काम अर्धवट अवस्थेतच आहे. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना रोजच्या वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. पुढे हे काम नेमके कधी पूर्ण होणार, याबाबत सत्ताधाऱ्यांकडून ठोस आश्वासन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# अकोला महापालिका क्षेत्रात 'आपले सरकार सेवा केंद्र'साठी अर्ज मागविले

• अकोला | प्रतिनिधी •

जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील 'आपले सरकार सेवा केंद्र' चालविण्यासाठी एकूण 21 केंद्रांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत विविध प्रभागांमध्ये रिक्त असलेल्या केंद्रांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार, इच्छुक उमेदवारांनी दि. 27 एप्रिल ते 8 मे 2026 या कालावधीत अधिकृत संकेतस्थळ www.akola.gov.in वरून अर्ज डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत 8 मे 2026 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार असून, त्यानंतर मुलाखत प्रक्रिया 4 व 5 जून 2026 रोजी पार पडणार आहे. अंतिम निवड यादी 10 जून 2026 रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

या भरती प्रक्रियेसाठी उमेदवार किमान 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक असून, किमान 12 वी उत्तीर्ण, संगणकाचे ज्ञान (MSCIT/CCC) आणि मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे. तसेच, संबंधित प्रभागातील रहिवासी असणे आवश्यक आहे. याशिवाय, अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्रे आणि पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने नागरिकांना अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन केले आहे. इच्छुकांनी वेळेत अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# माहेश्वरी महिला संगठनाचे पदग्रहण उत्साहात संपन्न

• अकोला | प्रतिनिधी •

सामाजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संगठनाचे पदग्रहण समारोह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अकोट येथील सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटने अंतर्गत अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संगठनाच्या दहाव्या सत्राचे पदग्रहण झाले. २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी अध्यक्षपदावर शारदा नवनीत लखोटिया (अकोट) यांचा निवड झाली. सचिवपदी आरती पुरुषोत्तम पनपालिया, कोषाध्यक्षपदी रेखा प्रमोद चांडक यांची नियुक्ती झाली. याशिवाय उपाध्यक्ष प्रेमा मुंदडा, संगीता



हरकंठ, तारा सदानी, शोभा भट्टड, सहसचिव ममता मालानी, लीला मालपाणी, कृष्णा चांडक, कविता राठी, संघटना मंत्री विजयश्री जाजू, सहकोषाध्यक्ष सुनिता राठी, राजश्री सोमानी, प्रचार मंत्री पूनम मुंदडा इत्यादी कामकाज सांभाळणार आहेत. या पदग्रहण समारोहात मुख्य अतिथी म्हणून विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संगठनाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा श्रीमती नीलिमा मंत्री (यवतमाळ), विशेष अतिथी म्हणून संघटनेच्या माजी अध्यक्षा डॉ. तारा माहेश्वरी, ज्योती बाहेती उपस्थित होत्या. अकोट तहसील माहेश्वरी महिला संगठन, अकोट माहेश्वरी महिला मंडळाच्या आतिथ्यात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात शोभना तापडिया (तेल्हारा) व अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संगठनाकडून केलेल्या महेश वंदनाने झाली. अतिथींचे स्वागत कोमल लखोटिया, गौरी राठी, कोमल हरकंठ, कुम. अलका टावरी, अंकिता भंडारी यांच्या स्वागत नृत्याने झाले. मुख्य अतिथी नीलिमा मंत्री यांचे स्वागत मागील अध्यक्षा उषा बाहेती व नवनिर्वाचित अध्यक्षा शारदा लखोटिया यांनी तुळशीचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन केले. डॉ. तारा माहेश्वरी, ज्योती बाहेती, उषा बाहेती, कल्पना भुत्रड, निशा टावरी यांचे स्वागत शारदा लखोटिया, आरती पनपालिया, रेखा चांडक यांनी तुळशीचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन केला.

उमा राठी, संगीता हरकंठ, पूजा गांधी, सोनम लखोटिया यांनी सर्वांना तिलक लावून काकण दोरा बांधला. कृष्णा चांडक (अकोट), भारती राठी (अकोट), उज्वला पनपालिया, किरण भट्टड, प्रेरणा चांडक, माया भट्टड यांनी कार्यक्रमाचे कामकाज सांभाळले. गेल्यावर्षाचे कोष अहवाल प्रेमा मुंदडा यांनी सविस्तर मांडला. ही माहिती प्रचार मंत्री पूनम मुंदडा यांनी दिली.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

• अकोला | प्रतिनिधी •

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतु हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखितांचे ज्ञानभांडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् (Gyan Bharatam) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्विकारेल.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत:

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर श्रीमती. अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्ष, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

सदर सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत "Gyan Bharatam" हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

**CHANGE IN NAME**

I have changed
my name from
**HUSAIN ABID HUSAIN JOHAR**
(Old Name)
Passport No. N9992426
To
**HUSAIN ABID JOHAR**
(New Name)

Adress: Flat No 01, Balaji Appartment, Gangadhar plot, Akola, Maharashtra 444001.

# महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरूस्तीचे कामे सकाळच्या सत्रात

• अकोला | प्रतिनिधी •

उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले. महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे.

# लायन्स मिडटाऊन व इलाईटचा उपक्रम गौरवास्पद : प्रांतपाल बाजोरिया

• अकोला | प्रतिनिधी •

अपघात, गँगरीन अथवा अन्य कारणास्तव आपला पाय गमावणाऱ्या दिव्यांग रुग्णासाठी लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊन व लायन्स क्लब ऑफ इलाईटचा मोफत कुत्रिम पाय वितरण उपक्रम गौरवास्पद असून इतर सेवाभावी संस्थानी असा उपक्रम साकार करून समाजाची सेवा करण्याचे आवाहन लायन्सचे प्रांतपाल अश्विनकुमार बाजोरिया यांनी केले.लायन्स मिडटाऊन व इलाईटच्या वतीने स्थानीय दुर्गा चौक येथील इंद्रप्रस्थ सभागृहात मोफत जयपुर फूट वितरण शिबिर संपन्न झाले.यात बाजोरिया मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहराज्य मंत्री डॉ रणजीत पाटील, डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी सौ. वैशाली बाजोरिया,ज्येष्ठ विधीज्ञ बी. के.गांधी, माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, माजी प्रांतपाल वसंत खंडेलवाल, रमाकांत खेतान, प्रकल्प प्रमुख,ज्येष्ठ अस्थिरोग तज्ञ डॉ कैलाश मुरारका, लायन्स मिडटाऊन चे अध्यक्ष डॉ मनोज अग्रवाल, ईलाईटचे अध्यक्ष हरीश खेतान, झोन चेअरमन सुनील जेसवाणी, सौ शशी मुरारका, सहयोगी महेश संतांनी, निरंजन



भाला, संयोजक सुभाष चांडक आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात 50 रुग्णांची नोंदणी करण्यात आली होती.यावेळी मान्यवरांच्या हस्ते 25 गरजू रुग्णांना तज्ज्ञ व डॉ कैलास मुरारका यांच्या देखरेखित मोफत कृत्रिम पाय लावण्यात आले. उर्वरित 25 दिव्यांग रुग्णांना टप्प्याटप्प्याने हे कृत्रिम पाय लावण्यात येणार असल्याची माहिती यावेळी प्रकल्प प्रमुख डॉ कैलाश मुरारका यांनी देऊन पॉवर पॉईंट द्वारे कुत्रीम पायाची रुग्णांना यथोचित माहिती दिली.या कार्यक्रमात पन्नास वर्ष विधी विश्वाच्या सेवेबद्दल ज्येष्ठ विधीज्ञ बी.के.गांधी यांचा गौरव करण्यात आला.

तसेच सुभाष चांडक, प्रकाश आनंदानी, महेश मनवाणी, किशोर कापडे, दयाराम रोहडा, सुनील जेसवानी, सौ शशी मुरारका, अनिता मालविया, डॉ तारा माहेश्वरी, सचिन शर्मा, घनश्याम जोशी, कनुभाई सायानी, डॉ दीपक केळकर,डॉ वर्षा अग्रवाल, शोभा राठी, श्यामसुंदर साधवाणी, नरेश अग्रवाल,सुरेश बुंदेले,डॉ रतन लालवानी,डॉ हेमंत जोशी,राहुल सावजी, डॉ पूजा खेतान, रजनीकांत बावीशी आदी सेवाभावीचा सन्मान करण्यात आला. संचालन डॉ सुनंदा केळकर, रमेश बाहेती यांनी तर आभार अनिता मालवीया यांनी मानलेत.

कार्यक्रमाच्या सफलतेसाठी जसपाल नागरा, जगदीश राठी, श्यामसुंदर अग्रवाल,डॉ अचीन मुरारका,हर्षित मुरारका यांनी परिश्रम घेतले. यावेळी बहुसंख्य दिव्यांग रुग्ण, नागरिक व दोन्ही क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १४३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# वाघ गायब वनविभाग 'गायब'

## बोर व्याघ्र प्रकल्पात अराजकतेचा कळस, अवैध वृक्षतोड, बेकायदेशीर रस्ते आणि बेपत्ता वाघ; खा.काळे संतप्त, चौकशीची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

राज्यातील अभिमानाचा मानला जाणारा बोर व्याघ्र प्रकल्प आज अक्षरशः बेजबाबदार कारभाराचा बळी ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. 'युवराज', 'बाजीराव' आणि 'शिवाजी' हे वाघ बेपत्ता असल्याची माहिती समोर आली असून वनविभाग मात्र या प्रकरणात पूर्णपणे अनभिज्ञ असल्याचा आरोप होत आहे. 'वाघ नाहीत, पण कागदावर सगळं सुरळीत! असा संतापजनक सूर आता नागरिकांमध्ये उमटत आहे.

सेलू, आर्वी, कारंजा आणि हिंगणा तालुक्यात पसरलेल्या या व्याघ्र प्रकल्पात वाघांसह विविध वन्यजीवांचे वास्तव्य आहे. मात्र, इतक्या मोठ्या क्षेत्रात तीन वाघांचा ठावठिकाणा नसणे ही अत्यंत गंभीर बाब असताना वनविभागाकडून कोणतीही ठोस माहिती दिली जात नाही. वाघ बेपत्ता आणि अधिकारी बेशुद्ध, अशी परिस्थिती निर्माण झाल्याची टीका होत आहे.दरम्यान, या प्रकाराची माहिती मिळताच खा. अमर काळे यांनी आक्रमक



भूमिका घेत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांना थेट पत्र पाठवले. या पत्रात बोर व्याघ्र प्रकल्पातील संपूर्ण कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.याच वेळी प्रकल्प परिसरात सुरू असलेली अवैध वृक्षतोड आणि परवानगीशिवाय रस्ते बांधकाम याकडेही लक्ष वेधले गेले आहे. संबंधित कामे कोणाच्या परवानगीने सुरू आहेत, याचे उत्तर वनविभागाकडे नसल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी एम.एस.आय.डी.सी.च्या कंत्राटदारांकडून बिनधास्तपणे आरसीसी रस्ते टाकले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.

वन्यजीव संरक्षणासाठी असलेल्या प्रकल्पातच जर अशी अराजकता असेल, तर वनसंपदा सुरक्षित कशी राहणार, हा प्रश्न आता जनतेसमोर उभा ठाकला आहे.

वनविभाग झोपेत आणि जंगल लुटले जात आहे, अशी प्रतिक्रिया उमटत आहे.

खा.अमर काळे यांच्या हस्तक्षेपामुळे वनविभागात खळबळ उडाली असली, तरी केवळ कागदी चौकशी करून हा प्रकार दडपला जाणार का, अशी शंका व्यक्त होत आहे. बेपत्ता वाघांचा शोध लागणार की हे प्रकरणही फाइलमध्ये गाडले जाणार या प्रश्नाचे उत्तर आता संपूर्ण जिल्हा शोधत आहे.

# नृत्योत्सवात रंगली संस्कृतीची मेजवानी

### तरुणाईने शास्त्रीय नृत्याकडे वळावे - संदीप चिचाटे

**वर्धा/ जनमाध्यम**

कला, संस्कृती आणि आधुनिकतेचा सुरेख संगम अनुभवायला मिळालेल्या तीन दिवसीय नृत्योत्सवाचा समारोप विविध राज्यांतील समूह नृत्यांच्या सादरीकरणाने उत्साहात झाला. तरुण पिढीने शास्त्रीय नृत्याकडे दुर्लक्ष न करता त्याला जीवनशैलीचा भाग बनवून सांस्कृतिक वारसा जपावा,असे आवाहन वर्धा कला महोत्सवाचे अध्यक्ष संदीप चिचाटे यांनी केले.

सचिन डान्स अकॅडमी आणि लायन्स क्लब गांधी सिटी, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने अग्निहोत्री कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या सभागृहात या नृत्योत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. समारोप प्रसंगी जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पंडित शंकर प्रसाद अग्निहोत्री, ज्येष्ठ समाजसेवक मोहन बाबू अग्रवाल, तुकाराम



गोडे महाराज, अनुप जैस्वाल, प्राचार्य डॉ. गजानन जंगमवार, उषा फाले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रमात आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात व मध्यप्रदेश येथील कलाकारांनी सादर केलेल्या समूह नृत्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. भरतनाट्यम, कुचीपुडी, कथ्थक, सेमी-क्लासिकल आणि लोकनृत्य अशा विविध प्रकारांनी रंगलेला हा सोहळा प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरला.

कार्यक्रमाच्या शेवटी बक्षीस वितरण सोहळा पार पडला. विविध राज्यांतून आलेल्या गुरूंना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# राष्ट्रपती गेल्या पण 'ब्रेकर' गायबच

**वर्धा/ जनमाध्यम**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सेवाग्राम दौऱ्यापूर्वी 'व्हीआयपी हालचाली' सुरळीत व्हाव्यात म्हणून राष्ट्रीय महामार्गावरील ब्रेकर हटवण्यात आले. मात्र दौरा संपून तब्बल दहा दिवस उलटून गेले तरी हे ब्रेकर पुन्हा बसवण्याची तसदी प्रशासनाने घेतलेली नाही. त्यामुळे आता वर्ध्यातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संतापाचा ज्वालामुखी धुमसत आहे.

दत्तपूरकडून सेवाग्रामकडे जाणारा हा मार्ग सध्या 'स्पीड ट्रॅक' बनला आहे.

वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष म्हणजे या मार्गालगत शाळा असून दररोज शाळेचे वाहन तसेच लहान मुले रस्ता ओलांडतात. अशा ठिकाणी ब्रेकर असणे हा केवळ नियम नाही तर अत्यावश्यक सुरक्षेचा उपाय आहे. मात्र प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे.दरम्यान, या मार्गावर जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांचे वास्तव्य असल्याने त्यांच्या



### प्रशासनाचा बेफिकीर कारभार उघड

वाहनांना या ब्रेकर पासून अडथळा येऊ नये म्हणूनच ब्रेकर पुन्हा बसवले जात नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये जोर धरू लागली आहे.

ही चर्चा प्रशासनासाठी अधिकच लाजिरवाणी ठरत आहे.एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला शहाणपण येणार का असा प्रश्न पालकवर्ग आणि नागरिक उपस्थित करत आहेत.

दररोज जीव मुठीत धरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना प्रशासनाकडून कोणतीही ठोस कृती दिसत नसल्याने असंतोष तीव्र झाला आहे.पालकांनी आता स्पष्ट इशारा दिला आहे, तात्काळ ब्रेकर बसवले नाहीत, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल.

वर्ध्यात प्रशासन 'व्हीआयपी संस्कृती'त गुंतून सामान्यांच्या जीवाशी खेळत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार हा प्रश्न प्रत्येक वर्धेकराच्या मनात धगधगत आहे.

## संक्षिप्त

### जंगलापूर शिवारातून १६ लाखांचे साहित्य चोरीला

**सेलू -** तालुक्यातील जंगलापूर शिवारात सुरू असलेल्या खासगी कंपनीच्या गोदाम बांधकामस्थळावरून तब्बल १६ लाख ६ हजार १८२ रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य साठवून ठेवण्यात आले होते. अज्ञात चोरट्यांनी संधी साधून हे साहित्य लंपास केले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चोरी गेलेल्या साहित्यामध्ये विविध बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तूंचा समावेश असल्याचे सांगितले जाते. तक्रारीवरून संशयित कृष्णासिंग चव्हाण (रा. नागपूर) याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू असून, चोरी गेलेले साहित्य आणि आरोपीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**वर्धा -** पिपरी (मेघे) येथील वैद्य लेआऊट परिसरात एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मनीष मधुकरराव लेंडे (वय ५२) असे मृताचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक तपासात आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. स्थानिक नागरिकांनीही या घटनेबाबत हळहळ व्यक्त केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, अहवालानंतर पुढील बाबी स्पष्ट होणार आहेत. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून, कुटुंबीयांकडूनही माहिती घेण्यात येत आहे.

### महिलेच्या पर्समधून रोकड लंपास

**आर्वी -** येथील नेहरू मार्केटमध्ये खरेदी करत असलेल्या महिलेच्या पर्समधील रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. नंदा रमेश चाफले (रा. सावंगी (पोळ)) या खरेदीसाठी आर्वी येथे आल्या होत्या. गर्दीचा फायदा घेत तीन ते चार महिलांनी त्यांच्या पर्समधील ६ हजार ८०० रुपये चोरले. काही वेळाने पर्स फाटलेली दिसून आल्याने हा प्रकार उघडकीस आला. या घटनेमुळे बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीवरून आर्वी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, संशयित महिलांचा शोध सुरू आहे.

### केवायसीच्या नावाखाली लाखांची ऑनलाइन फसवणूक

**वर्धा -** केवायसी अपडेटच्या नावाखाली ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार वाढत असून, स्वागत कॉलनी परिसरात एका व्यक्तीची २ लाख ३९ हजार ७२९ रुपयांनी फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. चेतन डेहनकर यांच्या कुटुंबीयांच्या मोबाईलवर व्हॉट्सअॅपद्वारे केवायसी फॉर्मची फाइल पाठविण्यात आली होती. ती बँकेकडून आली असल्याचा समज करून संबंधितांनी फाइल डाउनलोड करून माहिती भरली. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने रक्कम वजा झाल्याचे संदेश प्राप्त झाले. या घटनेमुळे नागरिकांनी अशा संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. याप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### जंगलापूर शिवारातून लाखांचे साहित्य चोरीला

**सेलू -** तालुक्यातील जंगलापूर शिवारात सुरू असलेल्या खासगी कंपनीच्या गोदाम बांधकामस्थळावरून तब्बल १६ लाख ६ हजार १८२ रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य साठवून ठेवण्यात आले होते. अज्ञात चोरट्यांनी संधी साधून हे साहित्य लंपास केले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चोरी गेलेल्या साहित्यामध्ये विविध बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तूंचा समावेश असल्याचे सांगितले जाते. तक्रारीवरून संशयित कृष्णासिंग चव्हाण (रा. नागपूर) याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू असून, चोरी गेलेले साहित्य आणि आरोपीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**वर्धा -** पिपरी (मेघे) येथील वैद्य लेआऊट परिसरात एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मनीष मधुकरराव लेंडे (वय ५२) असे मृताचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक तपासात आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. स्थानिक नागरिकांनीही या घटनेबाबत हळहळ व्यक्त केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, अहवालानंतर पुढील बाबी स्पष्ट होणार आहेत. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून, कुटुंबीयांकडूनही माहिती घेण्यात येत आहे.

# चना चोरीचा थरार! शेतकऱ्याला ५२ हजारांचा फटका

**तळेगाव(ता. आर्वी) -** जळगाव शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत शेतकऱ्याचे मोठे नुकसान केले. दि. २४ ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान ही घटना घडली. शेतातील खोलीचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल ४० कट्टे चना (सुमारे २० क्विंटल) लंपास केला. चोरी झालेल्या मालाची किंमत अंदाजे ५२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

शेतमजूर सकाळी कामासाठी



गेल्यावर हा प्रकार उघडकीस आला. घटनास्थळी चना विखुरलेला तसेच चारचाकी वाहनाचे टायर मार्क आढळून आले.

यावरून नियोजनपूर्वक चोरी केल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.प्रकरणी तळेगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून फिंगरप्रिंट व श्वान पथकाने पाहणी केली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# घरात घुसून महिलेला चाकूने भोसकले

**समुद्रपूर -** घराचे दार तोडून आत घुसत महिलेवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना दि. २५ एप्रिल २०२६ पहाटे नारायणपूर (झोटिंग) येथे घडली. आरोपी राकेश आत्राम (३१) याने भाग्यश्री भगत (२९) यांच्यावर चाकूने वार करत गंभीर जखमी केले.पहाटेच्या सुमारास आरोपीने प्रथम घरासमोर येऊन वाद घातला. काही वेळानंतर तो परत येत दार लाथा मारून तोडून आत शिरला. त्याने महिलेला बाहेर ओढत तिच्या गळ्यावर चाकूने वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत ती कोसळली. गावकऱ्यांनी प्रसंगावधान राखत आरोपीला पकडले. जखमी महिलेला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

समुद्रपूर पोलिसांनी आरोपीला अटक करून पुढील तपास सुरू केला आहे.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

**पुलगाव -** समृद्धी महामार्गावर उभ्या वाहनाला धडक बसून भीषण अपघात झाल्याची घटना दि. २५ एप्रिल २०२६ सकाळी घडली.

या अपघातात चालक राहुल यादव (रा. उत्तर प्रदेश) याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य प्रवासी जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप रस्त्यावर उभी होती. त्यामागून आलेल्या कारने जोरदार धडक दिली.

अपघात इतका भीषण होता की कारचालकाचा जागीच मृत्यू झाला. तसेच कारमधील एका महिलेला गंभीर दुखापत झाली असून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या प्रकरणी पुलगाव पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाचा शोध सुरू आहे.

# समाजासाठी झटणारा लढवय्या हरपला

### अभय कुंभारे काळाच्या पडद्याआड

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील बोरगाव (मेघे) परिसर आज शोकसागरात बुडाला. गणेश नगरचे रहिवासी, आगरगाव येथील यशवंत विद्यालयाचे कर्तव्यदक्ष शिक्षक आणि समता सैनिक दलाचे जिल्हा संघटक मार्शल अभय कुंभारे यांचे रविवारी सकाळी ११:५५ वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ एक शिक्षक नव्हे, तर समाजासाठी झटणारा एक लढवय्या आवाज कायमचा थांबला आहे.



गेल्या काही वर्षांपासून किडनीच्या आजाराशी झुंज देत असतानाही अभय कुंभारे यांनी कधीही समाजकार्याचा ध्यास सोडला नाही. अन्यायाविरोधात उभे राहणे, वंचितांना आधार देणे आणि युवकांना संघटित करून सामाजिक परिवर्तनाची मशाल पेटवणे हीच त्यांची ओळख होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण जिद्द आणि जनतेसाठी तळमळ होती.समता सैनिक दलाच्या माध्यमातून त्यांनी जिल्हाभरात संघटन मजबूत केले. अनेक सामाजिक प्रश्नांवर त्यांनी आवाज उठवला, तर विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी शिक्षक म्हणूनही त्यांनी प्रामाणिक योगदान दिले.

त्यांच्या अकाली जाण्याने कुटुंबीय, नातेवाईक आणि संपूर्ण समाजावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे, त्यांनी एका वृत्तपत्राचे पत्रकार म्हणून काम केले, त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# समृद्धी महामार्गावर उभ्या ट्रकला धडक

### एक ठार, एक गंभीर

**वर्धा/ जनमाध्यम**

समृद्धी महामार्गावर पिंपळगाव शिवारात उभ्या असलेल्या ट्रकला मालवाहू वाहनाने दिलेल्या धडकेत एक जण ठार, तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सहादेव सूर्यभान चौरे (मृत) असे मृतकाचे नाव असून, हनुमंत बाळासाहेब पाळवदे (रा. सासुरा, जि. बीड) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ४४ यू २७६० क्रमांकाचे मालवाहू वाहन द्राक्षांचा माल घेऊन नागपूरकडे जात होते. दरम्यान, पिंपळगाव परिसरात एमएच १७ बीवाय ०००४ क्रमांकाचा ट्रक रस्त्याच्या कडेला उभा होता. अंधार किंवा वेगामुळे चालकाला ट्रकचा अंदाज न आल्याने मालवाहू वाहनाने त्याला जोरदार धडक दिली.या अपघातात सहादेव चौरे यांचा जागीच मृत्यू झाला, तर हनुमंत पाळवदे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.या प्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. महामार्गावर वाहन उभे करताना योग्य खबरदारी न घेतल्यास अशा दुर्घटना घडत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# एनएमएमएस परीक्षेत गांधी विद्यालयाचे यश

### तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**आर्वी / जनमाध्यम**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या एनएमएमएस परीक्षेत पीएम नगरपरिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक गांधी विद्यालय, आर्वी येथील तीन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेत गौरव निवृत्ती मानकर याने एसबीसी गटातून जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवत शिष्यवृत्ती मिळवली.

तसेच पूनम मंगेश केवट हिने सर्वसाधारण गटातून जिल्ह्यात २८ वा क्रमांक मिळवला, तर ऋषी प्रवीण आधव याने एससी गटातून १५ वा क्रमांक पटकावला.

या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरवर्षी १२ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. चार वर्षांत ही रक्कम ४८ हजार रुपयांपर्यंत जाते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाचा नावलौकिक वाढला आहे.या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले असून, विशेष शिक्षक श्री बालाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे नगर परिषद पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १५०

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### शिक्षणाधिकाऱ्यांचा कास्ट्राईब शिक्षक संघटनेकडून सत्कार

**अंजनगाव बारी**-जिल्हा परिषदेत नुकतेच रुजू झालेल्या शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांचा कास्ट्राईब शिक्षक संघटनेतर्फे शाल-पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या शिष्टमंडळाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष व शिक्षक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष राजेश गाडे यांनी केले. यावेळी राज्य संघटक आयु. दादाराव भोंगळे, जय कृष्ण खडसे, जिल्हा सचिव आयु. प्रमोद कडू, संजय बोबडे, डॉ. पंडित भोयर, एस.आर. नवरे, राजकुमार वर्धे, सुरज सोनटक्के, आयु. गौतम जनबंधू, भिमसेन देवरे, आयु. मंगेश ठाकरे व अरुण रायबोले उपस्थित होते.शिक्षणाधिकारी मा. सरोदे साहेबांनी शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले असून पदोन्नती, निवड-श्रेणी, वेतनश्रेणी, सेवा पुस्तके, वैद्यकीय बिल आदी प्रलंबित मुद्द्यांवर लवकर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### प्रशांत कांबळे यांच्या घराला आग

**शिरजगाव मोझरी** -येथील परिसरातील विजेच्या दाबात (व्होल्टेज) वारंवार होणाऱ्या चढ-उतारामुळे शुक्रवारी रात्री मुख्य बाजार चौकातील पोलवरून आगीचे गोळे पडून ग्रामपंचायत मधील केबल जळाला व याच हाय होल्टेजने शिरजगावातील एका घराला भीषण आग लागली. या आगीत सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या घरातील साहित्य जळून खाक झाले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. गेल्या काही महिन्यांपासून गावात कमी-अधिक दाबाने वीजपुरवठा होत आहे. शुक्रवारी रात्री अचानक व्होल्टेज वाढल्याने गावातील स्ट्रीटलाईटमधून आगीचे गोळे पडू लागले. याच दरम्यान घराच्या पोर्चमधील बल्बचा स्फोट होऊन कुलरने पेट घेतला. आगीच्या ठिणग्या घरात पसरल्याने काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि हॉलमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच शिरजगावचे तलाठी माळोदे आणि शेंदोळा येथील महावितरणचे कर्मचारी सोळंके यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. तिवसा येथील नायब तहसीलदार अमोल देशमुख यांनीही फोनद्वारे घटनेची माहिती घेऊन विचारपूस केली.

### भगवान गौतम बुद्ध महोत्सवाचे आयोजन

**अमरावती**-तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती शहरात बुद्ध जयंती उत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य 'बुद्ध महोत्सव' आणि 'विश्वशांती रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. २६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या पाच दिवसीय महोत्सवात वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे. बुद्ध जयंती महोत्सवाचे आयोजन २६ एप्रिल ते १ मे २०२६ दरम्यान करण्यात आले आहे. १ मे रोजी सायंकाळी ७ वाजता शहराच्या प्रमुख मार्गावरून 'विश्वशांती रॅली' काढण्यात येणार आहे. या रॅलीत नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक सुनील रामटेके यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील ४६ गावांमध्ये पाणी पेटले

## चिखलदरा तालुक्यातील आठ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

**अमरावती/का.प्र.**
उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद होत चालले आहे. जिल्ह्यातील तब्बल ४६ गावांमध्ये सध्या भीषण पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली असून प्रशासनाला तेथे आपत्कालीन उपाययोजना राबवाव्या लागत आहेत. याशिवाय चिखलदऱ्यातील आठ गावांमध्ये १९ टँकरने पाणीपुरवठा केल्या जात आहे.

जिल्ह्यातील ४६ गावांमध्ये पाणीटंचाई निवारणार्थ २३ बोअरवेल व ३० खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तरीही अनेक ठिकाणी परिस्थिती नियंत्रणात येत नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठ्यांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत आहे. विशेषतः चिखलदरा तालुक्यातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. येथील आठ गावांमध्ये पाणीटंचाई तीव्र असून मोथा, खडीमल, गौरखेडा बाजार, बऱ्हाणपूर, आकी, मेहरियम, आलाडोह आणि लवाद या गावांमध्ये सुमारे ५,६२० लोकसंख्येला असून



या नागरिकांची तहाण भागविण्याकरिता प्रशसनाकडून तातडीच्या उपाय योजना म्हणून १९ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू असली तरी केवळ ६५ ते ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित सुमारे ३० टक्के काम रखडल्यामुळेच ही टंचाई अधिक तीव्र झाल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही परिस्थिती चिंताजनक आहे. अमरावती तालुक्यात ४, तिवसा २, भातकुली १, चांदूर रेल्वे ५, नांदगाव खंडेश्वर ७, अचलपूर ३, मोर्शी ६, वरुड ३, अंजनगाव सुर्जी १ आणि चिखलदरा तालुक्यात १४ गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट कायम आहे. दिलासादायक बाब म्हणजे धारणी, दर्यापूर, चांदूरबाजार आणि धामणगाव रेल्वे या तालुक्यांमध्ये सध्या पाणीटंचाईची नोंद झालेली नाही. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे जलजीवन मिशनची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत असून, प्रशासनानेही दीर्घकालीन उपाययोजनांकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, येथे पालक मेळावा

**अमरावती/का.प्र.**
पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन ग्रुपद्वारे संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथे नुकताच पालक मेळावा झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाविद्यालय व पालक यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्यात पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पालकांनीही आपल्या सूचना व अभिप्राय मांडत महाविद्यालयाशी सकारात्मक संवाद साधला.या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दिप्ती बी. रुईकर मॅडम, उपप्राचार्य प्रा. प्रशांत जे. बुरंगे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले.या पालक मेळाव्याचे नियोजन प्रा. डॉ. प्रसाद देशमुख व प्रा. दिप्ती बोंडे यांनी केले.हा पालक मेळावा सर्वांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरला असून, भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याचा निर्धार करण्यात आला.

### 'नारी से नारायणी' परिसंवादातून विकसित भारत २०४७ मध्ये महिलांच्या भूमिकेवर भर



**अमरावती/का.प्र.**
राष्ट्र सेविका समिती विदर्भ प्रांत आणि श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'नारी से नारायणी - विकसित भारत २०४७: महिलांची भूमिका व योगदान' या विषयावर एक दिवसीय प्रांतीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

परिसंवादाच्या उद्घाटन सत्रात आशुतोष अडोणी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रशेखर भोंदू होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माधुरीताई चेंडके उपस्थित होत्या.अध्यक्षीय भाषणात चंद्रशेखर भोंदू यांनी श्रीमती नरसम्मा यांच्या नावाने ही संस्था का सुरू करण्यात आली, याची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

तसेच या परिसंवादातून काय साध्य करायचे आहे, याची जाणीव उपस्थित सेविकांनी ठेवावी, असे त्यांनी सांगितले. कुटुंब परिवर्तनाच्या काळात उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर महिलांकडे असावे, यासाठी त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन केले.'वर्तमान काळातील भारताची सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थिती' या विषयावर बोलताना आशुतोष अडोणी (अखिल भारतीय मंत्री, संस्कार भारती) यांनी भारताच्या राष्ट्रचेतनेचा प्रदीर्घ इतिहास मांडला. त्यांनी सांगितले की, १८३५ पासून परकीय शक्तींनी योजनाबद्ध पद्धतीने भारताच्या मूळ विचारांना कमजोर करण्याचा प्रयत्न केला. मेकॉले यांच्या शिक्षणपद्धतीमुळे भारतीयांनी स्वतःची ओळख विसरावी, असा प्रयत्न झाला. १८३५ ते १९४७ या कालखंडात राष्ट्रीय मूल्यांना धक्का बसला. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी बहुआयामी विचारांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले

या प्रसंगी 'नारी से नारायणी' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.प्रमुख पाहुण्या माधुरी चेंडके यांनी आपल्या भाषणात 'नारायणी हा केवळ शब्द नसून ती एक जबाबदारी आहे' असे सांगितले.

### इस्कॉन येथे श्री नृसिंह चतुर्दशी महामहोत्सवाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**
श्री रुख्मिणी महाराणी यांचे एकमेव विग्रह असणारे अमरावती येथील मंदिर राठी नगर स्थित सरस्वती कॉलनी येथे श्री रुक्मिणी द्वारकाधीश आध्यात्मिक संस्कार केंद्राद्वारे विविध कार्यक्रमांचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते.इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, इस्कॉन पदयात्रा मिनिस्टर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवन गौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात कीर्तन सम्राट, त्रीदंड संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने २८ एप्रिल रोजी श्री रुक्मिणी द्वादशी महामहोत्सव आणि ३० एप्रिल रोजी श्री नृसिंह चतुर्दशी महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रथम महोत्सवाची सुरुवात २८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ४:३० वाजता श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या शुभमंगल आरतीने होईल. त्यानंतर ७:३० वाजता दर्शन आरती होईल आणि त्यानंतर इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा होईल. त्यानंतर श्रीमान अनंतशेष प्रभुजी यांच्या सुमधुर वाणी द्वारे श्री रुक्मिणी कथा होईल. त्यानंतर ५६ भोग दर्शन आणि श्री.रुक्मिणी महाराणी यांचे विशेष चरण दर्शन आणि त्यासोबतच महाआरती संपन्न होईल. त्यानंतर महाप्रसादाने २८ एप्रिल २०२६ च्या महामहोत्सवाची सांगता होईल.श्री नृसिंह चतुर्दशी या द्वितीय महामहोत्सवाची सुरुवात ३० एप्रिल २०२६ रोजी पहाट४:३० वाजता श्री रुक्मिणी



द्वारकाधीश आणि श्री लक्ष्मी नृसिंह, प्रल्हाद यांच्या शुभमंगल आरतीने होईल. त्यानंतर ७:३० वाजता दर्शन आरती होईल आणि त्यानंतर इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा होईल. त्यानंतर इस्कॉन भक्त प्रल्हाद स्कूल च्या विद्यार्थ्यांद्वारे श्री नृसिंह प्रागट्य लीलेवर आधारित एक नाटिका सादर करण्यात येईल. त्यानंतर श्रीमान अनंतशेष प्रभुजी यांच्या सुमधुर वाणी द्वारे श्री नृसिंह प्रल्हाद कथा होईल.त्यानंतर ५६ भोग दर्शन आणि श्री लक्ष्मी नृसिंह,प्रल्हाद यांची महाआरती होईल.त्यानंतर संपूर्ण महामहोत्सव सोहळ्याची सांगता महाप्रसादाने होईल. या दोन्ही महामहोत्सवाकरिता महाराष्ट्रातील सर्व भागांमधून भक्तांची मांदियाळी अंबानगरी येणार आहे. या दोन्ही महामहोत्सवाच्या यशस्वितेकरिता इस्कॉन अमरावती भक्त वृंद दिवस-रात्र सेवा करीत आहेत.या दोन्ही महामहोत्सवांसाठी आणि श्री प्रल्हाद नृसिंह चरित्र कथे करिता अमरावती वासियांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून श्री.रुक्मिणी द्वारकाधीश आणि श्री लक्ष्मी नृसिंह, प्रल्हाद यांचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आवाहन इस्कॉन अमरावती चे अध्यक्ष श्रीमान अद्वैतआचार्य प्रभुजी यांनी केले आहे.


### चारुदत्त चौधरी यांना शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

**अमरावती** - सुप्रसिद्ध लोक कलावंत पद्मश्री रघुवीरजी खेडकर यांच्या विशेष उपस्थितीत चारुदत्त चौधरी यांना नाशिक जिल्ह्यातील



सिन्नर येथे प्रातिष्ठित शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येऊन त्यांचा भावपूर्ण गौरव करण्यात आला. शिर्डी लोकसभा मतदार संघांचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देत हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी नामदार बच्चूभाऊ कडू व नामदार रविकांतदादा तुपकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.संजीवनी फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर सानप यांच्या मार्गदर्शनात पार पडलेल्या या सोहळ्यात चारुदत्त चौधरी यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियात तसेच सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने केलेल्या भरीव कामगिरीमुळे हा सन्मान त्यांना दिला जातोय असे आदराने सांगण्यात आले.यापूर्वीही त्यांना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्र सरकार, राज्य सरकार, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, ज्युनियर चेंबर इंटरनॅशनल, गांधी पीस फाउंडेशन, नेपाळ, अशा अनेक प्रतिष्ठित संघटनाकडून गौरविण्यात आले आहे. सध्या ते जेसीआय चे राष्ट्रीय प्रशिक्षक असून, अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या विदर्भ प्रांत सचिवपदी आहेत आणि विवेकानंद केंद्र, अमरावतीचे अमृत परिवार आयामाचे दायित्व वहन करीत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ. गोविंद कासट, नितीनजी काकडे, डॉ. नारायणजी मेहरे, अभयजी खेडकर,डॉ. पुरुषोत्तमजी गावंडे, डॉ. शोभा गायकवाड, डॉ. दिलीपसिंह खांबरे, अशोकजी हांडे, संजयजी पितळे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### राजाभाऊ वाघमारे यांचे निधन



**अमरावती**-श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, बुधवारा येथील पूजनीय राजाभाऊ वाघमारे यांचे नागपूर येथे दीर्घ आजारामुळे रविवारी २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी दुःखद निधन झाले आहे.त्यांचे अंत्यसंस्कार हिंदू स्मशानभूमीत पार पडले. अंत्यसंस्कार वेळी सर्व नातेवाईक उपस्थित होते.

# चांदुरबाजार ते अंजनगाव मार्गावर तोडलेली कडुनिंबाची झाडे रस्त्यावरच

## वाहतुकीस अडथळा, अपघाताची भीती

**अचलपूर/वार्ताहर**
परतवाडा-अमरावती मार्गावरील रस्ता विस्तारीकरणासाठी तोडण्यात आलेली कडुनिंबाची झाडे अद्यापही रस्त्याच्या कडेला पडून असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. चांदुरबाजार नाका, विदर्भ मिल परिसर तसेच अचलपूर नाका बसस्थानक परिसरात ये-जा करणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत रस्ता विस्तारीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यासाठी वनविभागाने झाडतोडीची परवानगी दिली होती. मात्र, नागपूर येथील पर्यावरणप्रेमी जयदीप दास यांनी न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर वृक्षतोडीला स्थगिती देण्यात आली.

परिणामी अर्धवट तोडलेली झाडे रस्त्याच्या कडेला पडून राहिली आहेत.या झाडांच्या फांद्या व खोड रस्त्यावर पसरल्याने वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. अपुरी प्रकाशयोजना आणि रस्त्यावर पडलेले लाकूड यामुळे विशेषतः दुचाकीस्वारांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी वाहतूक कोंडीही होत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते.

'एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तसेच व्यापारी व प्रवासी यांनीही या समस्येमुळे दैनंदिन हालचालींवर परिणाम होत असल्याची तक्रार केली आहे. नागरिकांनी संबंधित यंत्रणांनी तात्काळ दखल घेऊन रस्त्यावर पडलेली झाडे हटवावीत व वाहतूक सुरळीत करावी, तसेच भविष्यात अशा कामांदरम्यान योग्य नियोजन करावे, अशी मागणी केली आहे.

वाहतुकीस अडसर ठरणारी झाडे तातडीने हटवावीत
तोडलेली झाडे रस्त्यावर पडून असल्याने वाहनचालकांना मोठा फटका बसत आहे. या मार्गावर ट्रक, ट्रॅक्टर, बस, दुचाकी व इतर जड वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली असून वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असली तरी किमान वाहतुकीस अडथळा ठरणारी झाडे तात्काळ हटवावीत. प्रशासनाने जनहित लक्षात घेऊन त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**गौरव बंसल, परतवाडा**

# स्वस्त धान्य दुकानांत नागरिकांची प्रचंड गैरसोय

## दुकानांची संख्या वाढविण्याची ग्राहकांकडून होत आहे मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
परिसरातील साधारण १६ हजार लोकसंख्येसाठी केवळ तीन स्वस्त धान्य दुकाने उपलब्ध असल्याने नागरिकांची मोठी हालहवाल होत आहे. सध्या तीन महिन्यांचे धान्य एकत्र वाटप सुरू असल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या रांगा, दोन-दोन दिवस मजुरी सोडून घरी थांबणारे नागरिक आणि संथ गतीने चालणारे वितरण या समस्येमुळे जनतेत नाराजी व्यक्त होत आहे.

धान्य दुकानांचा सकाळ-संध्याकाळ मिळून एकूण आठ तासांचा वेळ असला तरी एका दुकानातून दिवसाचा फक्त एकाच बारा



ग्राहकांना धान्य मिळते. एवढ्या मोठ्या लोकसंख्येसमोर ही क्षमता अत्यंत अपुरी ठरत आहे.गावातील तीनही दुकानांमध्ये ग्राहकसंख्येत असमानता असल्याने एका दुकानावर ग्राहकांचा अनावश्यक ताण पडतो आहे. दोनच कर्मचारी एवढ्या मोठ्या संख्येला सांभाळू शकत नसल्याने ग्राहकांना लांबलचक प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेकांनी यासाठी दिवस-दिवस मजुरी सोडावी लागल्याने मोफत धान्य मिळण्यापेक्षा आर्थिक नुकसान जास्त होत असल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून ही समस्या कायम आहे. वर्तमानपत्र, सोशल मीडिया आणि स्थानिक बैठकीतून वारंवार आवाज उठवूनही प्रशासनाने याकडे पुरेशे लक्ष दिले नसल्याची नाराजी नागरिकांत आहे. धान्य वाटपाच्या काळात प्रत्यक्ष पाहणी केल्यास समस्येची खरी व्याप्ती स्पष्ट दिसेल, असा नागरिकांचा स्पष्ट स्वर आहे. लोकसंख्येच्या तुलनेत गावात किमान चार स्वस्त धान्य दुकाने नसल्यास परिस्थिती सुधारूच शकत नाही, असा सर्वसामान्यांचा ठाम निष्कर्ष आहे. प्रत्येक दुकानात ग्राहकसंख्या समसमान करण्याची आणि पुरेसा मनुष्यबळ व वेळ उपलब्ध करण्याची तातडीची गरज असल्याचेही नागरिकांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

### खल्लार-दर्यापूर मार्गावरील वृक्ष जळाले; शेतकऱ्यांच्या कृतीमुळे संवर्धन धोक्यात

**खल्लार/वार्ताहर**
निसर्गाचे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी शासन एकीकडे 'झाडे लावा झाडे जगवा'अशी योजना राबविते मात्र शासनाच्या याच योजनेला शेतकरी वर्गापासून तिलांजली बसत असल्याचा प्रकार खल्लार दर्यापूर मार्गावर घडत आहे.सध्या शेतीच्या आंतरमशागतीचे कामे सुरु असून शेतकरी वर्ग कामे करीत असतांना त्यांच्या शेतातील बांधावरील कचरा जळण्यासाठी बांध पेटवून देतात. मात्र बांधाबरोबरच शासनाने लाखो रुपये खर्च करुन लावलेले वृक्ष हे संरक्षण जाळीसह जळून खाक होत आहेत.परिणामी नैसर्गिक पर्यावरणाचे नुकसान होत आहे. तर दुसरीकडे रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशी वर्गाबरोबर इतरांनाही याचा त्रास होत आहे.



खल्लार दर्यापूर या रस्त्याने नेहमीच कपाशीने भरलेली गाडी घेऊन जात असतो. या मार्गावरील शेतकरी त्यांच्या शेतावरील बांध पेटवून देतात यात रस्त्यावर लावलेले झाडे तर जळून खाक होतातच. जर आगीची एखादी ठिणगी कपाशीच्या गाडीवर पडली तर वित्तहानी व जिवीतहानी झाल्यास त्याला कोण जबाबदार राहील

**सोपान घुरडे, वाहन चालक**

# ४८ कोटींचा दंड थकबाकीत; तरी नव्या क्रशरला हिरवा कंदील!

## अकोट महसूल विभाग 'मूकदर्शक' की 'सहभागी'?

### गाजीपूरमध्ये नियम धाब्यावर; आदिवासी जमिनीवर उद्योग उभारणीचा आरोप

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथे सुरू असलेल्या स्टोन क्रशर प्रकरणाने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. गट क्रमांक २७ व ३८ वर अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी तब्बल ४८ कोटी रुपयांची दंडात्मक कारवाई प्रलंबित असतानाच, त्याच परिसरातील गट क्रमांक ३७ वर नवीन संतोष चांडक यांच्या 'मे. बालाजी स्टोन क्रशर'ला परवानगी मिळाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संताप व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, गाजीपूर येथील गट क्रमांक ३७ वर केवळ १०० रुपयांच्या बाँडवर करार करून टोलेजंग स्टोन क्रशर उभारण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या परिसरात आधीच गट क्रमांक २७ व ३८ वर स्टोन क्रशर, खदान व डांबर हॉट मिक्स प्लांटसारखे प्रदूषणकारी उद्योग सुरू आहेत. या उद्योगांवर अवैध उत्खननाचे ठपके ठेवत महसूल विभागाने कोट्यवधींचा दंड ठोठावला असला तरी प्रत्यक्ष वसुली मात्र 'नोटीस-अपील-नोटीस' या कागदी घोळात अडकलेली आहे. याच पार्श्वभूमीवर नवीन क्रशरला परवानगी दिली गेल्याने 'अकोट महसूल विभागात नेमके चालले काय?' असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाचा 'दुहेरी मापदंड' उघड झाल्याची चर्चा रंगली आहे.

दंडाची वसुली प्रलंबित असताना नवीन उद्योगाला मोकळीक देणे म्हणजे नियमांचे सर्रास उल्लंघन असल्याची टीका होत आहे.

या प्रकरणात महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कर्तव्यच्युती केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाईची मागणी जोर धरत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निसर्गप्रेमी व स्थानिक नागरिकांकडून होत आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी स्वतः लक्ष घालून सत्यस्थिती उघड करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**प्रदूषण नियंत्रण मंडळाची 'ना हरकत'च नाही!**

गाजीपूर येथील गट क्रमांक ३७ वर सुरू असलेल्या 'मे. बालाजी स्टोन क्रशर'ला प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणतेही नाहरकत प्रमाणपत्र (ऱ्थ्ण्) देण्यात आले नसल्याची बाब माहिती अधिकारातून उघड झाली आहे. यामुळे परिसरात पर्यावरणाचा गंभीर ऱ्हास होत असून संबंधित विभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**आदिवासी जमिनीचा मुद्दा गंभीर-**

गट क्रमांक ३७ ही जमीन आदिवासी समाजातील अंबादास नागोराव पवार यांच्या मालकीची असल्याचे समोर आले आहे. मात्र या जमिनीवर गैर-आदिवासी संतोष चांडक यांच्या माध्यमातून उद्योग उभारण्यात आला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ३६ (अ) नुसार आदिवासी जमिनीचे हस्तांतरण किंवा भाडेपट्टा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येत नाही. असे असताना कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उद्योग उभारल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे, तर महावितरणकडून वीज कनेक्शनही देण्यात आले आहे. त्यामुळे शासनाच्या विविध यंत्रणांमधील समन्वय आणि पडताळणी प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

---

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक

## जिल्ह्यात सायंकाळी पाच पर्यंत १८.०९ टक्के मतदान



**अमरावती/प्रतिनिधी:** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या ९ सदस्यांच्या निवडीसाठी रविवारी, २६ एप्रिल २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यात मतदान प्रक्रिया पार पडली. सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्ह्यात एकूण १८.०९ टक्के मतदान झाले असून, डॉक्टरांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

जिल्ह्यात एकूण २,५६५ नोंदणीकृत मतदार होते. त्यापैकी सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ४६४ डॉक्टरांनी मतदान केले. यामध्ये ३२२ पुरुष आणि १४२ महिला डॉक्टरांचा समावेश आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (घ्श्) अधिकृत पॅनलमधून डॉ. वसंत लुंगे हे पश्चिम विदर्भातील एकमेव उमेदवार म्हणून रिंगणात आहेत.

खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक गणमान्य डॉक्टरांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील केंद्रावर जाऊन मतदान केले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ४ मतदान केंद्रांवर ही प्रक्रिया राबवण्यात ☞(पान २ वर)

---

## एएसआय अब्दुल कलाम हत्याकांडातील एका आरोपीला जामीन

### -एड. जेमिनी कासट यांचा युक्तिवाद



**अमरावती/प्रतिनिधी:** वलगांव पोलीस ठाण्याचे सहाय्यक उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कदीर यांच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेला आरोपी फाजील खान साबीर खान याला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून शनिवार २५ एप्रिल रोजी जामीन देण्यात आला आहे. या प्रकरणी एड. जेमिनी कासाट यांनी यशस्वी युक्तिवाद केला. माहितीनुसार वलगाव पोलीस ठाण्यात कार्यरत सहाय्यक उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कदीर (५५,जाकिर कॉलनी) यांची २८ जून २०२५ रोजी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी जियानोद्दीन एहसानुद्दीन (अराफत कॉलनी), आवेज खान (दर्यापूर), फाजील खान साबीर खान ( ख्वाजा नगर) यांना ताब्यात घेतले होते. एएसआय कलाम यांचा भाचा सोहेल परवेज अब्दुल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली होती. एसआय कलामच्या मोठे भाऊ अब्दुल कलाम यांनी दोन ☞(पान २ वर)

---

### दर्यापूरमध्ये कॅफेच्या नावाखाली

## 'कपल'साठी खासगी केबिन?

### नागरिकांमध्ये संशय, प्रशासनाचे मौन



**खल्लार-** दर्यापूर शहरात काही कॅफेच्या नावाखाली बंदिस्त व खासगी केबिन उपलब्ध करून दिल्या जात असल्याची जोरदार चर्चा सध्या रंगत आहे. या केबिनचा वापर नेमका कशासाठी केला जातो, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून पालक वर्गात विशेषतः चिंता व्यक्त केली जात आहे.

स्थानिकांच्या मते, काही कॅफेमध्ये खुले बसण्याऐवजी पूर्णपणे बंदिस्त केबिन दिल्या जात असून तिथे कोणतीही देखरेख नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या ठिकाणी गैरप्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या प्रकरणावर प्रशासनाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा तपास सुरू झाल्याचे दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

मोठी घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का?' असा सवालही आता उपस्थित केला जात आहे. शहरातील अशा कॅफेची तपासणी करून नियमांचे उल्लंघन होत असल्यास कठोर कारवाई करावी☞(पान २ वर)

---

## मडघे मंगल कार्यालयासमोर ट्रक पलटी

### क्लीनरचा पाय फ्रॅक्चर, मोठी जीवितहानी टळली



**मोर्शी/प्रतिनिधी:** मोर्शी ते अमरावती रोडवर असलेल्या मडघे मंगल कार्यालयासमोर रोडच्या बाजूला मोठा आयशर ट्रक पलटी झाला.ट्रकची कॅबिन पूर्णतः चकनाचुर होऊन काचा फुटल्या व ट्रक मध्ये असलेला माल अस्ताव्यस्त पसरल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून या अपघातात ट्रकच्या क्लीनरचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. सुदैवाने मात्र मोठी प्राणहानी टाळली.सदर घटना दि.२५ एप्रिल रोजी सकाळी ७:३० वाजताचे सुमारास घडली.प्राप्त माहितीनुसार दि. २५ एप्रिल रोजी पहाटे अमरावती येथून सरकीचे पोते भरून निघालेला आयशर ट्रक क्र.आर जे २१जी सी १९ २९ हा मोर्शी मार्गे छत्तीसगड (राजस्थान) येथे जात असतांना अचानक ट्रक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटून हा आयशर ट्रक मडघे मंगल कार्यालयासमोर रोडच्या बाजुला पूर्णतः पलटी झाला.या ट्रकची धडक दुसऱ्या वाहनाला लागून किंवा खड्ड्यात ट्रक पडून मोठी घटना घडली असती.मात्र सुदैवाने कोणत्याही प्रकारची प्राणहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.या अपघातात ट्रक चालकास किरकोळ मार लागला असून ट्रकचा क्लीनर रघुवीर शेखावत वय २८ वर्ष रा.नागोर (राजस्थान) याचा पाय फॅक्चर झाल्याने त्याला लगेच उपजिल्हा रुग्णालय ☞(पान २ वर)

---

## ट्रान्सपोर्ट नगरमध्ये दोन जण अग्निशस्त्रांसह ताब्यात; गुन्हे शाखेची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधी:** शहरातील नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील ट्रान्सपोर्ट नगर परिसरात गुन्हे शाखेने रविवारी (दि. २६) धडक कारवाई करत दोन संशयितांना अग्निशस्त्र व धारदार शस्त्रांसह ताब्यात घेतले. सपोनी मनीष वाकोडे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये अजहर खान जुरावर खान उर्फ ☞(पान २ वर)

---

## २८ ला आ. संजय गायकवाड यांचे घरावर शिवप्रेमी व पानसरे समर्थकांचा विशाल मोर्चा

### भारतीय कम्युनिस्ट पक्ष व पुरोगामी संघटना आयोजक

**अमरावती/प्रतिनिधी:** शिवाजी महाराज व शहीद गोविंद पानसरे यांचे बाबत अपमानास्पद वक्तव्य करीत, शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशक कोल्हापूरचे कॉ. प्रशांत आंबी ,यांच्या आई पत्नीवरून अश्लील शिवीगाळ केली. तेवढ्यावरच न थांबता, जीवे मारण्याची धमकी दिली. याचा जाब विचारण्याकरिता शिंदे सेनेचे आ.संजय गायकवाड यांचे बुलढाणा येथील निवासावर २८ एप्रिल ला शिवप्रेमी व पानसरे समर्थकांचा विशाल मोर्चा जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

शिवाजी महाराजांवर केवळ पानसरेंनी पुस्तक लिहिलं असं नाही ,तर प्रबोधनकार ठाकरे यांनी दगलबाज शिवाजी ( मे १९२६) श्री. गु .र. कुऱ्हाडे यांनी शिवाजी कोण होता (१९३९) यांनी सुद्धा 'शिवाजी' या एकेरी नावाने पुस्तके लिहिली .कॉम्रेड गोविंद पानसरेंचे शिवाजी कोण होता? हे पुस्तक मुंबईच्या लोक वाङ्मय गृहाने १९८८ मध्ये प्रकाशित केले. यवतमाळ येथील नगर वाचनालयाचे सभागृहात त्यांचे व्याख्यान होते. त्यावेळी सुद्धा समाजकंटकांनी हल्ला केला होता. या घटनाक्रमाला ३८ वर्षे झालीत .पुस्तकाचे नावाचा अनवयार्थ ,पुस्तक वाचल्याशिवाय कळत नसतो .हे सारे हल्ले पुस्तक न वाचताच होत आहेत.

आंदोलनकर्त्यांनी यापूर्वीच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याकडे काही प्रमुख मागण्या केल्या आहेत. जसे संजय गायकवाड यांचे आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा, जीवे मारण्याची धमकी ,जातीमध्ये तेढ निर्माण करणे, महापुरुषांचा अवमान करणे, महिलांना अश्लील शिवीगाळ ,महिलांचा शाब्दिक विनयभंग हे गंभीर गुन्हे ☞(पान २ वर)

---

## वरुडच्या 'ताज फ्रुट'ला भीषण आग

### मुलताई रोडवर अग्नीतांडव, कोट्यवधींची मालमत्ता भस्मसात



**वरुड/प्रतिनिधी:-** वरुड येथील मुलताई रोडवर स्थित असलेल्या 'ताज फ्रुट' या नामांकित कंपनीला शनिवारी रात्री भीषण आगीने कवेत घेतले. या आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, आकाशात झेपावणारे धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा कित्येक किलोमीटर अंतरावरून स्पष्ट दिसत होत्या. या दुर्घटनेत कंपनीचे कोट्यवधींचे आर्थिक नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

शनिवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास जेव्हा जनजीवन शांत होत होते, तेव्हा अचानक ताज फ्रुट कंपनीच्या आवारातून धूर बाहेर पडताना दिसला. कंपनीत मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेला कच्चा माल, लाकडी खोकी आणि प्लास्टिक पॅकेजिंग साहित्य असल्याने आगीने अवघ्या काही मिनिटांतच रौद्र रूप धारण केले. पाहता पाहता संपूर्ण परिसरात आगीचे साम्राज्य पसरले आणि बघ्यांची मोठी गर्दी जमली.

आगीची भीषणता लक्षात घेता स्थानिक प्रशासनाची यंत्रणा अपुरी पडत होती. घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने वरुड, काटोल, नरखेड यांसह शेजारच्या मध्य प्रदेश राज्यातील मुलताई आणि बैतुल येथून अग्निशमन दलाच्या ☞(पान २ वर)

---

## स्पीड ब्रेकर्सवर अपघात, मोटर सायकल स्वार गंभीर




**मोर्शी/प्रतिनिधी:** मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर रेल्वे गेट जवळील स्पीड ब्रेकर्सवर झालेल्या अपघातात मोटर सायकल स्वार गंभीररित्या जखमी झाला आहे. त्याला उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथून गंभीर अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आल्याची घटना दि.२४ एप्रिल रोजी घडली. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार छत्तीसगड मध्यप्रदेश येथून कित्येक मजूर बोरिंग कामासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसभर बोरिंगचे काम आटोपून कित्येक मजूर तालुक्याचे ठिकाणी आपले ट्रॅक्टर रोडच्या बाजूला उभे करून आराम करतात.

दि.२४ एप्रिल रोजी बोरिंगचे काम करणारा मजूर विघ्नेश्वर सर्वानंद ठाकूर वय २७ वर्ष रा. डींडीगुल(तामिळनाडू) हा काही कामानिमित्त मोर्शी येथून चांदूरबाजारकडे आपली मोटरसायकल क्र.एम एच २७ डी आर ६७ ५७ ने जात होता. दरम्यान मोर्शी ते चांदूरबाजार रोडवरील रेल्वे क्रॉसिंग गेट जवळील स्पीड बेकर्स वरून मोटर सायकल आदळून झालेल्या अपघातात विघ्नेश्वर याच्या डोक्याला जबर मार बसल्यामुळे प्रचंड रक्तस्त्राव झाला.या घटनेची माहिती मोर्शी पोलीस स्टेशनला ☞(पान २ वर)

---

## आलोक घुरडे यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक आलोक घुरडे ह्यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी कॅन्सर ह्या आजाराने वैद्यकीय उपचारा दरम्यान आज सकाळी १०:३० वाजता बंगलोर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान दुर्दैवी निधन झाले आहे. ते अमरावती येथील सुप्रसिद्ध शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य वसंतराव घुरडे तसेच सुविख्यात साहित्यिका, कवी व बियाणी महाविद्यालय, अमरावती येथील मराठी विषयाच्या गाढया अभ्यासक माजी प्राध्यापिका स्व. वसुधाताई घुरडे ह्यांचे ज्येष्ठ पुत्र होते. गेल्या २० वर्षांपासून ते व्यवसायामुळे बंगलोर येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात पत्नी रजनी व मुलगा अर्णव तसेच वडील वसंतराव घुरडे, लहान भाऊ पराग व लहान बहीण तृप्ती लोबो तसेच मोठा आप्त घुरडे परिवार आहे.

---

## उन्हाच्या काहिलीने विद्यार्थी होरपळले

### शिष्यवृत्ती परीक्षेच्या वेळापत्रकावर पालकांचा संताप

### अधिकाऱ्यांवर कारवाई करा पालकांची मागणी



**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ वी व ७ वी) रविवारी अंजनगाव सुर्जी परिसरात पार पडली. मात्र प्रचंड उन्हाच्या काहिलीमध्ये घेतलेल्या या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयींचा व अव्यस्थेचा सामना करत परीक्षा द्यावी लागल्याने परीक्षा परिषदेच्या नियोजनावर पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तालुक्यात एकूण १३ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. शहरासह ग्रामीण भागातील इयत्ता चौथीचे ११०७ आणि इयत्ता सातवीचे ७१९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. दरम्यान, सुमारे ४५ अंश सेल्सिअस तापमानात परीक्षा झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना उष्णतेचा फटका बसल्याचे चित्र पाहायला मिळाले.

काही केंद्रांवर विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने डॉक्टरांना पाचारण करण्याची वेळ☞(पान २ वर)

---

### डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय येथे

## आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ.राजू डांगे यांचा सत्कार



**अमरावती/प्रतिनिधी:** डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय मध्ये स्व.डॉ राजेंद्र गोडे यांच्या जयंती व पुण्यतिथी सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अहिल्या महीला परिषदेकरिता विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन या ठिकाणी करण्यात आले होते.या कार्यक्रमाचा लाभ अहिल्या महिला परिषदेच्या अनेक सदस्यांनी घेतला.

यावेळी नुकताच अमरावती भूषण पुरस्कार प्राप्त झालेले व आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक, जेसीआय इंडियाचे राष्ट्रीय प्रशिक्षक ,☞(पान २ वर)